

मासिक वार्तापत्र • अंक 13 • जानेवारी 2020 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

अयोध्या निकाल : कायदा नव्हे, श्रद्धेच्या नावावर बहुसंख्यांकवादाचा विजय 7

देशातील हत्यारांच्या कंपन्यांचे खासगीकरण: देश विकण्याचे भाजपचे पुढचे पाऊल 12

एन.पी.आर., एन.आर.सी आणि सी.ए.ए. : जाणून घ्या कायदेशीर तरतूदी आणि वास्तव! 16

# एन.पी.आर., एन.आर.सी., सी.ए.ए. विरोधात देशभरात लोक रस्त्यांवर!

## कामगार-कष्टकऱ्यांनो, आंदोलनाला क्रांतिकारी धार चढवा!

"आम्ही कागद नाही दाखवणार" ("हम कागज नही दिखायेंगे") असे म्हणत, एन.पी.आर. आणि सी.ए.ए. च्या विरोधात देशाने अनेक वर्षे अनुभवलेले नाही असे मोठे जन आंदोलन उभे राहिल्याचे आज दिसत आहे. डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून संपूर्ण देश सी.ए.ए. (सिटीझनशिप अमेंडमेंट ॲक्ट, नागरिकता सुधार कायदा. कायदा बनण्याअगोदरचे `कॅब' विधेयक), एन.पी.आर. (राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही, नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर) आणि एन.आर.सी. (राष्ट्रीय नागरिकता नोंदवही, नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स) च्या विरोधातील जन आंदोलनांनी धगधगत आहे.

15 डिसेंबर च्या रात्री दिल्लीमध्ये जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांवर हल्ला चढवला आणि देशातील आंदोलन पेटले. सगळीकडे बेधुंदपणे विद्यार्थी आणि नागरिकांना अटक केली जात आहे, 24 तासच नाही तर 2 ते 3 दिवस त्यांना अटकेत ठेवले जात आहे, खोट्या केसेस लावल्या जात आहेत; वाचनालयेच नाही तर हॉस्पिटल्सच्या आय.सी.यू. मध्ये सुद्धा पोलिस घुसून अश्रुधूर सोडत आहेत. पोलिसांसोबत मिळून संघी गुंड सुद्धा नागरिकांवर हल्ले करत आहेत. शांततामय आंदोलन करणाऱ्यांना, विद्वानांना, कार्यकर्त्यांना सुद्धा आंदोलनापूर्वीच स्थानबद्ध केले जात आहे. दिल्ली, कर्नाटक, उत्तर-पूर्व भारतातील बहुतांश राज्ये अशा अनेक ठिकाणी कर्फ्यू लागले. मोदी-शाहच्या जोडीने संपूर्ण देश वेठीस धरला आहे. देशातील प्रत्येक राज्यामध्ये असंख्य शहरे आणि गावे, शेकडो विद्यापीठे, कॉलेजेस मध्ये आणि रस्त्यांवर लाखोंच्या संख्येने जनता या कायद्यांच्या विरोधात रस्त्यांवर उतरली आहे. देशातच नाही तर डझनावरी

**संपादक मंडळ**

इतर देशांमध्ये आणि असंख्य परदेशी विद्यापीठांमध्ये सुद्धा भारतीयांनी या कायद्यांविरोधात आंदोलन केले आहे.

**आंदोलनाच्या उत्तरात फॅसिस्ट मोदी सरकारने सर्व कायदे धाब्यावर बसवून जनतेचे निर्घृण दमन चालवले आहे. जेव्हा राजधानी दिल्लीत विद्यार्थ्यांचे अशाप्रकारचे पाशवी दमन होऊ शकते तर देशाच्या इतर भागांमध्ये हे सरकार सामान्य जनतेचे काय करत असेल याचा अंदाजच करु शकतो. या निदर्शनांना ज्याप्रकारे दाबले जात आहे त्यामध्ये आपल्या नागरी अधिकारांवर हल्ला चढवला जात आहे. पोलिस आणि सरकार या निदर्शनांना पाशवी पद्धतीने चिरडून काढताना हा संदेश देऊ इच्छित आहे की सरकारच्या कोणत्याही पावलाला विरोध करणाऱ्यांना असेच चिरडले जाईल. भारताच्या सर्वधार्मिक चारित्र्यालाच नष्ट करून त्याला हिंदूराष्ट्र बनवण्याचा आर.एस.एस. चा कार्यक्रम छुप्या आणि खुल्या दोन्ही मार्गांनी आता रुप धरत आहे आणि स्वातंत्र्यलढ्यापासूनचे देश तोडण्याचे काम यांनी पुढे चालवले आहे.**

### एन.पी.आर., एन.आर.सी. आणि सी.ए.ए. : गरिब विरोधी कायदे

सी.ए.ए. व एन.आर.सी. कायदे फक्त धर्माच्या नावाने विभाजनकारीच नाहियेत, तर गरिब विरोधी कायदे आहेत. सी.ए.ए. कायदा म्हणतो की हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन धर्माचे सर्व प्रवासी, ज्यांच्यावर धर्माच्या नावाने अत्याचार झाले आहेत, ते भारतीय़ नागरिकता घेण्यासाठी पात्र असतील. सी.ए.ए. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांग्लादेशातून येणाऱ्या मुस्लिम, नास्तिक, ज्यू, इत्यादी लोकांनाच 'अवैध प्रवासी' मानतो. जर इतर देशांतील धार्मिक पीडितांसाठीच कायदा बनवायाचा होता तर ते हे सांगत नाहीत की पाकिस्तानातील पीडीत अहमदिया मुसलमान, श्रीलंकेतील

पान 8 वर

# आसाम मध्ये एन.आर.सी ने उडवला हाहाकार! 19 लाख गरिब कष्टकरी तुरुंगांच्या मार्गावर!

## संघ परिवार तोंडघशी! यांचे षडयंत्र ओळखा! वेळीच सावध व्हा!

✍ **राहूल**

देशभरामध्ये ज्या एन.आर.सी. च्या विरोधात लाखो लोक आंदोलनामध्ये उतरले आहेत, ती एन.आर.सी. प्रक्रिया आसाम राज्यामध्ये पूर्ण झाली आहे. या प्रक्रियेचा आसाम मधील अनुभव थरकाप उडवणारा तर आहेच, सोबतच भाजपसहित राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील संघटनांचे पितळ उघडे पाडणारा देखील आहे!

एन.आर.सी., नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स, म्हणजेच राष्ट्रीय नागरिकांची नोंदवही. देशातील नागरिकांची नोंद असलेली ही यादी. स्वातंत्र्यानंतर भारताच्या स्तरावर अशी कोणतीही यादी बनवली गेली नाही. परंतु आसाम राज्याच्या स्तरावर मात्र ही यादी बनवण्याची प्रक्रिया 2013 ते 2018 या काळात पूर्ण झाली. आज जेव्हा भारताच्या स्तरावर अशी यादी बनवण्याची प्रक्रिया एन.पी.आर. च्या मार्फत 1 एप्रिल 2020 पासून सुरू होत आहे, तेव्हा आपण सर्वांनी आसाम मधील या प्रक्रियेची भीषणता जाणणे अत्यंत आवश्यक आहे.

### आसाम आंदोलनाची पार्श्वभुमी

या आंदोलनाच्या पार्श्वभुमी मध्ये आणि स्वरूपामध्ये जाणे जागेअभावी शक्य नसल्यामुळे थोडक्यात सारांश येथे मांडत आहोत. स्वातंत्र्याच्या पूर्वीपासूनच तत्कालीन बंगाल मधून, आणि पाकिस्तान बनल्यानंतर बांग्लादेशातून हिंदू आणि मुस्लिम लोकांचे मोठ्या प्रमाणात आसाम मध्ये स्थलांतर चालू राहिले. भांडवली व्यवस्थेने तयार केलेला असमान विकास, बेरोजगारी, दुष्काळ, दैन्यावस्था अशा अनेक कारणांनी लोकांचे एकीकडून दुसरीकडे विस्थापन ही जगाच्या स्तरावर सर्वत्र दिसून येणारी बाब आहे. आसाम राज्यामध्ये बांग्लादेशातून आलेल्या 'परकीय' लोकांविरोधात आसामी 'एतद्देशीय विरुद्ध परके' असे आंदोलन 1979 ते 1985 च्या काळात उभे राहिले. आसामी निम्न भांडवली वर्गाच्या नेतृत्वात लढले गेलेल्या या आंदोलनाने आसामी राष्ट्रीयतेच्या भावनेच्या आधारावर प्रवासी कामगार वर्गालाही निशाणा केले. या आंदोलनाचे नेतृत्व ऑल आसाम स्टुडंट्स युनियन (आसू) ने केले. अत्यंत तीव्र आणि अनेकदा हिंसक अशा स्वरूपाचे हे आंदोलन झाले. नेल्ली आणि खोयराबारी सारख्या मोठ्या हत्याकांडानी देशाला हादरवणाऱ्या घटनाही या आंदोलनात झाल्या. याच आंदोलनाने 'आसाम गण परिषद' या राजकीय़ पक्षाला जन्म दिला जो नंतर 1985 मध्ये आसामात सत्तेवर आला. या आंदोलनाच्या परिणामी 1985 साली राजीव गांधी सरकारने 'आसू' सोबत 'आसाम करार' केला आणि 1971 नंतर बांग्लादेशातून भारतात आलेल्या व्यक्तींना शोधून परत पाठवण्याचा करार केला गेला.

### आसाम करार आणि आसाम एन.आर.सी.

आसाम कराराच्या परिणामी 1986 मध्ये 1955 च्या नागरिकता कायद्यात बदल करण्यात आले. याच कराराच्या परिणामी झालेल्या बदलांनीं एकीकडे जन्माने नागरिकत्वाच्या तत्वाला मुठमाती दिली आणि दुसरीकडे आसाममध्ये 'परकीय' नागरिक शोधण्यासाठी नोंदणी करण्याचे अधिकार सरकारला दिले. याच कराराचा परिणाम म्हणून आसाम मध्ये एन.आर.सी. ची प्रक्रिया झाली. 1997 मध्ये अनेक मतदारांची नावे संशयित म्हणून नोंदवली गेली. 1999 मध्ये आसाम मध्ये एन.आर.सी. प्रक्रियेचा आधिकारिक निर्णय झाला. यानंतर नागरिकता सुधार कायदा 2003 नुसार बेकायदेशीर प्रवासी व्यक्तींच्या अपत्यांना नागरिकत्वातून बाहेर करण्याचा कायदा भाजपच्या वाजपेयी सरकारने बनवला. आसाम मध्ये एन.आर.सी.ला दिरंगाई होत असल्याचे सांगत आसाम पब्लिक वर्क्स या एन.जी.ओ. ने 2009 साली सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली ज्याचा निकाल देत 2013 साली सर्वोच्च न्यायालयाने आसाम मध्ये एन.आर.सी. बनवण्याचा आदेश दिला. ही प्रक्रिया फेब्रुवारी 2015 मध्ये सुरू झाली आणि 31 ऑगस्ट 2019 रोजी संपली. या एन.आर.सी करिता 24/3/1971 ही आसाम करारानुसार

पान 13 वर

# तुम्ही नैराश्य ग्रस्त आहात का?

पान 14 वरून

स्वतःपासुनही तुटत जातो. त्याला जीवनाविषयी सर्वत्र निराशा वाटायला लागते कुठल्याही गोष्टीचा मोह व कशातच रुची राहत नाही. असे लोक आपली सृजनशीलता गमावून बसतात व एकटेच, उदास, कुठल्याही ध्येय व महत्वाकांक्षेविना कायम हरवलेले असतात.

समाजापासून दुरावणे, बेरोजगारी, महागाई, आर्थिक चणचण, जातीभेद, शोषण, हिंसेने भरलेल्या अशा या भांडवलशाहीच्या जगात लोक एक दुसऱ्याला स्वतःचे फक्त स्पर्धक मानू लागतात. दुसऱ्यांच्या आनंदाने त्यांना आनंद होत नाही अथवा दुसऱ्यांच्या दुःखाने ते दुःखीही होत नाहीत. एकाच गटात सोबत काम करणारे लोकही एकमेकांबद्दल द्वेषाची भावना ठेवून असतात. स्वतःच्या गरजा पूर्ण न होण्याच्या असुरक्षिततेमुळे ते दुसऱ्यांनाही मागे खेचण्याच्या वृत्तीत जगतात. मानवीय मूल्य, खऱ्या मैत्रीसंबंधाची भावना व मानवी प्रेम संपुष्टात येतात.


याशिवाय काश्मीर अथवा उत्तरपूर्व भारतातील काही राज्यात राज्यसत्तेकडून सैन्याद्वारे केले जाणारे दमन या कारणांमुळेही मानसिक नैराश्याच्या घटनांमध्ये जबरदस्त वाढ होत आहे. या भागांमध्ये सैन्याला अवाजवी अधिकार दिले गेले आहेत. काश्मीर खोऱ्यात ९ लाखापेक्षा जास्त सैन्य तैनात करून सतत संचारबंदी लावली जात आहे. शांततापूर्ण आंदोलने सुद्धा करू दिल्या जात नाहीत, तसेच पॅलेट गन चा अवाजवी उपयोग, कुठल्याही कारणाशिवाय व गुन्ह्याशिवाय अटक करणे हे नेहमीचेच झाले आहे. रोजच्या जगण्यातील जीवनावश्यक गोष्टी, संपर्क साधने जसे कि भ्रमणध्वनी, इंटरनेट यावर पण सक्तीची बंदी घातली जात आहे. अशा परिस्थितीत राग, अशांतता वाढल्याने लोक मानसिक नैराश्याचे शिकार बनत आहेत. काही दशकांपर्यंत आनंदी मानल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये आता मात्र बहुतेक लोक मानसिक नैराश्याचे शिकार होत आहेत. १९८५ मध्ये काश्मीरमध्ये मानसिक रुग्णांची संख्या ७७५ होती जी २०१५ मध्ये वाढून १ लाख ३० हजारावर जाऊन पोहोचली.

आजच्या काळात लहान मुलेही मानसिक नैराश्यातून जात आहेत. लहान वयापासूनच समवयस्क साथींसोबत होत असणारी तीव्र स्पर्धा, तुलना आणि भविष्याबद्दलच्या काळजीमुळे टाकला गेलेला दबाव या कारणांमुळे ते स्वतःचे बालपण ही व्यवस्थित जगू शकत नाहीत. अशाही घटना समोर आहेत कि दरवर्षी बरीच मुले परीक्षा काळात आत्महत्या करतात. ' इकॉनॉमिक टाइम्स' च्या रिपोर्टनुसार भारतात दर तासाला एक विद्यार्थी आत्महत्या करतो. सर्वसाधारण कुटुंबात एकटेपणा व नैराश्य आणि त्याचे परिणाम योग्य प्रकारे माहित नसतात आणि असेही लोक सापडतात जे आपली पोकळ सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी मानसिक आजारांसारख्या गंभीर समस्या लपवून ठेवतात. डॉक्टर कडून योग्य तो इलाज, औषधपाणी करणे सोडून अशा लोकांना समाजापासून वेगळे करून एखाद्या कोपऱ्यात पडून राहण्यासाठी सोडले जाते. भारतात तसे तर सर्वच प्रकारच्या डॉक्टर्स ची संख्या खूपच कमी आहे. पण मनोचिकित्सकांची संख्या तर मानसिक रुग्णांच्या तुलनेत नगण्यचआहे.

नैराश्य व एकटेपणाच्या महारोगापासून सुटका मिळवण्यासाठी नफेखोर, लालची आणि एकमेकांच्या पुढे जाण्याची स्पर्धा करण्यास भाग पाडणाऱ्या भांडवली व्यवस्थेला संपवावे लागेल. भांडवलशाहीचा नायनाट करून समानता आणि न्यायावर आधारित एक नवीन समाज बनवण्याच्या संघर्षात जोडले जाणे हा आपणहूनच एकटेपण व नैराश्याला दूर ठेवण्याचा योग्य मार्ग आहे. या प्रक्रियेत आपण आयुष्याला जवळून बघतो व कामगार कष्टकऱ्यांच्या जीवन संघर्षाशी जोडून आपण श्रमाचे महत्व खोलात जाणायला लागतो आणि जगण्यावर प्रेम करण्याचे खरे मार्ग जाणायला लागतो. हे सर्व सोडून जेव्हाही शक्य असेल तेव्हा निसर्गात वेळ घालवला पाहिजे कारण निसर्गापासून तुटणे हे ही नैराश्याचे एक कारण आहे. नवीन लोकांशी मैत्री करून, मनमोकळ्या गप्पा करून, कला-साहित्य-संगितासारख्या काही सृजनात्मक कामात रुची वाढवून सुद्धा परात्मभावावर काही प्रमाणापर्यंत मात केली जाऊ शकते.

**अनुवाद : अश्विनी**

“जर देशप्रेमाची व्याख्या सरकारची अंध आज्ञाधारकता नसेल, झेंडा आणि राष्ट्रगीताची भक्तिभावाने पूजा करणे नसेल; उलट आपल्या देशावर, आपल्या साथी नागरिकांवर (सर्व जगातील) प्रेम करणे असेल, न्याय आणि लोकशाहीच्या तत्वांशी एकनिष्ठता असेल; तर खऱ्या देशप्रेमासाठी आवश्यक आहे की जेव्हा आपले सरकार त्या तत्वांना पाळणार नाही, तेव्हा आपण त्या सरकारचा हुकूम मानायला नकार द्यावा”



“सविनय कायदेभंग आमची समस्या नाहीये. आमचीसमस्या आहेनागरिकांची आज्ञाधारकता. आमची समस्या आहे की जगभरामध्ये लोक नेत्यांच्या हुकूमशाही आदेशांचे पालन करत आहेत ... आणि या आज्ञाधारकतेमुळे कोट्यवधी लोक मारले गेले आहेत. ... आमची समस्या ही आहे की जगभरात गरिबी, भूकबळी, अज्ञान, युद्ध आणि क्रूरतेचा सामना करणारे लोक आज्ञाधारक बनून बसले आहेत. आमची समस्या ही आहे की लोक आज्ञाधारक आहेत आणि जेल सामान्य चोरांनी भरले आहेत ... मोठे चोर देश चालवत आहेत. हीच आमची समस्या आहे.”

**हॉवर्ड झिन (1922-2010) ( प्रख्यात अमेरिकन जनपक्षधर इतिहासकार)**



## बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

‘कामगार बिगुल’ आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर - 9156323976, 9657590491
- पुणे - 9422308125

## ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. ‘कामगार बिगुल’ व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. ‘कामगार बिगुल’ भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. ‘कामगार बिगुल’ स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. ‘कामगार बिगुल’ कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. ‘कामगार बिगुल’ सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. ‘कामगार बिगुल’ हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : सोमनाथ केंजळे, सत्यनारायण

संपादकीय कार्यालय : रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 9156323976, 9619039793

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. 5 (एका अंकासाठी)

वार्षिक : रु. 100 (टपाल शुल्कासह)

# पुण्यामध्ये पुरग्रस्तांचा झुंझार लढा आणि भांडवली सत्तेची अनास्था

✍ निखिल एकडे

ऑगस्ट महिन्याच्या सुरवातीला सांगली-कोल्हापूर व नाशिक, सप्टेंबर मध्ये गडचिरोली-चंद्रपूर, पुणे येथे पूर आला आणि ऑक्टोबर मध्ये मराठवाडा व विदर्भात ओला दुष्काळ पडला. ह्यात कष्टकरी, कामगार, शेतमजूर व अल्प भूधारक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. कामगार कष्टकरी जनतेवर कोसळलेली ही पुराची आपत्ती मुख्यत: व्यवस्था निर्मित आहे; परंतु ह्या आपत्ती पेक्षाही गंभीर अशी आपत्तीने शासनाने नुकसान भरपाई न देणे आणि पुनर्वसन न करण्यातून ओढावलेली आहे. पुण्यात नौजवान भारत सभेच्या नेतृत्वात झालेल्या पूरग्रस्तांच्या आंदोलनातून ही बाब एकदम प्रकर्षाने दिसून येते.

पुण्यात 25 सप्टेंबर ला झालेल्या अतिवृष्टीमुळे कात्रज पासून ते हनुमान नगर पर्यंत आंबिल ओढ्या लगत पूरपरिस्थिती उत्पन्न होऊन परिसरातील अनेक वस्त्यांमध्ये प्रचंड नुकसान झाले. आयुष्य भराच्या कंबरतोड मेहनतीतून जमा केलेल्या जीवनोपयोगी, संसाराच्या हर एक चीज-वस्तु पुरामध्ये वाहून गेल्या किंवा खराब झाल्या. कागदपत्रे, मुला-मुलींची वह्या पुस्तके आणि रोजगाराची साधने सर्व वाहून गेले. आयुष्यभराच्या कष्टाने जुळवलेला संसार मातीमोल झाला.

अशा स्थितीमध्ये सर्वच वस्त्यांमध्ये शासन-प्रशासनाच्या गंभीर दिरंगाई मुळे स्वच्छतेच्या कामाला उशीर झाला. प्रत्येक घरात गाळ, घाण पाणी साचलेले होते त्यामुळे घरातल्या चीज-वस्तु सडून वस्तीत उग्र वास भिनलेला होता. अशा वेळी नौजवान भारत सभा (नौभास) या क्रांतिकारी युवक संघटनेकडून कडून स्वच्छतेचे अभियान राबवण्याचा तातडीने निर्णय झाला आणि पूर्ण शक्तीनिशी आंबिल ओढा वसाहत येथे 5 दिवस स्वच्छता करण्यात आली.आरोग्याची अवस्था अतिशय दयनीय झालेली होती. पुराच्या दूषित पाण्यामुळे, गाळामुळे लोकांना त्वचेचे आजार व इतर संसर्गजन्य आजारांची लागण होत होती. त्यामुळे नौभासने नंतरचे 3 दिवस `प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग' या प्रगतीशील डॉक्टरांच्या संघटनेच्या सहयोगाने आपात्कालीन कामगार क्लिनिक चालवले. या सर्व कालावधीमध्ये सरकारी यंत्रणेची अनास्था अत्यंत संतप्त करणारीच होती. लोकांना ना अन्न होते, ना डोक्यावर छप्पर, ना पूरपरिस्थितीमुळे रोजगार.

पुराला 10 दिवस होऊन सुद्धा सरकार कडून कोणतीच मदत मिळाली नाही म्हणून मदतीसाठी आवाहन करणारे, वस्तीतील सर्व नागरिकांच्या सह्यांचे एक निवेदन जिल्हाधिकारी व मनपा आयुक्त ह्यांना देण्यात आले. परंतु प्रशासन आणि सरकार ने कुठलीही मदत केली नाही म्हणून पूरग्रस्त नागरिकांनी पोटाला चिमटा काढतरोजंदारी बुडवून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले, त्यानंतरच मदतीचा पहिला 5,000 रुपयांचा चेक अनेकांना मिळाला. याशिवाय 10,000 रुपये मदतीचे आश्वासन दिले गेले जे अजूनही पूर्ण करण्यात आलेले नाही! झालेल्या नुकसानीपेक्षा मिळालेली मदत अत्यंत तोकडी आहे आणि उध्वस्त झालेले संसार एवढ्याशा रकमेत उभे राहू शकत नाहीत ही सर्व पूरग्रस्तांची भावना आहे. यामूळे पुन्हा एकदा विविध वस्त्यांमधील नागरिकांनी एकत्र येऊन अजून मोठ्या संख्येने विभागीय आयुक्त कार्यालया समोर धरणे आंदोलन केले आणि किमान रु. 30,000 नुकसान भरपाई, मुलांच्या शाळांची फी माफ करणे, वीज बील माफी करणे, उपजीविकेची साधने पुरवणे, घर उध्वस्त झालेल्यांना घरभाड्यासाठी मदत, कागदपत्रे उपलब्ध करून देणे इत्यादी मागण्या मांडल्या. यानंतर काँग्रेस-भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी सारख्या सर्व भांडवली पक्षांच्या सत्तेच्या आणि लुटीच्या वाट्यासाठी चाललेल्या सुंदोपसुंदी मुळे आणि मंत्रीमंडळाच्या (कोणी किती खायचे याची गणिते न जुळल्यामुळे) खातेवाटपात झालेल्या दिरंगाईमुळे अजूनही पुरग्रस्तांच्या मुद्यांकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ झालेला नाही!

या सर्व काळात स्थानिक लोक प्रतिनिधी असलेले भाजपाचे चारही नगरसेवक, आमदार, खासदार यांची भयंकर असंवेदनशीलता सर्वांना अत्यंत बोचणारी होती. हिंदू धर्मीयांच्या भावनांचे राजकारण करणारे हे सर्व हिंदुत्ववादी किती ढोंगी आहेत याचा दाखलाच मिळत होता. बहुसंख्य पूरग्रस्त 'हिंदुच' होते पण 5000रु. सोडून सरकार कडून जवळपास कुठलीही संस्थागत मदत कोणापर्यंतच पोहोचली नाही आणि त्याबद्दल धर्माचे राजकारण करणाऱ्यांना कोणतीही चिंता दिसली नाही. तेव्हा विरोधी पक्षात असलेल्या आणि आत्ता सत्तेत असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीला अजूनही या मुद्याकडे लक्ष द्यायला सवड झालेली नाही. आजपर्यंत दोन मोठी आंदोलने झालेली आहेत, मधल्या काळात सरकार बनले, हजारो पुरग्रस्तांच्या सह्यांची निवेदने शासनापर्यंत पोहोचली आहेत, परंतु ना भाजप सरकारला, ना शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारला वेळ आहे की पुरग्रस्तांना न्याय्य मदत पोहोचवावी.

पूरग्रस्तांची परिस्थिती अत्यंत वाईट असतांना सर्व निवडणुकबाज भांडवली पक्ष मग ते भाजपा-शिवसेना-मनसे असोत वा कांग्रेस-राष्ट्रवादी कांग्रेस-वंबआ असो, लाखो कोटी निवडणूकीच्या प्रचारात खर्च करत होते. कष्टकऱ्यांना जाती-धर्माची झिंग चढवून किंवा अस्मितावादी राजकारण करुन, पैशांच्या जोरावर आणि जोरदार जुमलेबाजी करत सत्तेवर दावा ठोकत होते. एरवी नेहमीच हे सर्व पक्ष छोटे मोठे भांडवलदार, उद्योगपती, कारखानदार, ठेकेदार, बिल्डर, मोठे शेतमालक म्हणजे एकंदरीत मालक वर्गाच्या सेवेत लीन असतातच परंतु आपात परिस्थितीत सुद्धा सामान्य जनतेला हे मदत करु शकत नाहीत. पूरग्रस्त नागरिक व्यवस्थेच्या असंवेदनशीलते मुळे असहाय झालेले असतांना मतांच्या राजकारणाच्या दबावात भांडवली पक्षांचे काही नेते काही वस्त्यांमध्ये येऊन गेले, स्वखर्चाने मदतीचे थोडे 'उपकार' पूरग्रस्तांवर करुन गेले. राजकीय दृष्ट्या जागरूक नसलेले काही पूरग्रस्त नागरिक सुद्धा त्यातून लगेच उपकृत झाल्यासारखे वाटून नेतेमंडळींना त्यांच्या खऱ्या जबाबदारीतून स्वस्तात मुक्त करुन बसले! नुकसान भरपाई देणे, संसाराची घडी पुन्हा बसवणे हे खरे तर सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे परंतु आज आपल्या इच्छा-आकांक्षा रोजच्या गांजलेल्या परिस्थितीने एवढ्या रसातळाला पोहोचवल्या आहेत की आपण आपले अधिकार सुद्धा ओळखू शकत नाही.. अर्थातच सर्वांची ही स्थिती नव्हती. अनेकांनी या नेत्यांचे ढोंग व्यवस्थित ओळखले.

### पूरग्रस्तांना संपूर्ण नुकसान भरपाई द्यायला सरकारकडे खरंच पैसे नाहीत का?

एकीकडे पूरग्रस्त पुनर्वसन आणि नुकसान भरपाई साठी आंदोलन करत होते आणि निवडणुकीनंतर सत्तेच्या वाटण्यांमध्ये भांडवली पक्ष मग्न होते. निवडणुकी नंतर सत्तेच्या या कुत्तर ओढीत महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू झाली. जेव्हा जेव्हा अशाप्रकारे गरिब कष्टकरी कामगार जनतेला नुकसान भरपाईचा किंवा मदतीचा प्रश्न येतो तेव्हा सर्व सरकारं हात 'पैसे नाहीत' म्हणत हात वर करतात. बघुयात की खरोखरच सरकार कडे पैसे नाहीत का ते!

राष्ट्रपती राजवट असताना केंद्र सरकारने आपात्कालीन स्थिती असूनही पुरग्रस्तांची तीन महिन्यांची विज बिले, शाळा कॉलेजची फ्री माफ केली नाही! परंतु खाजगी बड्या दूरसंचार कंपन्यांना मोदी सरकारने साल 2020-2021, 2021-2022 अशा पुढील दोन वित्तीय वर्षासाठी 40,000 कोटींची करमाफी (स्पेक्ट्रम शुल्क माफी) देणारे मदतीचे पॅकेज मात्र जाहीर केले.

सरकार मुंबईतील एका प्राणीसंग्रहालयात 8 पेंग्विन आणण्यासाठी 24 कोटी खर्च करण्याचे ठरवू शकते. हीच राज्यसत्ता देशात आर्थिक मंदीच्या काळात उद्योगपती-भांडवलदारांचा नफ्याचा दर घटायला लागला म्हणून इतिहासात कधी नव्हे ते 1.76 लाख कोटी रुपये रिझर्व बँकेतून काढते, कंपन्यांच्या नफ्यावरच्या टॅक्स मध्ये कपात करुन वर्षाला 1.45 लाख कोटी मालकवर्गाच्या घशात घालू शकते! राज्य सरकार समृद्धी सारखे महामार्ग बांधतंय, ज्यामुळे म्हणताहेत की मुंबई ते नागपुर हा 15 तासांचा प्रवास 8 तासात होईल आणि त्याच्या साठी 55,000 कोटी खर्च करू शकते. राज्य सरकारनेच 29 ऑगस्ट 2019 रोजी नाशिक मेट्रो प्रकल्पाला मंजूरी दिली. ह्या संपूर्ण प्रकल्पाला सुमारे 2,100 कोटी रुपये खर्च येईल असे म्हणतात. नागपुर मेट्रोला अंदाजे 8,700 कोटी खर्च आला आहे जी 2019 मध्ये बनेल असा अंदाज आहे तसेच पुणे मेट्रो- 11,500 कोटी खर्च करून प्रकल्प 2021 ला पूर्ण करायचा आहे. मोदी सरकार च्या प्रचारावर 4,300 कोटी ख़र्च करण्यासाठी केन्द्र सरकार पाण्या सारखा पैसा वाहवू शकते. पुणे मेट्रोसाठी पैसा कमी पडू देणार नाही म्हटले जाते आणि जवळपास 30,000 कोटींची महागडी मेट्रो बांधणे चालू राहते. सातवा वेतन आयोग लागू करायला सरकारी मध्यम वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी ह्यांच्या कडे लाखो कोटी निधी असतो. परंतु संसार उद्ध्वस्त झालेल्या कष्टकरी-कामगारांना संपूर्ण नुकसान भरपाई, पुनर्वसन आणि पक्की, सविधायुक्त घरं हे देऊ शकत नाहीत!

अशी परिस्थिति फक्त महाराष्ट्राचीच नसून संपूर्ण भारत भर हीच स्थिती आहे. बिहार मध्ये 14लाख दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना प्रति कुटुंब फक्त 3000 रु. जाहीर करण्यात आले. ऑगस्ट 2019 मध्ये केरळात पूर आला तिथेही संशोधनवादी नकली लाल झेंड्या वाल्या सीपीएम-सीपीआय सरकार ने प्रति कुटुंब फक्त 10,000 रु. मदत जाहीर केली. ह्यातून एकंदर व्यवस्थेच चरित्र आपल्या समोर एकदम स्पष्ट झाल आहे! भारतातील राज्यसत्ता आणि सर्व निवडणूकबाज पक्ष फक्त उच्चवर्ग, मध्यमवर्ग, मालक वर्गासाठीच आहेत!

आंबिल ओढा पूरग्रस्तांच्या संघर्षादरम्यान कामगार कष्टकरी जनतेसमोर एक गोष्ट फार प्रकर्षाने समोर आली ती म्हणजे कष्टकऱ्यांसाठीचे अत्यंत अपुरे कायदे. भांडवलशाहीत बनणारे कायदे ह्या पेक्षा वेगळे असूही शकत नाहीत. जसे, दिनांक 13 मे 2015 रोजीचा महाराष्ट्र शासनाचा महसूल व वन विभागासाठी घेतलेला निर्णय! नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदतीचे दर आणि निकष ठरवणारा शासन निर्णय क्रमांक सीएलएस-2015/प्र.क्र.40/म-3. यानुसार घरांच्या नुकसानीसाठी जी मदत देण्यात येते, ती ओढ्याच्या आजुबाजुस असलेली घर 'अनधिकृत' असल्यामुळे देण्यात येणार नाही. म्हणजे कष्टकऱ्यांपैकी काही जण यांच्या दृष्टीने 'अनधिकृत' आहेत पण पूरग्रस्तांची मतं मात्र तिथल्याच मतदान केंद्रांवर 'अधिकृत' आहेत!

शासन-प्रशासनाच्या म्हणण्यानुसार असा निधी दिल्यास ओढ्याच्या आजूबाजूला राहण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देण्यासारखे होईल. खरंतर जमीन ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे; मी किंवा तुम्ही तयार केलेली नाही. त्यामुळे त्यावर कोणाही व्यक्तीची किंवा समूहाची खाजगी मालकी असणं खरंतर अनैसर्गिक आणि अनैतिक आहे. जमिनीवरील खासगी मालकी शोषणकारी व्यवस्थेतून आणि बळाच्या वापरातून जन्माला आलेली आहे. ही निसर्गातील जमीन सुद्धा सुपिक बनवण्याचे, त्यात अन्नधान्य पीकवण्याचे, त्यावर घरदार उभे करण्यापासूनची सर्व कामे आपण कष्टकरी-कामगार आपल्या श्रमातून करतो, परंतु ह्या व्यवस्थेत आपणच आपल्या श्रमाचे फळ चाखू शकत नाही. लक्षात असुद्या ही व्यवस्था विरोधाला मोडून काढत, जमिनी ताब्यात घेऊन, हजारो कोटी खर्च करून अनेक शहरात अति वेगाने चालणारी बुलेट ट्रेन आणु पाहते पण श्रमिकांना पक्की, सुविधायुक्त घरं देऊ शकत नाही. आपल्याला झोपड्यात आणि असुरक्षित वातावरणामध्ये राहायला ही भांडवली व्यवस्था भाग पाडते. आपण ओढ्या-नाल्यांच्या काठावर, पुरात-घाणीत मरण्याची हौस पूर्ण करण्यासाठी राहतो असे ह्यांना वाटते की काय? बिल्डर धनदांडग्यांनी जमिनींवर कब्जा करून जागांचे भाव गगनाला भिडवले आहेत आणि घरासारखी जीवनावश्यक गोष्ट, जी आपणच निर्माण करतो, आपल्या आवाक्याबाहेर नेली आहे. त्यामुळे नाईलाजाने जेव्हा आपण असुरक्षित ठिकाणी घर बांधतो. या मालकशाही व्यवस्थेने आणि मालक वर्गाच्या सर्व दलाल निवडणूकबाज भांडवली पक्षांनी स्वातंत्र्याच्या 72 वर्षात आपल्याला अत्यंत असुरक्षित परिसरामध्ये आणि घरांमध्ये ढकललेलं आहे. आता विकासाच्या वल्गना करणारे सरकार, जनतेला निवासाचा अधिकार सुद्धा देऊ शकत नाही. वरून बेकायदा जागेत आपण राहतो असं सांगून आपले योग्य पुनर्वसन न करता आपल्याला मदतीपासून वंचित ठेवत आहे. भांडवलदारांची कामे मात्र वेळप्रसंगी नियम मोडून केली जातात.

कामगार-कष्टकरी जनतेसाठी एक महत्वाचा धडा हा सुद्धा आहे की सत्ताधारी वर्गाची नेहमीची रणनीति असते की न्याय्य मागण्यांना गरज नसेल तेव्हा नाही म्हणू नका, वेळ ढकलत राहा आणि कष्टकरी कामगारांना थकवून टाका; ते परिस्थितीच्या दबावात आयुष्यात परत जातील; स्वतः चे हक्क अधिकार विसरतील आणि मालक वर्गाचं सर्व काही सुरळीत चालत राहील. परंतु आपणही जिद्द न सोडता, जोपर्यंत अधिकार मिळत नाही तोपर्यंत लढण्याचा निर्धार केला पाहिजे.

ह्या सर्व परिस्थितीत आपल्या समोरचा सर्वात मोठा प्रश्न हा आहे की आपत्कालीन परिस्थितीत कष्टकरी कामगार जनतेला मदत मिळत नसेल तर ही लोकशाही कोणाची आणि कोणासाठी आहे? दिसायला वेगवेगळे पक्ष राज्य करत असले तरी ही लोकशाही टाटा-बिर्ला-अंबानी-अदानी, मोठमोठे बिल्डर, उद्योगपती यांच्याच नियंत्रणात असणारी आणि त्यांच्याच फायद्यासाठी चालणारी मालक वर्गाची लोकशाही आहे. ही भांडवली व्यवस्था संपवण्याठी आपल्याला आत्तापासूनच दीर्घकाळाच्या संघर्षाची देखील तयारी करावी लागणार आहे. शहीद भगतसिंह म्हणाला होता त्याप्रमाणे स्वातंत्र्याच्या 70 वर्षात वेळोवेळी सिद्ध झाले आहे की मालकशाही टिकली तर गोरे भांडवलदार इंग्रज जातील आणि देशातील भांडवलदार-जमीन मालक-कारखानदार म्हणजे काळे भांडवलदार कष्टकरी जनतेवर राज्य करतील. भगतसिंहाचे स्वप्न ज्यात सर्व उत्पादनाच्या साधनांवर कामगार-कष्टकरी जनतेची सामुदायिक मालकी असेल आणि सर्व राज्यकारभार कष्टकरी जनतेसाठी चालेल, ते अजूनही अपूर्ण आहे.

आपण हे समजले पाहिजे की आज पूरग्रस्तांचा प्रश्न हा संपूर्ण व्यवस्थेच्या रचनेतूनच निर्माण झालेला आहे. त्यामुळे जोपर्यंत आपण कष्टकरी-कामगार आपली वर्गीय एकता मजबूत करत नाही; व्यापक लढे उभे करत नाही, जाती-धर्मांची आपापसातील भांडण संपवून जीवनाच्या खऱ्या प्रश्नांच्या संघर्षासोबत स्वतःला जोडून घेत नाही आणि भांडवली पक्षांचे शेपूट बनणे सोडत नाही, तोपर्यंत पूर्ण न्यायाची अपेक्षा करणे फोल ठरेल. सतत वाढत जाणारी कामगार-कष्टकरी एकता, संघर्ष व निरंतर संघर्ष हाच पूरग्रस्तांसाठी एकमेव मार्ग आहे.

# 2019 महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचा निकाल आणि आर.डब्ल्यु.पी.आय.ची कामगिरी

✍ भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष, महाराष्ट्र युनिट

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया, तिचा निकाल आणि निकालानंतर जे राजकीय समीकरण समोर आले आहे, त्याने भांडवली पक्षांचे खरे चरित्र जनतेसमोर नागडे केले आहे. निवडणुकीच्या काळात एकमेकांवर आग उगळणारे, हिंदुत्व आणि गोडसे-सावरकरांची समर्थक शिवसेनेसारखी फॅसिस्ट पार्टी आणि तथाकथित धर्मनिरपेक्षतेचे ढोंग करणारी आणि गांधींचे नाव जपणारी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी यांनी एकत्र येऊन सरकार बनवले आहे. दुसरीकडे हिंदुत्ववादी भाजप आणि'धर्मनिरपेक्ष' राष्ट्रवादी काँग्रेस यांचे सौख्य आणि सत्तास्थापनेचा प्रयत्नही सर्वांनी पाहिला. हमामात तर सगळे नागडे होतेच, आता जनतेसमोर येऊन निर्लज्जपणे नाचत आहेत! यावर आपण पुन्हा बोलूच, पण अगोदर निवडणुकीच्या निकालावर बोलूयात.

**देशामध्ये अभूतपूर्व मंदीचे वातावरण आहे आणि बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे. नोटबंदी, जीएसटी, बेरोजगारीचा मार, मंत्र्यांची बेताल वक्तव्य लोक विसरलेले नाहीत.** महाराष्ट्रामध्ये मोठ्या संख्येने घोटाळे, सर्व लोकशाही संस्थांमध्ये घुसखोरी, प्रचंड बेरोजगारी, महागाई, पूरग्रस्तांचा संताप, आणि देशाच्या स्तरावर भाजपच्याच मोदी सरकारचा फॅसिस्ट कारभार अशा अनेक गोष्टींमुळे असंतोष खदखदत असतानाही फॅसिस्ट भाजप-शिवसेना बहुमतामध्ये आले. याचे कारण आहे की अर्थव्यवस्थेचे संकट कायम असल्यामुळे जनतेचे तीव्र दमन करण्याची गरज अजूनही अस्तित्वात आहे, आणि हे काम करण्यासाठी सर्व मालक, भांडवलदार, बिल्डर वर्गाचा आवडता पक्ष भाजप आणि भांडवलदारांच्या बाजूचा 'लोहपुरुष' मोदीच आहे. त्यामुळेच या भांडवलदारांनी दिलेले हजारो कोटी खर्च करून, मीडिया आणि आर.एस.एस.च्या कॅडरच्या सहाय्याने, जनतेचा असंतोष प्रचंड असूनही, रोजगार-महागाई-मंदी ऐवजी काश्मिर-मंदिर-बांग्लादेशी सारख्या विभाजनकारी मुद्द्यांवर प्रचार करून, पुन्हा एकदा भाजप-शिवसेना जनतेच्या एका लक्षणीय हिश्श्याला दिखाऊ प्रचाराने प्रभावित करण्यात यशस्वी ठरले आहेत.

काँग्रेस-राष्ट्रवादी युतीच्या वाढलेल्या जागांमुळे काहींना उगीच भरते आले आहे, आणि वंचितने काही जागा खाल्ल्या नसत्या तर अजून चित्र वेगळे असते असे सांगणारे बेरीज-वजाबाकीच्या राजकारणातच अडकून पडलेले आहेत. सत्य तर हे आहे की भाजप-शिवसेना युती जिंकली आहे, मग सरकार कोणाचे का बनलेले असेना. यामध्ये ईव्हीएम घोटाळ्याचा हात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. पण हेच तर आजच्या फॅसिझमचे वैशिष्ट्य आहे की तो भांडवली लोकशाहीच्या सर्व संस्थांचे फक्त आवरण ठेवतो, वास्तवात त्यांना आतून पोखरत जातो आणि त्यांच्या अंतर्वस्तूला समाप्त करतो. यामुळेच निवडणुक आयोग, निवडणूक प्रक्रिया, न्यायपालिका, नोकरशाही, सशस्त्र दल, पोलिसांमध्ये संघ परिवाराने आपली मुळं रोवली आहेत आणि त्याच्या आधारावर फॅसिस्ट इराद्याला पूर्ण करत आहे. खरे तर भाजप-शिवसेनेच्या जागी काँग्रेस-राष्ट्रवादी आणि वंचित, मनसे, इत्यादी पक्ष जरी सत्तेमध्ये आले असते, तरी आपल्यासाठी, कामगार-कष्टकऱ्यांसाठी खाजगीकरण, कामगार-कपात, टाळेबंदी इत्यादींपासून सुटका नव्हती कारण या सर्व पक्षांचे खरे वर्गचरित्र कामगारांचे शोषण करणाऱ्या मालक वर्गाची सेवा करणे हेच आहे. पण धर्मवादी फॅसिस्ट भाजप-शिवसेना युती आणि इतर भांडवली पक्षांमध्ये एक फरक नक्की आहे. तो फरक जो फॅसिस्ट पक्ष आणि इतर भांडवली पक्षांमध्ये असतो. फॅसिझम हा कामगार वर्गाचा सर्वात मोठा शत्रू आहे कारण हा भांडवलदार वर्गाच्या सर्वात मोठ्या प्रतिक्रियावादी हिश्श्याच्या नग्न हुकूमशाहीचे समर्थन करतो आणि त्यासाठी निम्न-भांडवलदार वर्गांचे एक प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन उभे करतो, ज्याचे चरित्र धर्मवादी, जातीयवादी, वंशवादी, प्रांतवादी आणि इतर प्रकारचा अस्मितावाद असू शकते.

निकालानंतर भाजपला एकट्याला बहुमत नसल्यामुळे आणि प्रत्येक निवडणुकबाज पक्षाप्रमाणे शिवसेनेलाही 'हिंदुत्वा'पेक्षा सत्तेच्या मलाईचा वाटा जास्त प्यारा असल्यामुळे युती तुटली. भांडवली पक्षांसाठी सर्वात महत्वाचे आहे लूटीचा हिस्सा, जो तेव्हाच जास्त मिळेल जेव्हा जास्त 'अर्थ'पूर्ण मंत्रीपदं आणि मुख्यमंत्री पद असेल. या लुटीपुढे 'हिंदुत्व' काय आहे? त्यामुळेच शिवसेना वेगळी झाली यामध्येही काही आश्चर्य नाही. सध्या सरकार जरी शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादीचे असले तरी भाजपचे 2014 चे सरकार राष्ट्रवादीच्या पाठिंब्यानेच बनले होते हे विसरता कामा नये. या पक्षांचे खरे राजकारण भांडवलाची सेवा, धंदा आणि नफ्याचे रक्षण करणे हेच असल्यामुळे अशा तडजोडी पुर्वीही झाल्या आहेत आणि होत राहतील. हे सुद्धा विसरता कामा नये की शिवसेनेचा जन्मच काँग्रेसच्या तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या समर्थनाने झाला होता. मुंबईच्या कामगार चळवळीत फूट पाडण्यासाठीच शिवसेनेला प्रोत्साहन देण्यात आले. तेव्हा तेव्हा कामगार-कष्टकरी जनतेने या सर्व घडामोडींकडे पाहून समजले पाहिजे की या पक्षांचे निवडणुकीतले भांडण हा फक्त दिखावा आहे, त्यांचे खरे भांडण फक्त भांडवलदारांचा प्रतिनिधी बनून सत्ता राबवण्यासाठी आणि लुटीच्या मोठ्या वाट्यासाठी आहे.

**आर.डब्ल्यु.पी.आय.(RWPI) च्या कामगिरीचे मूल्यमापन**

या धंदेबाज, निवडणुकबाज, भांडवली राजकारणाला पर्याय फक्त एक कामगार वर्गीय पक्ष असू शकतो. देशातील कामगारांनी आपला स्वत:चा स्वतंत्र कामगार वर्गीय पक्ष म्हणून नोव्हेंबर 2018 मध्ये भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष, म्हणजेच आर.डब्ल्यु.पी.आय.(रिव्होल्युशनरी वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, RWPI) ची स्थापना केली. आर.डब्ल्यु.पी.आय. भांडवलदार वर्गाच्या कोणत्याही हिश्श्याकडून कोणताही आर्थिक सहयोग स्विकारत नाही आणि कामगार-कष्टकऱ्यांच्या घामाच्या कमाईच्या जोरावर आपले राजकारण उभे करत आहे. आर.डब्ल्यु. पी.आय. ने लोकसभा 2019 निवडणुकांमध्ये सहभाग घेतला होता आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतही सक्रिय हस्तक्षेप केला.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2019 मध्ये भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षातर्फे पर्वती(पुणे), मानखुर्द-शिवाजीनगर (मुंबई) आणि अहमदनगर शहर येथे उमेदवार देऊन कामगार वर्गीय हस्तक्षेप करण्यात आला. लोकसभा निवडणुकीमध्ये अहमदनगर आणि मुंबई ईशान्य येथे लढत दिल्यानंतर लागलीच आलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये सुद्धा सहभाग घेतला गेला.

या तिन्ही निवडणुका पूर्णतः RWPI च्या भूमिकेला आणि तत्वाला अनुसरून व्हॉलंटीअर्सची कठोर मेहनत, कामगार कष्टकरी आणि न्यायप्रिय जनतेतून उभ्या केलेल्या निधीच्या जोरावर लढल्या गेल्या. कामगार कष्टकऱ्यांनी आपल्या घामाच्या कमाईतून दिलेला निधी ही या राजकारणाची खरी पावती आहे. असा पक्षच कामगार वर्गाच्या हितात बोलू शकतो आणि त्यासाठी लढू शकतो.

पर्वती येथे परमेश्वर जाधव यांना 250 मते पडली, मानखुर्द येथे बबन ठोके यांना 397 तर अहमदनगर शहर येथे संदीप सकट यांना 661 मते पडली. पर्वती मध्ये पहिल्यांदाच निवडणुकीच्या राजकारणात हस्तक्षेप होता, तर अहमदनगर व मानखुर्द येथे लोकसभा निवडणुकीचा अनुभवही पाठी होता. दोन्ही ठिकाणी लोकसभेच्या निकालाच्या तुलनेत विधानसभा क्षेत्रामध्ये नक्कीच मतांमध्ये वाढ झाली आहे. या तिन्ही मतदारसंघासोबतच पूर्ण राज्यातील निवडणुकांमध्ये हा कल दिसून आला की व्यापक कष्टकरी जनतेमध्ये राजकीय चेतनेचा अभाव आहे आणि आपल्या वर्ग हितांच्या विपरित ती जात-धर्म, अंधराष्ट्रवाद, खोटा प्रचार आणि इथपर्यंत की दारू आणि पैशांच्या बदल्यात सुद्धा मत देते. यासाठी मुख्यत: ती व्यापक कष्टकरी जनता दोषी नाही, तर त्या जीवनाच्या स्थिती आहेत ज्या भांडवली व्यवस्थेने निर्माण केल्या आहेत. यातून आर.डब्ल्यु.पी.आय. साठी हा कार्यभार निघतो की तिने सतत जनसंघर्ष आणि क्रांतिकारी राजकीय प्रचाराद्वारे जनतेमध्ये राजकीय वर्गचेतना निर्माण करावी आणि त्यांच्यामध्ये आपल्या सामाजिक आधाराला व्यापक आणि सघन बनवावे.

यावेळच्या प्रचारा दरम्यान आलेल्या अनुभवांच्या जोरावर सांगायचे तर "आम्हाला मतच द्यायचे नाही", "सगळे फक्त 5 वर्षांतून एकदा येतात", "कोणालाही मत दिले तरी ईव्हीएम मधून मत जाते ते कमळाला" अशा प्रतिक्रियांपासून ते अनेक वस्त्यां/कॉलन्यांच्या बाहेर लागलेले "येथे मत मागायला येऊ नये" असे बोर्ड जनतेमध्ये असलेले निराशेचे आणि पर्यायाच्या अभावाचे वातावरण स्पष्टपणे दाखवत होते. मतदानाची घसरलेली टक्केवारी याचे एक लक्षण आहे. नुकत्याच झालेल्या पुरांमुळे ग्रस्त जनतेला मदत पोहोचलेलीच नसल्यामुळे त्यांचा असलेला रोष स्विकारायला कोणतेही भांडवली पक्षांचे उमेदवार धजावत नव्हते हे सुद्धा दिसून आले.. या निवडणुकीतही ईव्हीएम बद्दल अनेक आरोप, शंका समोर आल्या आहेत. ईव्हीएम मशिन बद्दल असलेला सार्वत्रिक अविश्वास तीव्र आहे पण तो असंघटीत आहे आणि त्यामुळे व्यक्त होत नाही हे नक्की म्हटले जाऊ शकते. जनतेच्या या विविध अभिव्यक्ती एका बाजूला जनतेला संघटीत करून एका क्रांतिकारी पर्यायाला निर्माण करण्याची आवश्यकता दाखवतात, तर दुसरीकडे कष्टकरी जनता भांडवली निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात सामील होते तिथे निवडणुकीच्या मंचावर सुद्धा कामगार-कष्टकऱ्यांचा स्वतंत्र आवाज प्रस्तुत करण्याची आवश्यकता आहे. आर.डब्ल्यु.पी.आय. सध्या दोन्ही लक्ष्यांपासून दूर आहे, पण तिथपर्यंत पोहोचण्यासाठी प्रतिबद्ध आहे.

भांडवली निवडणुकांच्या खेळात साधारपणे तोच जिंकतो ज्याच्याकडे मोठमोठ्या कंपन्या, ठेकेदार, धनिक दुकानदार, जमीनमालक आणि विविध प्रकारच्या दलालांचे धनबळ आणि बाहुबळ असते. याच शक्ती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसा, दारू, लांड्यालबाड्या, ईव्हीएम घोटाळा, मतांची खरेदी सारखे निर्लज्ज खेळ खेळू शकतात. अशामध्ये अत्यंत कमी खर्चामध्ये, मर्यादीत शक्तीनिशी केलेल्या, समाजवादी परीवर्तनाच्या प्रचाराच्या जोरावर मिळालेल्या पाठिंब्यामुळे पक्षाच्या व्हॉलंटीअर्समध्ये उत्साहाचे वातावरण असले तरी याची जाणीव पक्षास नक्की आहे की अजून खूप दूरचा पल्ला गाठायचा आहे. मिळालेली सर्व मते ही स्पष्टपणे कामगार वर्गीय राजकारणाला असलेल्या पाठिंब्याचीच मते आहेत, आणि झालेली छोटी संख्यात्मक वाढ सकारात्मक बाब असली, तरी पक्षाला याची पूर्ण जाणीव आहे की पुढील काही वर्षांमध्ये कामगार कष्टकऱ्यांच्या रोजगार, वेतन, शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता, घरकुलासहित जीवनाच्या प्रश्नांवर संघर्ष उभे करणे, आणि कठोर परिश्रमातून निरंतर वैचारिक प्रचार यातूनच पक्ष आणि कामगार वर्गीय राजकारण बळकट होऊ शकते.

फॅसिस्ट राजवटीमध्ये आता यापुढील पाच वर्षे आपण कष्टकरी-जनतेने आपल्या रोजगार, वेतनावर आणि जगण्याच्या अधिकारावरच अजून मोठ्या हल्ल्यांचा मुकाबला करण्यासाठी आता सज्ज झाले पाहिजे. आपले न्याय्य अधिकार मिळवण्यासाठी निवडणुकीच्या राजकारणात तर उतरलेच पाहिजे, पण निवडणुकांमधून क्रांती होत नसते हे लक्षात घेऊन, क्रांतिकारी परिवर्तनाच्या लढाईसाठी, रस्त्यावरच्या संघर्षांसाठी संघटीत होणे आपण चालू केले पाहिजे. या लढाईमध्ये कामगार वर्गाला संघटीत करण्यासाठी RWPI कटीबद्ध आहे.

## उठाव झेंडा बंडाचां

✍ अमरशेख


उठाव झेंडा बंडाचा  
झेंडा आपुल्या रक्ताचा  
कामगार स्वातंत्र्याचा  
शेतकरी स्वातंत्र्याचा  
लाल,लाल,लाल,झेंडा क्रांतीचा

पिऊ पिऊनी रक्त आपले  
फार माजली भांडवलशाही  
उखडून दया तिला एकदम  
सुरू करा मोहीम आपुली

भूक भूक आरोळी ठोकुनी  
कामगार संपावर जाती  
शांत तयांना करण्यासाठी  
गोळ्या चारी भांडवलशाही

पाठीवरती पोट बांधुनि  
कित्येक फिरती कामासाठी  
पोरे बेकारांची मरती  
मरोत भांडवलवाले म्हणती

आता मागे हटणे नाही  
तहनाम्याच्या बाता नाही  
पुढेच घुसणे ठरली नीती  
आपुली एकी अंतिम शक्ती



# दिल्लीत केजरीवाल सरकारकडून किमान मजुरी दरात कागदोपत्री वाढ

✍ मजदूर बिगुल पत्रकार

दिल्लीत सत्ताधारी केजरीवाल सरकारने मोठ्या धुमधडाक्यात पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले की आता दिल्लीत किमान मजुरीत वाढ केली जात आहे. यानुसार दिल्लीत आता अकुशल मजूराला १४,८४२ (प्रति दिवस ५७१ रुपये), अर्धकुशल मजुरांना १६,३४१ (प्रतिदिवस ६२९ रुपये) आणि कुशल मजुराला १७,९९१ (प्रतिदिवस ६९२ रुपये) वेतन मिळेल. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जाहीर केले की त्यांच्या सरकारने आता किमान मजुरीत वाढ केलेली आहे त्यामुळे देशात सुरू असलेल्या आर्थिक मंदीचा परिणाम दिल्लीतील मजुरांवर होणार नाही.

केजरीवाल यांनी पत्रकार परिषदेत या किमान मजुरीत वाढ करण्याच्या निर्णयाला मोठा विजय असे संबोधिले. हा निर्णय घेण्यासाठी त्यांच्या पक्षास कराव्या लागणाऱ्या संघर्षाची कहाणी त्यांनी ऐकविली की कशाप्रकारे मागील वेळी केजरीवाल सरकारने किमान मजुरीत वाढ केली तेव्हा कारखानदारांनी या निर्णयाविरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेचा निकाल दिल्ली हायकोर्टाने कारखानदारांच्या बाजूने दिला आणि वाढलेल्या किमान मजुरीला वाढीला घटनाबाह्य म्हटले. या निर्णयामुळे काही काळ किमान मजुरीवर निर्बंध आले व पुन्हा जुनी मजूरी दिली जाऊ लागली. यानंतर केजरीवाल सरकारने हायकोर्टाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले व अलीकडेच (१४ ऑक्टोबर २०१९) सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल सरकारच्या बाजूने निर्णय देत किमान मजुरीत वाढ करण्याच्या निर्णयाला योग्य ठरविले. खरेतर या तमाशारुपी कहाणीत ना मजुरांच्या वेतनात वाढ झाली आणि ना यापुढे किमान मजुरीचे धोरण प्रत्यक्षात लागू होईल!

मुख्यमंत्री केजरीवाल असाही दावा करत आहेत की आता संपूर्ण देशात सर्वाधिक किमान मजुरी दिल्लीत मिळेल. पण वास्तवात जर वाढलेली मजूरी लागू होणारच नाही तर ही एका कागदी घोषणा सोडून दुसरे काहीही नाही. जर किमान मजुरी तुम्हास वास्तवात लागू करायचीच नसेल तर किमान मजुरीची रक्कम तुम्ही कितीही निश्चित करू शकता. उद्या तुम्ही लोकांना सांगाल की किमान मजुरी ५०,००० करण्यात आली आहे व ही जगातील सर्वात अधिक किमान मजुरी आहे; आणि अशा हवेतील घोषणांचा मजुरांना कोणताही फायदा होणार नाही.

वास्तवात दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीच्या काही महिने अगोदर केलेली ही केवळ कागदावरील घोषणा आहे. कारण दिल्लीतील ९८ टक्के मजुरांना ही वाढवून सांगितलेली मजुरी मिळणारच नाही. दिल्लीतील मजुरांनाही कल्पना आहे की हे सर्व खोटे असून त्यांची क्रूर थट्टा केली जात आहे. दिल्लीतील २ डझनाहून अधिक औद्योगिक क्षेत्रांमध्ये लाखो स्त्री व पुरुष मजुरांना आठ तासाच्या कामाचा केवळ ५,००० ते ८,००० रुपये इतकाच मोबदला मिळतो. जिथे किमान मजुरीचीच एवढी वानवा असेल तेथे ईएसआय व पीएफ फार दूरच्या बाबी आहेत. इतकेच नाही तर दिल्लीतील सरकारी रुग्णालय व शाळांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी मजुरांनाही या वेतन वाढीचा फायदा मिळत नाही. विविध सरकारी विभागांमध्ये ठेकेदार सर्व कायद्यांचे पालन करत असल्याचे फक्त कागदावर दाखवतात; मात्र प्रत्यक्षात तेवढी मजुरी मजुरांना दिलीच जात नाही. सरकारलाही ही गोष्ट माहित आहे. दिल्लीतील मजुरांच्या वेतनवाढीच्या अशा कागदी घोषणा दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्याकडूनही केल्या जायच्या.

आम आदमी पार्टी व केजरीवाल सरकारला जर खरोखरच मजुरांची इतकी चिंता वाटते तर त्यांनी मागील किमान वेतन (१३,३५० रुपये) आणि ईएसआय व पीएफ सक्तीने लागू करावयास हवे होते. परंतु असे होत नाही. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे अन्य सत्तालोलुप राजकीय पक्षांप्रमाणेच 'आप' सुद्धा दिल्लीतील फॅक्टरी मालकांकडूनच निवडणुकांसाठी निधी गोळा करते. इतकेच नाही तर 'आप'चे बरेच आमदार स्वतःच फॅक्टरी मालक आहेत. त्यांच्या कारखान्यातील मजुरांनाही किमान वेतन दिले जात नाही. दिल्लीत सत्तेवर राहिलेल्या भांडवली कॉंग्रेस व भाजपा यांच्या तुलनेत आम आदमी पार्टी श्रम कायद्यांना लागू करण्याचे ढोंग करते एवढाच काय तो फरक त्यांच्यात आहे. यांच्या सरकारने हे मान्य केले की 'श्रम कायदा १९४८' अन्वये किमान वेतन न देणाऱ्यांविरोधात कडक शिक्षेची तरतूद नाही हे किमान वेतन लागू न होण्यामागचे कारण आहे. आप सरकारने किमान वेतन नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मालकांसाठी दंडाची रक्कम ५०० वरून २० ते ५० हजार पर्यंत वाढवली तसेच एक ते तीन वर्षापर्यंत कारावास अशा दोन तरतुदी केल्यात. पण या सर्व गोष्टी हवाईच आहेत. दिल्लीत किमान मजुरी नियमांसह श्रम कायद्यांना उघड-उघड सुरुंग लावला जातो, पण आजवर एकाही मालकावर कारवाई करण्यात आलेली नाही. कामगार विरोधी नवीन मोटार वाहन कायदा लागू करण्यात जी तत्परता मोदी सरकारने दाखवली (ज्याची वरवर प्रशंसा केजरीवालने सुद्धा केली होती) तेवढी तत्परता व कठोरता भांडवलदारांचे कुठलेही सरकार श्रम कायदा लागू करताना दाखवत नाही. यावरून स्पष्ट होते की अशी घोषणा म्हणजे निव्वळ दाखवलेले गाजर असते.

नवीन किमान मजुरी नियम लागू करणे हे केजरीवाल सरकारसाठी केवळ दिखावा आहे; कारण खरेतर केजरीवाल सरकारची मजुरांना किमान मजुरी देण्याची कुठलीच इच्छा नाहीये. केजरीवाल यांना निवडणुकीत निधी देणाऱ्यांची मोठी संख्या दिल्लीतील छोटे-मोठे दुकानदार, कारखानदार, ठेकेदार यांची आहे. त्यामुळे या वर्गणीदारांना निराश करून मजुरांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणू शकत नाही. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे दिल्लीतील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना हे सिद्ध करणेच अशक्य आहे कि ते कोणत्या कारखान्यात कामाला आहेत आणि ते सिद्ध झाले तर कारखानदार आपल्या कारखान्याचे नाव बदलतो व सरळ सांगतो की पूर्वीच्या कंपनीचा मालक मी नव्हतो. मग श्रम विभाग कंपनीचा मालक कोण होता ते सिद्ध करण्याची जबाबदारी मजुरांवर टाकून मोकळा होतो.

या घोषणेबाबत स्वतः `आप' चे आमदार तसेच नगरसेवकही दिल्लीतील औद्योगिक क्षेत्रात फारसा प्रचार करीत नाहीयेत कारण एक तर ते स्वतः कारखानदार आहेत किंवा कारखानदारांकडून मिळालेल्या वर्गणीवर निवडणूक जिंकलेले आहेत. काही उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. जेव्हा २०१३ मध्ये पहिल्यांदा केजरीवालांचे सरकार सत्तेत आले तेव्हा या सरकारचे पहिले श्रम मंत्री गिरीश सोनी हे चामड्याच्या कारखान्याचे मालक होते व या कारखान्यात मजुरांना किमान वेतनही मिळत नव्हते. वजीरपुर चे आमदार राजेश गुप्ता व नगरसेवक विकास गोयल यांचे वजीरपुर औद्योगिक वसाहतीत कारखाने आहेत जेथे किमान मजुरी तर सोडाच पण इतरही श्रम कायद्यांची सरळसरळ पायमल्ली केली जाते. जेथे स्वतः आमदार महोदयांच्या कारखान्यातही किमान वेतन मिळत नाही तिथे ते आपल्या इतर कारखानदार बांधवांच्या कारखान्यात कितपत किमान वेतन नियम लागू करणार?

हीच स्थिती आम आदमी पार्टीच्या अन्य आमदारांची आहे कारण केजरीवालांचे निम्म्याहून अधिक आमदार हे कारखानदार, व्यापारी किंवा मोठे दुकानदार असून हे सर्व करोडपती आहेत. यावरून स्पष्ट होते की श्रमिकांबाबत आम आदमी पार्टी व कॉंग्रेस, भाजप यांच्यात कुठलाही फरक नाही. अनौपचारिक व असंघटित क्षेत्रासाठी असलेल्या कायद्यांना तर मालक आणि ठेकेदार जुमानतच नाहीत. दिल्लीतील औद्योगिक क्षेत्रात मजुरांना आजही ५,००० ते ६,००० रुपयेच मिळतात. कोणालाच किमान मजुरी मिळत नाही. शासकीय विभागातही या नियमांचे सर्रास उल्लंघन केले जाते. संपूर्ण देशात शासकीय विभागातही ७० टक्क्यांवर कामगार कंत्राटी तसेच आउटसोर्स केलेल्या प्रोजेक्ट वर तात्पुरत्या स्वरूपात काम करतात. सरकारी खात्यांमध्ये कारकून, शिक्षक, तंत्रज्ञ इत्यादींकडून एका पगाराच्या कागदांवर सह्या घेतल्या जातात आणि प्रत्यक्षात मात्र वेगळाच पगार दिला जातो. वाढत्या बेरोजगारीमुळे नाइलाजाने कामगारही अशा सह्या करतात. कारखानदार कामगारांकडून आधीच कोऱ्या कागदावर अंगठा घेऊन ठेवतो. कामगारांचे ईएसआय आयकार्ड बनवल्यानंतर दोन ते तीन महिन्यात ते रद्द केले जाते व नवीन कार्ड बनविले जाते. असे करण्यामागचे कारण म्हणजे कुठलेही प्रकरण अंगाशी आले तर मालक सरळ सांगू शकतो की संबंधित कामगार अलीकडेच कामावर लागला होता.

ही सर्व परिस्थिती केजरीवालांचे कारखानदार, व्यापारी आणि कोट्यधीश आमदार तसेच करोडपती समर्थकांना ज्ञात आहे. काही दिवसांपूर्वीचा कॅगचा अहवाल ही बाब स्पष्ट करतो की कारखाना अधिनियम १९४८ चे ही पालन दिल्ली सरकारच्या खात्याकडून केले जात नाही. सन २०११-२०१५ या कालावधीत केवळ ११-२५ टक्के नोंदणीकृत कारखान्यांची तपासणी करण्यात आली. या कायद्याचा थोडाफार फायदा संघटित क्षेत्र व सरकारी कर्मचाऱ्यांना होईल पण या क्षेत्रातील लोकांची संख्याही घटत चालली आहे. दिल्लीतील ६५ लाख कामगार लोकसंख्येतील घरगडी, ड्रायव्हर, खाजगी सफाई कर्मचारी यांना नवीन किमान मजुरी नियमाचा फायदा मिळेल का?

९० टक्के श्रमिकांना जे रोजंदारी किंवा कंत्राटी स्वरूपाचे काम करतात त्यांना किमान मजुरी नियमानुसार किमान मजुरी मिळतेय किंवा नाही याची कुठलीही माहिती दिल्लीच्या शासनाकडे नाही आणि निवडणुकीच्या काळात घोषणा करूनही अद्याप कंत्राटी कामगारांचा कायदा लागू होऊ शकलेला नाही. श्रम विभागाची परिस्थिती अशी आहे की त्यांच्याकडे मनुष्यबळाचीच कमतरता आहे. त्यामुळे सर्व कारखान्यांची तपासणी व कामगारांच्या तक्रारींचे निराकरण या खात्यास शक्य नाही.

स्पष्ट आहे की देशाच्या राजधानीतच मजुरांना अशा अमानुष नरकसदृश परिस्थितीत काम करावे लागत असेल तर संपूर्ण देशातील मजुरांची स्थिती काय असेल. तसे तर कागदावर देशातील कामगारांच्या हितासाठी एकूण २६० कायदे अस्तित्वात आहेत, परंतु हे श्रम कायदे वास्तवात 'शरम कायदे' बनून राहिले आहेत.

हा किमान वेतन कायदा हा सर्व मजुरांना लागू झाला आहे अशी अशक्यप्राय गोष्ट थोडावेळ मान्य केली तरीही श्रमिकांच्या जीवनात काही प्रचंड बदल घडून येणार नाहीत. कारण किमान मजुरीचे दर ठरविताना ज्या बाबींआधारे ते ठरवले जातात त्याच तोकड्या आहेत, कारण त्यात फक्त कामगारांच्या भोजनालाच आधार मानले आहे त्यामुळे किमान वेतन पातळी ही प्रत्यक्षात कुपोषण व भूकबळीची पातळी आहे. आज सर्व श्रमिक बांधवांना ही बाब ज्ञात आहे की सर्व श्रम कायदे ठेकेदार आणि मालकांच्या खिशात आहेत. तर दुसरीकडे श्रम विभागातील शिपायापासून अधिकाऱ्यांपर्यंत सगळीकडे मालकवर्ग लाच देऊन काम करून घेतो. या परिस्थितीचे वर्णन 'पैसा फेको तमाशा देखो' असेच करावे लागेल आणि हा धोकेबाजीचा कारभार सर्व नेतेमंडळी व मंत्री अगदी चांगल्या रीतीने जाणून आहेत. कारण दिल्लीतील असे अनेक मोठे नेते आहेत ज्यांच्या स्वतःच्या कारखान्यात कोणताही श्रम कायदा लागू होत नाही.


साथींनो! संघर्ष व बलिदानाच्या आधारे जे कायदेशीर अधिकार आपण मिळवले आहेत, त्यातील बहुतेक आपल्याकडून हिरावले गेले आहेत. जे थोडेफार उरलेले आहेत त्यांचे अस्तित्व फक्त कागदावरच आहे. म्हणून श्रमिकांची खरी मुक्ती श्रमिकांची सत्ता स्थापन झाल्यावरच होईल. त्यासाठी आज सर्व अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करण्यापेक्षा आपण सर्वांनी एकजूट होऊन आपल्या हक्कांची, अधिकारांची लढाई अधिक जोमाने लढली पाहिजे.

अनुवाद - अमित

## कामगारबंधो

✍ नामदेव ढसाळ

हे जग तुझ्या श्रमावर चालले आहे
किती रे करतोस रक्ताचे पाणी
मी तुलाच सर्जनाचा निर्माता मानतो
बाकीच्यांचा हिशोब कशाला?
एकतृतीयांश जगावर रक्ताने रंगलेला ध्वज
फडकावणारा तच
ह्या देशाच्या रक्तधमनीतून वाहणाराही तूच
लोखंडाला वितळवणारा आणि आकार देणाराही तूच
जिथं जिथं यंत्राचा वावर झाला त्या शहरांना
क्रांतिकारक वारसा देणाराही तूच
तुझे घामेजलेले स्नायूबद्ध चित्र मी माझ्या
कवितेत प्रतिमेसाठी वापरतो.
माझ्या कवितेला सप्राण करतो.
तिचा आणि तुझा सन्मान करतो.
मला माहिताहे की तूच लढू शकतोस
गुलामगिरीविरुद्ध
मला माहिताहे की तूच पर्दाफाश करू शकतोस
सरंजामशाहीचा
मला माहिताहे की तूच मूठमाती देऊ शकतोस
भांडवलशाहीला
मला माहिताहे की तूच वितरणासाठी वापरू शकतोस
शासनयंत्रणा
तुझा मी स्तुतिपाठक भाट
त्यांच्या लेखी मी देशद्रोही आणि गुन्हेगार
ते वल्गना करताहेत माझ्या घरावरून नांगर
फिरवण्याची
कामगारबंधो!
ज्या हिटलरचं थडगं तू बांधलंस
त्या थडग्याचाच ह्या कुत्र्यांना विसर पडलाय.



# लेक वाचवा, भाजपवाल्यांपासून!!!

## भाजप नेत्यांच्या दुष्कृत्यांची शिकार झाली आणखी एक मुलगी!

✍ रुपा

'बेटी के सम्मान में, भाजपा मैदान में, आणि 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' सारख्या प्रभावी घोषणांच्या कोलाहलात ह्या देशाच्या लेकींसोबत होणाऱ्या क्रूरतेला लपविण्याचे सर्व प्रयत्न सुरू आहेत. परंतु 6 वर्षांत स्त्रियांविरोधी झालेल्या अपराधांचे आकडे ओरडून ओरडून सांगत आहेत की भाजपा सरकारचे हे पोकळ नारे केवळ मतं गोळा करण्यासाठी केलेलं एक नाटक आहे. कठुआ आणि उन्नाव सारख्या क्रूर, मानवताद्रोही, स्त्री विरोधी घटनांची आठवण अजून ताजीच आहे की एक नवी घटना आपल्या समोर आहे.

ही घटना शाहजहाँपुर मधील आहे. संतांच्या गोटातून येणाऱ्या आणि भाजपचे माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री असलेल्या स्वामी चिन्मयानंद याच्यावर वकिलीचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. चिन्मयानंदवर असा आरोप पहिल्यांदा लागलेला नाही, यापूर्वी देखील त्याच्या आश्रमातील अनेक स्त्रियांवर झालेल्या लैंगिक शोषणाच्या बातम्या आलेल्या आहेत. 2011 मध्ये देखील एका साध्वीने त्याच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप लावला होता. त्या प्रकरणात त्याच्यावर आरोपपत्र सुद्धा दाखल झाले होते, पण योगी आदित्य महाराजांच्या कृपेने मागच्या वर्षी तो निर्दोष सुटला होता. चिन्मयनंद आणि योगी आदित्यनाथ यांच्या जवळच्या संबंधांचा एक मोठा इतिहास आहे. 1980 च्या दशकात राम मंदिर आंदोलनाच्या दरम्यान चिन्मयानंदने योगी आदित्यनाथ चे गुरू असलेल्या महंत अवैद्यनाथ बरोबर खांद्याला खांदा लावून काम केले होते. दोघांनी मिळून 'राम जन्मभूमी मुक्ती संघर्ष समिती' ची स्थापना केली होती. पुढे चिन्मयानंदने योगीच्या 'हिंदु युवा वहिनी' नामक भगव्या दलाचे काम शाहजहाँपुरमध्ये सुरू केले.

कठुआ आणि उन्नाव प्रकरणांत ज्या प्रकारे ह्या फॅसिस्टांनी गुन्हेगारांना वाचविण्याचा, त्यांच्या दुष्कृत्यांवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला ते आपल्या सर्वांनाच माहिती आहे. तरीदेखील शाहजहाँपुर मधील ही शूर मुलगी स्वतःसोबत झालेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवते आणि याचा परिणाम काय होतो? तक्रार दाखल झाल्यानंतर सुद्धा चिन्मयानंदला अटक झाली नाही जेव्हा की सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश आहे की बलात्कारासारख्या प्रकरणांत तक्रारी नंतर लगेच अटक झाली पाहिजे. त्यानंतर ही मुलगी स्वतःची चित्रफित बनवून सर्वत्र पसरवते, शिवाय स्वतः पुढे येऊन पत्रकार परिषद बोलावते, आत्मदहन करेल म्हणून सांगते तेव्हा कुठे जाऊन चिन्मयानंदला अटक होते, पण बलात्काराच्या गुन्ह्याखाली तक्रार नोंदवली जात नाही. अशाप्रकारे त्या मुलीची हिंम्मत तोडण्याचा प्रयत्न केला जातो, परंतु ती हार मानत नाही.

चिन्मयानंदने स्वतः हे स्विकारले आहे की त्याने असे दुष्कृत्य केले; तरी देखील त्याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला जात नाही, पोलीस खात्यातील एक वरिष्ठ अधिकारी त्याला स्वतःच्या गाडीत बसवून दवाखान्यात घेऊन जातो. दुसरीकडे जेव्हा मुलीला घाबरविण्यासाठी तिच्यावर स्वामी चिन्मयानंद कडून पैसे मागण्याचा खोटा आरोप लावला जातो, तेव्हा पोलीस तिला बळजबरी घरातून घेऊन जातात, तिला व्यवस्थितरित्या कपडे घालण्याची संधी सुद्धा देत नाहीत! पोलीस प्रशासनाचा हा घृणास्पद चेहरा इथेच उघड होतो. पोलीस प्रशासनाची ही पक्षपाती वागणूक हे दाखवून देते की ते वास्तवतः कुणाची सेवा करतात. एकीकडे बलात्कारी दवाखान्यात मजा मारतोय आणि दुसरीकडे पिडीतेला तुरुंगवासात पाठवले जाते. लगेचच प्रसार माध्यमांचे सूर देखील बदलतात. ह्या बातमीला खूप तिखट-मीठ लावून सादर केले जाते आणि चिन्मयानंदच्या गुन्ह्याला सौम्य करून प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला जातो.

उन्नाव आणि कठुआ येथे देखील हेच झाले होते. उन्नाव येथील भाजपाचा आमदार कुलदीप सिंह सेंगर याला घटनेच्या 13 महिन्यांनंतर अटक झाली. सर्वप्रथम पीडितेच्या वडिलांना तुरुंगात छळ करून जिवानिशी मारून टाकण्यात आले. त्यांनतर तिच्या संपूर्ण कुटुंबाला रस्त्यावर अपघातात मारून टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि उत्तर प्रदेशातील फॅसिस्ट सरकार गुपचूप बघत राहिले. कठुआतील घटनेला देखील अजून फार काळ लोटला नाही. तिथे ह्या फॅसिस्टांनी तिरंगा घेऊन गुन्हेगारांच्या समर्थनात फेरी काढली होती. तोंडाने रामाचे नाव घ्यायचे आणि वास्तविकतेत गुन्हेगारांना, बलात्काऱ्यांना उत्तेजन द्यायचे ही यांच्यासाठी मोठी गोष्ट नाही.

मागील वर्षी देवरिया, मुजफ्फरपूर मधील बालिका संरक्षण गृहात मुलींसोबत झालेल्या दुष्कृत्याबाबतीत अनेक भाजपा नेत्यांची नावे आली. इतक्यातच एक भाजपा नेता एका सेक्स रॅकेट मध्ये पकडला गेला. आपल्यासमोर अनेक उदाहरणे आहेत जे हे सिद्ध करतात की फॅसिस्टांच्या भाजपा सरकारच्या लेखी ह्या देशातील लेकीं च्या संरक्षणाचे काहीच महत्व नाही. संरक्षण तर लांबची गोष्ट आहे, हे स्वतःच मुलींचे सर्वात मोठे शत्रू आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (ए.डी.आर.) च्या एका अभ्यासाने हे स्पष्ट केले आहे की देशभरात स्त्रियांवर होणाऱ्या घृणास्पद अत्याचारांमध्ये भाजपाचे आमदार आणि खासदार पहिल्या नंबरवर आहेत.

खरे पाहता असल्या गुन्हेगारांना, बलात्काऱ्यांना उत्तेजन देणे, गुन्ह्यांवर पांघरुण घालणे हे फॅसिस्टांच आताचं काम नव्हे, तर याचा एक संपूर्ण इतिहास राहिला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हिंदुत्वाचे विचारवंत सावरकर यांनी देखील स्वतःच्या 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने' ह्या पुस्तकात हिंदू पुरुषांकडून मुस्लिम स्त्रियांवर करण्यात येणाऱ्या बलात्कारांना न्याय्यसंमत ठरवले होते. दिल्लीत जेव्हा निर्भया प्रकरण घडले होते तेव्हा मोहन भागवतां पासून ते भाजप च्या अनेक प्रतिष्ठित नेत्यांनी खालच्या दर्जाचे वक्तव्य केले होते जे सगळ्या बाजूने अश्या दुष्कृत्यांसाठी मुलींनाच जबाबदार ठरवत होते आणि स्त्रियांना घर-गृहस्थीच्या चार भिंतीत बंदिस्त करण्याचं समर्थन करणारे होते.

जर तुम्ही विचार करत असाल की आज ही तुमच्या मुली सुरक्षित आहेत तर ह्या गैरसमजात राहू नका कारण फॅसिस्ट कधीही काहीही करू शकतात. जेव्हा कायदा बनवणारेच संसदेत बसून अश्लील सिनेमा बघतांना पकडले जातात, तेव्हा त्यांच्याकडून स्त्री सुरक्षिततेची अपेक्षा ठेवणं म्हणजे स्वतःला धोका देण्यासारखे आहे. 'बेटी के सम्मान मे भाजपा मैदान में' ह्या घोषणेची वास्तविकता ह्यावरून समजून घेतली जाऊ शकते की 'निर्भया फंड' साठी जी रक्कम जमा झाली होती त्याचा एक तृतियांश भाग देखील आजतागायत सरकार खर्च करू शकलेली नाही. जेव्हा की अशा घटना दिवसागणिक वाढतच आहेत.

हिंदुत्वाचे हे पहारेकरी, जे स्त्रियांना मुलं जन्माला घालण्याचे यंत्र व पुरुषांची दासी समजतात, त्यांच्याकडून ही अपेक्षाच केल्या जाऊच शकत नाही की ते मुलींच्या सुरक्षिततेसाठी ठोस पाऊलं उचलतील. मुलींच्या सुरक्षिततेची घोषणा केवळ मतांसाठी केलेले नाटक आहे. ह्यांचे राजकारण समाजातील पितृसत्ताक विचारांना प्रोत्साहन देण्याचे काम करते आणि ह्यांच्या रुग्ण मानसिकतेला दर्शवते. आज गरजेचे आहे की आपण त्या प्रत्येक घटनेच्या विरोधात रस्त्यावर उतरायला हवे आणि प्रत्येक स्त्री विरोधी विचाराला आव्हान द्यायला हवे. कारण आज आपण जागे झालो नाही तर हे दुष्ट फॅसिस्ट आपल्या प्रत्येक दुष्कृत्याला कायदेशीर ठरविण्यात यशस्वी होतील.

अनुवादः पूजा

## पीएमसी बँकेतील घोटाळा आणि बँक व्यवस्थापन व भांडवलदारांचे गलिच्छ राजकारण

✍ जयवर्धन

देशात मंदीचे वातावरण असतांना ऑक्टोबर महिन्यात उघडकीस आलेल्या पीएमसी बँकेतील घोटाळ्यामुळे देशातील जनतेवर चिंतेचे सावट पसरले आहे. आपला पैसा बँकेत सुरक्षित नाही अशी भीती नागरिकांना वाटत आहे. पीएमसी बँकेतील घोटाळा उघडकीस आल्यानंतर खातेधारकांनी स्वतःचे पैसे बँकेतून काढण्यासाठी एकच गर्दी केली होती, परंतु त्यांना स्वतःचे कष्टाचे पैसे बँकेतून काढण्यासाठी मज्जाव करण्यात आला आणि निर्बंध लादण्यात आले. आपल्याच कष्टाचा पैसा गरजेच्या वेळी आपल्याला मिळत नाही हे बघून नागरिक पण हवालदिल झाले. आधीच देशात मंदी आणि बेरोजगारीचे संकट असतांना ह्या घोटाळ्यामुळे खातेधारकांवर दुहेरी संकट कोसळले.

**पीएमसी बँकेविषयी थोडेसे**

पंजाब अँड महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह बँक (पीएमसी) 13 फेब्रुवारी 1984 ला स्थापन झाली. सहकारी बँक म्हणून ही नावारूपाला आली आणि देशातील पहिल्या 10 सहकारी बँकांत पीएमसी ला स्थान मिळाले. 11,600 कोटी रुपये एवढी बँकेची जमापुंजी आहे. गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दिल्ली सहित देशातील 6 राज्यात 137 शाखांमध्ये ही बँक पसरली आहे.

**असा झाला घोटाळा**

हाऊसिंग डेव्हलपमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एचडीआयएल) ही बांधकाम क्षेत्रातील एक मोठी कंपनी आहे. म्हणजे जणू एक मोठी बिल्डरच! पीएमसी बँकेचा माजी अध्यक्षच स्वतः "हाऊसिंग डेव्हलपमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड" म्हणजे एचडीआयएल च्या संचालक मंडळावर होता! पीएमसी बँकेने त्यांच्या एकूण कर्जरकमेपैकी म्हणजे 8,880 कोटी रुपयांपैकी 6,500 कोटींचे कर्ज एकट्या हौसिंग डेव्हलपमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एचडीआयएल) ह्या कंपनीला दिले आहे. ही रक्कम एकूण कर्जरकमेच्या तब्बल 73 टक्के एवढी भरते. बडतर्फ आणि नंतर अटक करण्यात आलेले बँकेचे व्यवस्थापकीय संचालक जॉय थॉमस यांनी कबुली दिली की त्यांनी 44 लोन खाती लपविण्यासाठी 21049 खाती बोगस नावांनी तयार केली.

अशाप्रकारे एचडीआयएलच्या मदतीसाठी पीएमसी बँकेच्या अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे 44 गुप्त खाती बनवली आणि ही खाती गोपनीय पद्धतीनं चालवली जात असल्याचे चौकशीत समोर आले. रिझर्व्ह बँकेच्या ऑडिटमध्ये ही खाती दाखवली गेली नव्हती. ह्या कर्जाची एचडीआयएल कडून परतफेड होत नाहीये आणि हे कर्ज अनुत्पादित कर्जामध्ये बदललेले आहे ही माहिती रिझर्व बँकेपासून दडवून ठेवण्यात आली. क्रेडिट विभागाच्या महिला कर्मचाऱ्यांनी बोगस खात्यासंबंधीची माहिती रिझर्व्ह बँकेला दिल्यानंतर हा सर्व घोटाळा उघडकीस आला. आधी घोटाळ्याची रक्कम 4,355 कोटी सांगितल्या जात होती परंतु नंतरच्या चौकशीत ही रक्कम 6,500 कोटींपेक्षाही वर असल्याचे समोर आले. रिझर्व्ह बँकेने त्वरित खातेधारकांच्या पैसे काढण्यावर बंधने आणली आणि बँकेत प्रशासकाची नेमणूक केली. सहा महिन्यातून एकदा केवळ 1,000 रुपये काढता येणार असा नियम केल्यानंतर खातेधारकांचा रोष लक्षात घेऊन ती मर्यादा पुढे फक्त 10,000 रुपये आणि नंतर 25,000 रुपये एवढी करण्यात आली. कुणीही व्यक्ती हे सहज समजू शकतो की ज्या लोकांनी आयुष्यभर मेहनत करून आपला पैसा बँकेत जमा केला जेणेकरून अडी-अडचणीला आणि भविष्यात त्यांना ही बचत कामाला येईल, त्यांच्यासाठी हा नियम किती धक्कादायक असेल. कुणाला वेळेवर दवाखान्यात जायला पैसे राहले नाही म्हणून मृत्यू ओढवला तर काहींना जगण्यासाठीच पैसे राहिले नाहीत या चिंतेने तर काहींना भविष्यात आपले काय होईल या चिंतेने ग्रासले. बऱ्याच जणांचे तणावाखाली येऊन आणि इतर कारणांनी मृत्यू ओढवले.

या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला आदेश दिला की पुढची दिशा काय असेल यासंदर्भात न्यायालयाला माहिती सादर करावी. त्यासंबंधीची सुनावणी 19 नोव्हेंबर ला होईल असे न्यायालयाने सांगितले. 19 नोव्हेंबर ला काही सकारात्मक निर्णय लागेल या आशेने मोठ्या संख्येने खातेधारक न्यायालयाच्या आवारात जमले. स्वतःच्या मेहनतीचे खात्यातील पैसे त्यांना काढता यावे यासाठी त्यांनी कोर्टाच्या आवारात घोषणाबाजी करत "हमारा पैसा वापस दो", "आरबीआय चोर है" ह्या घोषणा दिल्या. परंतु न्यायालयाने ही सुनावणी 4 डिसेंबर पर्यंत पुढे ढकलली.

**बँका आणि भांडवलदारांचे संगनमत! सामान्य जनतेचे मरण!**

ह्या सर्व प्रकरणावरून आणि याआधीही नीरव मोदी, विजय मल्ल्या, मेहुल चोक्सी इत्यादी

पान 10 वर

# अयोध्या निकाल : कायदा नव्हे, श्रद्धेच्या नावावर बहुसंख्यांकवादाचा विजय

## कष्टकरी जनतेचा काय दृष्टीकोन असावा?

सुप्रीम कोर्टाने जेव्हा अचानक रोज अयोध्या प्रकरणावर सुनावणी घेणे सुरु केले तेव्हाच हे लक्षात यायला लागले की निकाल कोणत्या प्रकारचा असणार आहे. मागच्या काही वर्षांत न्यायपालिका ज्या प्रकारे मोदी सरकारची चाकरी करत आहे, ते बघून सुद्धा न्यायप्रिय लोकांना कुठल्याच निष्पक्ष निकालाची अपेक्षा नव्हती. भाजपचे काही अति-उत्साही नेते तर अगोदरच बोलायला लागले होते की सुप्रीम कोर्ट "त्यांचच आहे" त्यामुळे निकाल सुद्धा "त्यांच्याच बाजूचा" येणार आहे.

आता काही लोक असे म्हणत आहेत की हा निकाल सगळ्यांनी स्वीकारला पाहिजे व जुन्या गोष्टींना विसरून पुढे चालायला पाहिजे. पण हे लोक विसरत आहेत की खरेतर, हा श्रद्धेचा प्रश्नच नाहीये! सुरुवातीपासूनच राम मंदिर हा राजकीय विषय होता आणि आज पण तो राजकीय विषयच आहे. १९९२ मध्ये बाबरी मस्जिद कोसळताना "अभी तो बस ये झाँकी है, मथुरा-काशी बाक़ी है" असे नारे लावण्यात आले होते. या निकालानंतर आता जामा मस्जिद पासून तर ताज महालाच्या खाली सुद्धा हिंदू मंदिर असण्याच्या गोष्टी आता भाजपई लोकं करीत आहेत. वाराणसी मध्ये शेकडो मंदिरे व घरे तोडून जी गल्ली बनवल्या गेली आहे, त्यावर पण अनेकांनी प्रश्न उपस्थित केला आहे की याचा उपयोग विश्वनाथ मंदिर ते ज्ञानव्यापी मशिदी पर्यंत पोहोचण्याचा रस्ता साफ करण्यासाठी केला गेला आहे, जेणेकरून भविष्यात संघींच्या घाणेरड्या उद्दिष्टासाठी याचा उपयोग करता येईल. अशा वातावरणात सुप्रीम कोर्टाने बहुसंख्यांकांच्या श्रद्धेच्या नावाखाली गुंडगिरीवर शिक्कामोर्तब केले आहे. कोर्टाने एका तऱ्हेने, 'जिसकी लाठी उसकी भैंस' असेच म्हटले आहे व भविष्यासाठी अतिशय घातक असे एक उदाहरण उभे केले आहे.

हा पण प्रश्न विचारला गेला पाहिजे की आज एवढ्या घाई-गडबडीने हा निकाल का दिला गेला आहे? थोडं लक्षपुर्वक बघितलं तर आपल्याला आठवेल की जेव्हा-जेव्हा मंदिर-मशिदीच्या विषयाला भडकावण्यात आले, तेव्हा-तेव्हा देश कुठल्या ना कुठल्या आर्थिक किंवा राजकीय संकटात होता. १९४९ साली जेव्हा काही धर्मवादी घटकांनी बाबरी मशिदीच्या घुमटाखाली रामाच्या मूर्त्या ठेवल्या होत्या, त्या वेळेस स्वातंत्र्यानंतर देशाची भांडवली सत्ता अजून स्थिर होण्याच्या मार्गावर होती, व देशभरात शेतकऱ्यांचे संघर्ष सुरु होते. देश दारिद्र्यात होता. दुसरीकडे, गांधींच्या हत्येनंतर आर.एस.एस. पूर्णपणे अलिप्त पडला होता व हिंदूंमध्ये जम बसविण्याचा प्रयत्न करीत होता. १९८६ मध्ये सुद्धा जेव्हा मशिदीचे कुलूप उघडण्यात आले व नंतर पायाभरणी करण्यात आली, तेव्हा सुद्धा देश तीव्र आर्थिक संकटात होता, बेरोजगारी अतिशय मोठ्या प्रमाणात वाढली होती, महागाई गगनाला भिडलेली होती व विदेशी कर्जात देशाची अर्थव्यवस्था बुडायला लागली होती. त्यानंतर पुन्हा जेव्हा १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला मंदिराचा विषय समोर आणण्यात आला, तेव्हा देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे अस्थिर झालेली होती; देशातील सोन्याचा साठा गहाण ठेवण्यात आला होता; महागाईचा आकडा आकाश पार करून गेला होता; बेरोजगारी, भ्रष्टाचार व गरिबी मुळे देशभरातील लोक भयंकर संतप्त होते.

जनतेच्या जगण्यावर वाईट परिणाम करणाऱ्या या सर्व गोष्टींवरून जनतेचं लक्ष दूर करणे ही या सर्व वेळी शासक वर्गाची गरज होती. याचसाठी धार्मिक उन्मादाचा वापर वेळोवेळी करण्यात आला. हे सांगण्याची गरज नाहीये की आज सुद्धा देश अशाच परिस्थितींमध्ये आहे. अर्थव्यवस्था अभूतपूर्व संकटाच्या कचाट्यात आहे. बेरोजगारी व महागाईमध्ये मोठी वाढ झालेली आहे. उद्योग, व्यापार, शेती सर्वकाही संकटात आहेत. देशभरातील विद्यार्थी-युवक, कामगार, शेतकरी, कर्मचारी सर्वच आंदोलनाच्या वाटेवर आहेत. जनतेच्या त्या गटावरसुद्धा आर्थिक संकटाचा मार पडतो आहे, जे मोदीचे समर्थक राहिले आहेत, व त्यांचापण धीर आता संपत आहे. कुठल्याच समस्येचं वास्तविक उत्तर या सरकार कडे नाही. उलट, देशातील संपत्ती दोन्ही हातांनी हे सरकार देशी विदेशी दरोडेखोर भांडवलदारांना वेगाने वाटत आहे. घोटाळ्यांचे व भ्रष्टाचाराचे सर्व रेकॉर्ड तुटत आहेत. गोदी मिडिया द्वारे लोकांना दिवसरात्र मूर्ख बनवता येऊ शकते, यावर संघींचा पण आता विश्वास राहिलेला नाही. अशा परिस्थितीत हा निकाल त्यांच्या हाती पुन्हा एक शस्त्र आहे, ज्याचा वापर करून अजून काही वर्ष लोकांना ते भ्रमात ठेवू शकतात, हा त्यांचा विचार आहे. त्यांना वाटते की कधी मंदिर निर्माणासाठीचा ट्रस्ट बनवून, तर कधी याची भव्य-दिव्य पायाभरणी करून, तर कधी मंदिर निर्माणाची सुरुवात करून ते पुढील अनेक वर्षे याची फळे चाखू शकतात, व पुढची लोकसभा निवडणूक पण ते जिंकू शकतात. पण संघींचे हे विचार यशस्वी होतीलच असे आवश्यक नाही.

**कोर्टाच्या निकालाचे कामगार वर्गीय विश्लेषण**

एक नजर आता या निकालावर टाकूयात. या निकालाने भांडवली मिडियाला आनंदाचे भरते आले आहे. ते याला लोकशाहीचा विजय म्हणून दाखवत आहेत. भांडवली मिडिया अपेक्षेप्रमाणेच त्यांचे कार्य पूर्ण करत आहे—ते म्हणजे भांडवलशाहीच्या बाजूने जनतेचे मत बनवणे. परंतु आता हे उघड आहे की ते जे काही बोलत आहेत, सत्य त्याच्या पूर्ण विरुद्ध आहे!




तथ्य हे आहे की भांडवली कायदा व संविधानाची जी मूळ तत्व आहेत त्यांना खुंटीला टांगून सुप्रीम कोर्टाने "बहुसंख्य हिंदूंच्या भावना" लक्षात घेऊन हा निकाल दिला आहे. एवढंच नव्हे तर स्वतः सुप्रीम कोर्टानेच स्वतःच्याच निकालपत्रामध्ये मूर्त्या ठेवण्याबद्दल, बाबरी मशिद पाडल्याबद्दल, पुरातात्विक साक्षी इत्यादींबद्दल ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांच्याच विरुद्ध जाऊन एक असा निर्णय दिला आहे जो न्यायाच्या दृष्टीनेच कुठल्याच पद्धतीने योग्य आहे असे म्हणता येणार नाही.

सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती अशोक गांगुली म्हणाले होते त्याप्रमाणे संविधान लागू होण्याअगोदर तिथे काय होते ही कोर्टाची जबाबदारी नाही. ती इमारत जेव्हा बनली तेव्हा भारत एक प्रजासत्ताक गणराज्य नव्हते. तेव्हा तिथे एक मशिद असेल, मंदिर असेल, बौद्ध स्तूप असेल, किंवा अजून काही असेल. या प्रकारे भूतकाळातील प्रश्नांवर जर निकाल द्यायचा अस ठरवले तर अनेक मंदिर, मशिद व इतर धर्मस्थळे तोडावे लागतील. आपण पुराणातील तथ्यांवर विश्वास ठेवू शकत नाही. राम कोण होता? याला काही ऐतिहासिक प्रमाण आहे का? हा श्रद्धेचा व विश्वासाचा विषय आहे. यावर कोर्टात निर्णय होत नसतात.

न्यायमूर्ती गांगुलींच्याच मते, "सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की श्रद्धेच्या व विश्वासाच्या आधारावर तुम्हाला प्राधान्य नाही मिळू शकत. ते सांगत आहे की मशिदीच्या खाली इमारत होती पण ती इमारत मंदिर होती हे सांगता येणार नाही. आज कोणी सांगू शकत नाही की खरच मंदिराला पाडून मशिद बनवली होती, परंतु आता मशिदीला पाडून मंदिर बनताना सगळेच बघतील."

हा निकाल किती विचित्र आहे, हे काही उदाहरणांवरून दाखवता येईल. निकालात सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की बाबरी मशिद १५२८ साली बांधली होती. भारतीय पुरातत्वीय सर्वेक्षण (ए. एस. आय.) च्या २००२-०३ च्या रिपोर्टचा संदर्भ देऊन सुप्रीम कोर्टाने हे पण सांगितले की मशिद एका मंदिराला पाडून बनवण्यात आली होती याचे कुठलेच प्रमाण नाही. कोर्टाने हे पण सांगितले की १९३४ साली मशिदीला नुकसान पोहोचवण्यात आले होते. हे सुद्धा मान्य केले की १९४९ साली मशिदीमध्ये मूर्त्या ठेवून काही लोकांनी अन्यायाचे कार्य केले. मग हे सुद्धा सांगितले की १९९२ साली मशिदीला पाडणे चुकीचे होते! निकालाच्या परिच्छेद ७९८ मध्ये सांगितले आहे की "मुसलमानांना पूजा व त्या स्थळापासून बहिष्कृत करण्याचे काम २२-२३ डिसेंबर १९४९ ला रात्री करण्यात आले, जेव्हा हिंदू मूर्त्या ठेवून मशिदीला अपवित्र करण्यात आले. मुसलमानांना तिथून बाहेर करण्याची प्रक्रिया कुठल्याच न्यायपूर्ण पद्धतीने झाली नाही आणि त्यांना एका अशा मशिदी पासून चुकीच्या पद्धतीने वंचित ठेवण्यात आले, जी ४५० पेक्षा जास्त वर्षांपूर्वी निर्माण झाली."

सुप्रीम कोर्टाने म्हटले की १८८५ साली राम चौथरा हे रामाचे खरे जन्मस्थान मानण्यात आले होते. हे सुद्धा म्हटले की १८५७ साली आतल्या व बाहेरच्या परिसराला इंग्रजांनी भिंत बांधून वेगळे केले. आतल्या परिसरात मशिद प्रबंधनाचा ताबा व अधिकार होता. राम चौथरा बाहेरच्या भागात आहे. कोर्टाने हे पण मान्य केले की राम चौथऱ्यावर मंदिर बनविण्याच्या दाव्याला १८८५ साली कोर्टाने नकार दिला होता. हे पण सांगितले की १९९२ साली मशिदीसोबत राम चौथरा सुद्धा तोडण्यात आला होता.

ए. एस. आय. ने कोर्टाला ५७४ पानांचा रिपोर्ट सादर केला होता. अयोध्येमध्ये खोदकामात लागलेल्या पुरातत्वज्ञांमध्ये कधी सर्वसंमती होऊ शकली नाही. त्यामुळेच अनेक प्रकारचे दावे करण्यात आले आहेत. काहींनी सांगितले की मशिदीच्या खालचे अवशेष एक 'जुना इदगाह' आहे, तर काहींनी त्याला बौद्ध व जैन प्रतीक सांगितले. शोध घेणाऱ्या टीम चे निरीक्षण करणाऱ्या सुप्रिया वर्मा व जया मेनन यांनी हाय कोर्टात सांगितले की काही अवशेष बौद्ध, जैन किंवा इस्लामिक सुद्धा असू शकतात, तरी त्यांना 'हिंदू प्रतिक' सांगितले जात आहे. ए.एस.आय.च्या रिपोर्टचे संदर्भ देऊन सुप्रीम कोर्टाने आपल्या निकालात सांगून टाकले की मशिदीखालचा अवशेष एक 'हिंदू अवशेष' आहे. खरंतर कोर्टाने सुद्धा हे नाही सांगितले की तो राम मंदिराचा अवशेष आहे.

इतक्या गोष्टींनंतरही बहुसंख्य हिंदू ती जागा रामाचे जन्मस्थान मानतात या आधारावर शेवटी त्या जागेवर मंदिर बनवण्याचा निकाल देण्यात आला. तसं तर प्रश्न हा सुद्धा विचारायला पाहिजे की कोर्टाने कुठल्या सर्वेक्षणानुसार ही माहिती काढली की बहुसंख्य हिंदू हेच मानतात. कोर्टाने भाजप व संघाच्या मतालाच बहुसंख्य हिंदूंचे मत म्हणून गृहीत धरले का? निकालात हे सुद्धा सांगण्यात आले की मुस्लिमांची मशिद पाडून त्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यामुळे थोडे दूर मशिद बांधण्याकरिता त्यांना ५ एकर जमीन देण्यात यावी. न्यायाच्या दृष्टीकोनातून ही गोष्ट अशीच झाली, की कोणीतरी दुसऱ्याचे घर जबरदस्तीने तोडून टाकले आणि त्यावर कोर्ट सांगतय की ज्याचे घर होते त्यावर अन्याय झाला, पण ज्याने घर तोडलं त्याचा विश्वास होता की ते त्याचेच घर होते, त्यामुळे तोडणाऱ्याला ते घर देण्यात यावे, व ज्याचे घर तुटले त्यावर अन्याय झाल्यामुळे त्याला जवळच दुसरे घर बांधण्यासाठी जागा देण्यात यावी. जर न्यायाऐवजी अशा दादागिरी नुसार समाज चालत असेल, तर विचार करू शकतो की परिणाम काय होणार.

**आपला दृष्टीकोन काय असावा?**

कष्टकरी कामगार वर्गाचा दृष्टीकोन काय असावा हे बघतांना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आपण या जाळ्यात फसताच कामा नये की राम होते की नाही? जर होते तर त्यांचा जन्म नेमका कुठे झाला? बाबरी मशिद मंदिराला तोडून बनविण्यात आली होती का नाही? कारण असले प्रश्न खरंतर प्रश्नच नाहीयेत. हे जर प्रश्न मानले तर हिंदू धर्मवादी शक्तींच्या तर्कांवर सुद्धा प्रश्न उपस्थित करता येतील. कितीतरी हिंदू मंदिर बौद्ध पूजा स्थळांना तोडून बनवले गेले आहेत. ऐतिहासिक प्रमाणांनुसार अयोध्येतच अशी अनेक मंदिरं आहेत जी बौद्धांचा नरसंहार करून, त्यांचे मठ तोडून बनवली गेली आहेत. मग आता ती मंदिरे तोडून पुन्हा बौद्ध मठ बनवायचे? अयोध्येतच किमान एक डझन अशी मंदिरं आहेत जी रामाचे खरे जन्मस्थान असण्याचा दावा करतात. त्यांचे काय होणार? अशा अजून मशिदी असतील ज्या सुद्धा मंदिरांना किंवा दुसऱ्या धार्मिक स्थळांना तोडून किंवा त्यांच्या अवशेषावर बनवल्या गेल्या असतील. तर आता काय त्या सर्व तोडून पुन्हा मंदिर बनवायचे? मध्यकाळात ही फार स्वाभाविक गोष्ट होती. तेव्हा राज्याचा आधारच धर्म होता, त्यामुळे प्रत्येक राजा आपल्या साम्राज्याला स्थापित करण्यासाठी आपल्या धर्माला स्थापित करणे सुद्धा गरजेचे समजायचा. जगभरात त्या काळात धार्मिक स्थळे तोडण्यात आली. पण इतिहासाच्या चाकाला असे उलट्या दिशेने फिरविण्याचे काम पहिल्यांदाच झाले आहे.

खरतर प्रश्न हा नाहीच. इतिहासात घडलेल्या

पान 12 वर

# एन.पी.आर., एन.आर.सी., सी.ए.ए. विरोधात देशभरात लोक रस्त्यांवर!

पान 1 वरून

हिंदू तामिळ, ब्रह्मदेशातील रोहिंग्या हिंदू आणि मुस्लिम, अशा प्रताडित लोकांसाठी हा कायदा का नाही? उत्तर स्पष्ट आहे: या कायद्याद्वारे मुस्लिमांना वेगळे लेखून ते देशाचे ध्रुवीकरण करु पहात आहेत. 'नागरिकता सुधार कायदा'हा राज्यघटनेच्या कलम 14 चे सरळ उल्लंघन करतो जे कायद्यासमोर सर्व समान आहेत अशी भूमिका मांडते. हा मानवाधिकारांच्या स्थापित मानदंडांचेही उल्लंघन करतो. हिंदू राष्ट्र बनवण्याच्या आपल्या अजेंड्याला लादण्याच्या प्रयत्नात संघ आणि भाजप हे नागरिकतेची व्याख्याच बदलू पहात आहेत.

'मानवतेचा' खोटा आव आणत मानवद्रेषी फॅसिस्टांनी हा कायदा बनवला आहे. देशाची गुप्तहेर यंत्रणा आयबी नुसार ज्यांना या कायद्याचा फायदा होईल ते फक्त 31हजार लोक आहेत. परंतु आपण भ्रमात राहू नये. कारण या कायद्याच्या कचाट्यात ते हिंदू सुद्धा येतील जे हे सिद्ध करु शकणार नाहीत की ते या तीन देशांमधून भारतात 2014 च्या अगोदर आले आहेत.

सी.ए.ए. एका बाजूला विभाजनकारी आहे, तर दुसरीकडे येऊ घातलेला एन.आर.सी. हा तर गरिब कष्टकरी-कामगार विरोधी असा संहारक कायदाच म्हटला पाहिजे. एन.आर.सी. चे उद्दिष्ट प्रत्येक नागरिकाची नोंदणी करणे आहे आणि त्यासाठी आपल्यालाच सिद्ध करावे लागेल की आपण या देशाचे नागरिक आहोत. नागरिकता सिद्ध करण्यासाठी देशाच्या संपूर्ण लोकसंख्येलाच वेठीस धरले जाईल! फक्त मुसलमानच नाहीत तर सर्व हिंदू आणि इतर धर्मांच्या लोकांनाही एन.आर.सी. मध्ये नागरिकता सिद्ध करावी लागेल. यामध्ये सर्वाधिक बाधित होणार ते गरिब कष्टकरी कामगारच, कारण याच वर्गाकडे अपुरी कागदपत्रे असतात किंवा नसतात! या एन.आर.सी.ची सुरुवात होत आहे 1 एप्रिल पासून सुरु होणाऱ्या एन.पी.आर. द्वारे! एन.पी.आर. म्हणे राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर, या साठी घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती गोळा केली जाईल आणि त्या आधारावर एन.आर.सी. यादी बनवली जाईल. ज्यांची नावे या यादीत येतील त्यांना पुढील अनेक वर्षे विविध लायनींमध्ये लागून नागरिकत्वासाठी अर्ज विनंत्या कराव्या लागतील आणि सिद्ध करू न शकल्यास त्यांची रवानगी डिटेंशन सेंटर म्हणजे बंदीगृहांमध्ये होईल.

### आसाम मध्ये एन.आर.सी. चा अनुभव आणि धडे

तुम्हाला माहित हवे की केंद्रात आणि आसाम मध्ये भाजप सरकार असताना सर्वोच्चन्यायालयाच्या आदेशाने आसाम मध्ये एन.आर.सी. लागू केले गेले, ज्यामध्ये 19 लाख लोकांना नागरिकत्वापासून बेदखल केले गेले आहे, आणि त्यात 13 लाख हिंदू आहेत. यामध्ये फक्त तेच लोक नाहीत जे युद्ध, दंगल किंवा रोजगार शोधत आपल्या देशात आले होत, तर ते सुद्धा लोक आहेत जे भुमिहीन आहेत आणि नागरिकता सिद्ध करू शकलेले नाहीत. आसाम मध्ये आपली नागरिकता सिध्द करण्यासाठी संपूर्ण आसामच्या गरिब लोकांना महिनोन महिने शेकडो किलोमीटर दूर असलेल्या एन.आर.सी. केंद्रांमध्ये लाईन मध्ये उभे रहावे लागले. याच दरम्यान अनेकांचा मृत्यू झाला. एन.आर.सी. करताना भाजप म्हणत होते की आसाम मध्ये कोट्यवधी मुस्लिम प्रवासी आहेत. परंतु 19 लाख नागरिकत्वापासून बेदखल लोकांमध्ये फक्त 6 लाख मुस्लिम निघाले ज्यांच्यापैकी बहुसंख्य लोक गरिब असल्यामुळे आपली नागरिकता सिद्ध करू शकलेले नाहीत. जे 19 लाख लोक बेदखल केले गेले आहेत, त्यांच्यापैकी जवळपास 90 टक्के लोक आता मानसिक तणाव आणि मानसिक आजारांनी ग्रस्त झाले आहेत.

पुणे, मुंबई, ते नगर, औरंगाबाद ते नागपूर पर्यंत महाराष्ट्राच्या प्रत्येक झोपडपट्टीत राहणाऱ्या अनेक लोकांकडे हे सिद्ध करण्यासाठी कोणतेच कागदपत्र नाहीत की त्यांचे पूर्वज सुद्धा भारताचे निवासी होते कारण फक्त व्होटर कार्ड किंवा आधार कार्ड नागरिकता सिद्ध करण्यासाठी पुरेसे नाही. आसाम मध्ये तर एन.आर.सी. च्या कचाट्यात भारताच्या माजी राष्ट्रपतींचे कुटुंब, न्यायाधिशांची कुटुंब, सैन्यातील अनेक मोठे अधिकारी आणि सैनिक सुद्धा आले! यापैकी अनेक लोकांना सरकारने डिटेंशन सेंटर (स्थानबद्धता केंद्रात, एक प्रकारचे बंदीगृह) टाकले आहे, जो एक प्रकारचा तुरुंगच आहे. हीच स्थिती आता पूर्ण देशाची होणार आहे. आसाम मध्ये तर अशाप्रकारची डिटेंशन सेंटर चालूच आहेत, जुलै महिन्यातच केंद्र सरकारने सर्व राज्यांना निर्देश दिले होते की अशी बंदीगृहे तयार करा! महाराष्ट्रातही असे डिटेंशन सेंटर नेरुळ जवळ बनत आहे! तेव्हा सावध रहा, देशातील जनतेला कैद करण्याची तयारी या फॅसिस्ट सरकारने चालवली आहे!

आता देशभरातील आंदोलनांमुळे थोडेसे थांबावलेले मोदी सरकार सारवासारव करत सांगू पहात आहे की नागरिकता सिद्ध करणे एवढे अवघड नाही, देशाच्या नागरिकांनी घाबरू नये वगैरे. घाईघाईने त्यांनी एन.आर.सी. च्या वेबसाईट वर एक प्रश्नोत्तरी सुद्धा प्रकाशित केली आहे. परंतु या प्रश्नोत्तरीने उत्तरे देण्यापेक्षा जास्तच प्रश्न निर्माण केले आहेत. 2004 नंतर जन्मलेल्या व्यक्तींना इतर कागदपत्रे जी द्यावी लागतील त्याची यादी सुद्धा यांनी वेबसाईट वर टाकलेली नाही. तिकडे अमित शहांनी संसदेत ठामपणे सांगितले आहे की देशभरामध्ये एन.आर.सी. लागू करूच. जनतेचे आंदोलन मोठे झाल्यावर हे आता उलटे फिरून म्हणू लागलेत की एन.आर.सी. करण्याचा इरादा नाही, परंतु यांच्या भुलथापांना बळी पडू नये कारण 'खोटं बोला पण रेटून बोला' हे संघ परिवाराचे नेहमीच धोरण राहिले आहे.

### सावध व्हा, नोटबंदी पेक्षा हा हल्ला भयंकर मोठा आहे!

यांच्या भुलथापांना फसू नका. रात्र वैऱ्याची आहे! सावध व्हा, कारण की जे करोडो लोक नागरिकत्व सिद्ध करू शकणार नाहित त्यांना डिटेंशन सेंटर या बंदीगृहांमध्ये डांबून गुलामासारखे काम करवले जाईल! हिटलरने सुद्धा जर्मनीत हेच केले होते! सी.ए.ए., एन.आर.सी., हे सगळे त्यासाठीच आहे! विसरु नका की नोटबंदीच्या वेळी सुद्धा हेच सांगितली होते की हे काळ्या पैशांसाठी आहे ज्यामुळे आपल्याला 2 महिन्यांपर्यंत मोठमोठ्या रांगांमध्ये कामधंदे सोडून उभे रहावे लागले होते. यानंतर समजले की 99.3 टक्क्यांपेक्षा जास्त नोट तर परत आल्या! काळा पैसा तर मिळालाच नाही! आता पुन्हा रांगेत उभे राहून आणि कागदपत्रांसाठी भरमसाठ खर्च करून आपल्याला सिद्ध करावे लागेल की आपण या देशाचे नागरिक आहोत! हा नोटबंदी पेक्षा मोठा प्रहार असणार आहे! यामध्ये सुद्धा गरिबच याच्या कचाट्यात जास्त अडकणार!

हे सर्व करून भाजप-आर.एस.एस. एका बाजूला एन.आर.सी. द्वारे हिंदु-मुस्लिम फूट पाडून जनतेची एकता तोडू पहात आहे; लाखो लोकांना नागरिकते पासून वंचित करून आपली व्होट बँक मजबूत बनवत आहेत आणि आपले खरे मालक असलेल्या टाटा-अंबानी-अडानी सारख्या उद्योगपतींसाठी गुलाम कामगार निर्माण करत आहेत कारण डिटेंशन सेंटर मध्ये असलेले सर्व बंदी या कंपन्यांसाठीच गुलामी श्रम करायला वापरले जाणार!

खरेतर इतर देशातून आलेले प्रवासी-गैरप्रवासी (migrant, illegal migrant) हा मुद्दाच खोटा गैरलागू आहे. एखाद्या देशामध्ये येणारे बहुसंख्य प्रवासी हे युद्ध, अत्याचार किंवा गरिबीमुळे दुसऱ्या देशात तसेच जातात जसे एखाद्या राज्यातील लोक रोजगाराच्या शोधात शहरांकडे जातात आणि तिथे शेतं-कारखान्यांमध्ये मेहनत करून, कारखान्यांमध्ये काम करून ते उत्पादन करतात. ही आश्चर्याची गोष्ट नाही की भारतातही अवैध प्रवासी गरिबच आहेत. जेव्हा सरकारं लोकांना मुलभूत सुविधा, सन्मान, अन्न, वस्त्र, निवारा आणि रोजगार देण्यात अयशस्वी ठरतात तेव्हा जनतेला प्रवासी आणि गैर-प्रवासी मध्ये विभागतात.

### भगतसिंह-अश्फाकउल्ला खान-रामप्रसाद बिस्मिल चा वारस पुढे चालवा!

शहीद भगतसिंह, रामप्रसाद बिस्मिल आणि अश्फाकउल्ला खान यांच्यासारख्य असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये हसत मरण पत्करले. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये हिंदू-मुस्लिम सर्वांनीच आपले रक्त सांडले आहे. आज देशातील कारखाने, शेतं, चालवणारे लोक सर्व धर्मांमधून येतात. पण आपल्या देशामध्ये आज ज्या भाजपच्या सरकारचे राज्य आहे, त्यांची राजकीय मातृसंघटना असलेल्या आर.एस.एस.च्या नेत्यांनी स्वातंत्र्यलढ्यामध्ये इंग्रजांची माफी मागितली होती आणि इंग्रजांचे निष्ठावंत बनले होते. देशातील जनतेमध्ये फूट पाडून भांडवलदारांची सेवा करणे हेच त्यांचे आद्य कर्तव्य आहे. आज सगळीकडे टाळेबंदी, बेरोजगारी, महागाई, उपासमारीने कळस गाठला आहे. जनतेने या प्रश्नांवर आवाज उठवू नये यासाठी इंग्रजांच्याच 'फोडा आणि झोडा' धोरणाचा वापर करून जनतेत फूट पाडणे या फॅसिस्ट सरकारसाठी आवश्यक बनले आहे आणि त्यासाठीच नागरिकता सुधार कायद्यासारख्या विभाजनकारी कायद्यांना पारित केले गेले आहे. अर्थातच यामुळे हताश न झालेले युवक आज या सरकारला आह्वान देत आहेत. तुरुंगात टाका किंवा गोळ्या घाला पण आम्ही मागे हटणार नाही ही भाषा करत फॅसिस्टांना आज देशाचे युवक आह्वान देत आहेत. जनता सुध्दा आता यांचा डाव समजली आहे आणि धर्माच्या नावावर विभागण्याऐवजी जनता उलट धार्मिक भेद बाजूला सारून एकत्र येताना दिसत आहे. जनता अजूनही भगतसिंह-अश्फाक-बिस्मिल च्या वारशाला विसरली नाहीये!

### वर्गीय एकजूट मजबूत करा, आंदोलनाला क्रांतिकारी दिशेने पुढे न्या! सविनय कायदेभंगाद्वारे एन.पी.आर. ला हाणून पाडा!

हे सर्व चालू असताना मोदी सरकारने श्रम कायद्यांवर हल्ला चढवला आहे आणि कामगार वर्गाचे उरले सुरले अधिकारही काढून घेणे चालू केले आहे. कंत्राटीकरणाला खुलेआम मान्यता दिली जात आहे. कामाचे तास, जे कामगारांनी लढून 16 वरून 8 वर आणले, ते आता 9 केले जावेत असा प्रस्ताव मोदी सरकार देत आहे. गेल्या 6 वर्षांमध्ये भाजप सरकारच्या शासनाने आपल्याला बेरोजगारी, उपासमार आणि महागाईच दिली आहे. पूर्ण अर्थव्यवस्था कोलमडून पडत असताना, जिथे एकीकडे कामगार कपात होत आहे आणि कोट्यवधी लोकांना कामांवरुन काढले जात आहे, आणि दुसरीकडे सरकार कॉर्पोरेट कंपन्यांचा नफा वाचवण्यासाठी पराकाष्ठा करत आहे. मंदीचे निमित्त करून कंपन्यांना 5 टक्के कर माफ केला आहे आणि त्यांच्या खिशात लाखो कोटींची उधळण केली आहे. अधिक कर्ज, कर्जमाफी, करमाफी मार्फत लाखो-कोटी रुपये अंबानी-अडानी वर उधळले गेले आहेत. मोदी सरकार इमानेतबारी आपल्या मालकांची सेवा करण्यात गुंतले आहे.

हे सर्व होत असताना जे एन.आर.सी विरोधी आंदोलन उभे राहिले आहे, त्यात शिक्षित वर्ग, विद्यार्थी जरी मोठ्या प्रमाणात उतरलेले असले तरी देशातील बहुतांश कष्टकरी, कामगार जनता जी यामुळे खऱ्या अर्थाने प्रभावित होणार आहे ती मात्र अजूनही मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरलेली नाही. याकरिता क्रांतिकारी शक्तींचे कर्तव्य आहे की त्यांनी जास्तीत जास्त गरिब-कामगार-कष्टकरी वर्गापर्यंत जाऊन त्यांचे प्रबोधन करावे आणि या आंदोलनाची शक्ती वाढवण्यासाठी सडकांवर उतरवावे.

या मुद्यावर देश रस्त्यावर उतरत असताना उदारमवाद्यांचे गळ्यातले ताईत असलेले उद्योगपती रतन टाटा खुद्द जेव्हा म्हणतात की हे "व्हिजनरी" (दूरदृष्टे) सरकार आहे, तेव्हाच समजून घ्यावे की फॅसिझमशी उदारमतवादी भांडवली राजकारण लढू शकत नाही. एका बाजूला काँग्रेसचे काही नेते जनतेचा रोख बघता लोकरंजकतेसाठी सी.ए.ए. ला विरोध दाखवत असतानाच कपिल सिब्बल सारखे दुसरे काँग्रेसी नेते राज्यघटनेचा हवाला देत इशारा देत आहेत की अंमलबजावणी तर करावी लागेल. त्याच वेळी हे विसरले नाही पाहिजे की आसाम मध्ये सुद्धा एन.आर.सी. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने झाली होती. तेव्हा जनतेने न्यायालये किंवा भांडवली पक्ष यांच्या भरवशाने हे आंदोलन न लढता आपल्या एकजुटीच्या मार्गाने, सविनय कायदेभंगाच्या मार्गानेच एन.आर.सी., एन.पी.आर. ला विरोध केला पाहिजे आणि हे षडयंत्र हाणून पाडले पाहिजे. यासाठी कामगार-कष्टकरी वर्गाने या आंदोलनामध्ये आपला हस्तक्षेप केलाच पाहिजे. या आंदोलनात झालेल्या दमनातून दिसून आले आहे की भारतातील भांडवली लोकशाही जे काही थोडेफार लोकशाही अधिकार देते ते सुद्धा आज काढले जात आहेत, तेव्हा फक्त ही कमजोर 'लोकशाही' वाचवण्यासाठी नाही तर आपले लोकशाही अधिकार खऱ्या अर्थाने स्थापित करण्याकडे हे आंदोलन नेले पाहिजे. हे समजले पाहिजे की फॅसिस्ट राजकारणाचा उभार हा फक्त धार्मिक अस्मितेच्या वापरामुळे नसून, मुख्यत्वे यामुळे आहे की देशाच्या बहुतांश उत्पादन साधनांवर कब्जा करून बसलेला मोठा भांडवलदार वर्ग आज एकमुखाने सर्व पैशांच्या थैल्या घेऊन भाजपच्या मागे उभा आहे. भांडवलदार वर्गानेच जनतेच्या वाढत्या आंदोलनाला दाबण्यासाठीच आजवर पोसलेल्या या फॅसिस्ट श्वापदांच्या गळ्यातील पट्टा ढिला केला आहे. त्यामुळे भांडवलशाहीला क्रांतिकारी आह्वान देणारी कामगार-कष्टकरी एकजूटच फॅसिझमला निर्णायकपणे संपवू शकते. आज कामगार-कष्टकऱ्यांनी एन.आर.सी.-एन.पी.आर.-सी.ए.ए. विरोधी आंदोलनात सहभागी होऊन त्याला फक्त मजबूतच नाही केले पाहिजे, तर आपल्या वर्गीय एकजुटीच्या जोरावर भांडवलशाही विरोधी आंदोलनाच्या दिशेने नेले पाहिजे.

---

**"ज्या पृथ्वीवर प्रत्येक पुढच्या मिनीटाला एक बालक भूखेने वा आजाराने मरते, तेथे सत्ताधाऱ्यांच्या वर्गांच्या दृष्टिने सर्व बाबी समजून घेण्याची सवय लावली जाते- लोकांनी ही परिस्थिति म्हणजे एक नैसर्गिक व स्वाभाविक परिस्थिति आहे असे समजावे म्हणून त्यांना त्याप्रमाणे विचार करण्यास शिकविले जाते- लोकानां असे वाटते की ही व्यवस्था म्हणजेच देशभक्ति आहे व म्हणून जो कोणी या व्यवस्थेस विरोध करेल त्यास देशद्रोही व परकीयांचा दलाल समजण्यांत येते- जंगली कायद्यांस पवित्र स्वरूप देण्यांत येते व याद्वारे पराभूत झालेली माणसे स्वतःच्या परिस्थितीस नियती समजू लागतात"**

**एदुआर्दो गालियानो (अर्जेंटीनाचे प्रसिद्ध लेखक)**

## पंजाब मधील संगरुर मध्ये दलित शेतमजुराची क्रूर हत्या!

# दलितांचे आर्थिक शोषण व सामाजिक अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढाऊ संघर्ष लढावेच लागतील!

✍ **अखिल भारतीय जाती विरोधी मंच**

पंजाब मधील संगरुर जिल्ह्यातील जातीयवादी गुंडांकडून क्रूर मारामुळे पिडीत दलित शेत मजुराचा १६ नोव्हेंबर रोजी चंडीगड मधील पी.जी.आय. रुग्णालयात मृत्यू झाला. पिडीत व्यक्ती जगमेल सिंह यांचे गावातीलच काही सवर्ण व्यक्तीबरोबर २१ ऑक्टोबर रोजी किरकोळ भांडण झाले होते. नंतर हे भांडण गावातीलच काही व्यक्तींनी मिटवले देखील होते. परंतु या भांडणाची खुन्नस मनात बाळगून जातीयवादी गुंडांनी ७ नोव्हेंबर रोजी जगमेल सिंह यांना फसवून बोलावले; बांबू व लोखंडी सळ्यांनी अतिशय बेदमपणे बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केली आणि पाणी मागितले असता त्यांना मानवी मूत्र पाजले. मानवी समाजाला काळीमा फासणारे हे क्रूर कृत्य एवढ्यावरच न थांबता झालेल्या जखमांमध्ये पेचकस घुसवून ॲसिड सुद्धा टाकले गेले. पीडित व्यक्ती जगमेल सिंह यांना चंदिगड मधील पी.जी.आय. रुग्णालयात दाखल करण्यात आले पण वाईट रित्या जखमी असल्यामुळे त्यांना वाचवता आले नाही. विषाणूंचा प्रसार रोखण्यासाठी त्यांचा एक पाय देखील कापण्यात आला परंतु शरीराच्या इतर अवयवांनी देखील काम करणे बंद केले व त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. जगमेल यांच्या कुटुंबामध्ये पत्नी आणि तीन मुलं आहेत. पोलिसांनी काही जणांना आरोपी म्हणून अटक केली असली तरी ही पाशवी घटना देशातील गरिब दलितांची स्थिती आणि त्यांच्यावरील अत्याचारांचे जिवंत उदाहरण आहे.

**दलितांच्या घरी पाणी पिणे आणि जेवण करण्याच्या ढोंगातून काहीच साध्य होणार नाही!**

दलित अन्याय अत्याचाराची ही घटना काही नवीन नाही. सरकारी आकडेच पाहिले तर कळून येते की, दिवसेंदिवस दलित अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत चालली आहे. मनुवाद आणि ब्राम्हणवादाचा पुरस्कार करणारा भाजप सत्तेत आल्यानंतर जातीय हल्ले अजून वाढले आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एन.सी.आर. बी.) च्या मागील अहवालानुसार २००६ पासून २००१६ या काळात दलित विरोधी अपघातांमध्ये ६६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २००६ मध्ये २७,०७० दलित विरोधी अत्याचाराच्या घटनांची नोंद करण्यात आली. २०११ मध्ये हीच संख्या वाढून ३३,७१९ झाली आणि अजून पुढे २०१६ मध्ये हा आकडा ४८,८०१ वर जाऊन पोहोचला आहे. देशामध्ये दलित अत्याचार आणि जातीय तणावांचा दीर्घ इतिहास आजपर्यंत आपल्याला पाहायला मिळतो. १९८९ मध्ये एस.सी., एस.टी. ॲक्ट (ॲट्रोसिटी कायदा) लागू झाल्यानंतर देखील देशामध्ये सरासरी १५ मिनिटाला एक दलित अत्याचाराची घटना घडते. प्रत्येक तासाला दलितांवर ५ हल्ल्यांची नोंद होते; प्रत्येक दिवसाला दोन दलितांची हत्या करण्यात येते. यात दलित महिलांची परिस्थिती तर अजून भयंकर आहे. प्रत्येक दिवसाला सरासरी सहा दलित स्त्रियांवर बलात्काराच्या घटना घडतात. काही दिवस अगोदर ग्रामीण व कृषी विशेषज्ञ प्राध्यापक ज्ञान सिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंजाब मधील ११ जिल्ह्यातील १,०१७ घरांचा सर्व्हे केला. एप्रिल २०१९ मध्ये यावर एक अहवाल सादर करण्यात आला. या अहवालानुसार काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. शेतमजुरी करणाऱ्या महिलांमध्ये जवळजवळ सत्तर टक्के महिलांनी हे मान्य केलं की, त्यांचे कधीनाकधी लैंगिक शोषण झाले आहे. त्यातील ९२ टक्के महिला दलित होत्या. एका अंदाजानुसार पंजाब मध्ये १५ लाख शेतमजूर शेतामध्ये काम करतात. त्यातील मोठी संख्या ही दलित मजुरांची आहे. दुसऱ्या राज्यांमधून पंजाबमध्ये येऊन शेतमजुरी करणाऱ्या मजुरांमध्ये सुद्धा जास्त प्रमाण हे दलित मजुरांचे असते. पंजाबच नाही तर देशभरामध्ये दलित मजूर, कामगारांना आर्थिक अति-शोषण आणि सामाजिक स्तरावरील अत्याचाराच्या घटनांना तोंड द्यावे लागते.

**प्रशासन आणि न्यायालयासमोर अत्याचारांची प्रकरणे येऊन सुद्धा न्याय मिळण्याची कोणतीच शाश्वती नाही**

खरंतर दलित अन्याय अत्याचाराच्या घटना मधील बरेच प्रकरणे ही सामाजिक भीतीमुळे आणि आर्थिक असुरक्षिततेच्या कारणामुळे पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचतच नाहीत आणि जी प्रकरणं पोलिस आणि कोर्टाच्या फाईल पर्यंत पोहोचतात त्यामध्ये देखील न्याय मिळेल याची शाश्वती नसते. देशभरामध्ये झालेली दलित अत्याचार विरोधी प्रकरणे व त्यांची न्यायालयीन प्रक्रिया पाहिली तर आपल्या न्यायव्यवस्थेवर सुद्धा प्रश्न उभे होतात. तुम्ही स्वतःच पाहू शकता की देशभरामध्ये दलितांच्या विरोधात संघटित स्वरूपाची हिंसा करणाऱ्यांना कोणती शिक्षा झाली आहे. याची काही प्रातिनिधिक उदाहरणे खाली दिली आहेत.

- ४४ दलितांची हत्या, किलवनमनी, तामिळनाडू. २५ डिसेंबर १९६८. कोर्टाचा निकाल : सर्व आरोपी निर्दोष मुक्त.
- १३ दलितांची हत्या, चुन्दुर, आंध्र प्रदेश, ६ ऑगस्ट १९९१. कोर्टाचा निकाल : २०१४ मध्ये सर्व आरोपींना सोडून देण्यात आले.
- १० दलितांची हत्या, नागरी, बिहार, ११ नोव्हेंबर १९९८. कोर्टाचा निकाल : मार्च २०१३ मध्ये सर्व आरोपींना सोडून देण्यात आले
- २२ दलितांची हत्या, शंकर बिगा गाव, बिहार, २५ जानेवारी १९९९. कोर्टाचा निकाल: जानेवारी २०१५ मध्ये सर्व आरोपी निर्दोष मुक्त
- २१ दलितांची हत्या, बथानी टोला, बिहार, ११ जुलै १९९६. कोर्टाचा निकाल: एप्रिल २०१२ मध्ये सर्व आरोपी निर्दोष मुक्त
- ५८ दलितांची हत्या, लक्ष्मणपूर बाथे, १ डिसेंबर १९९७. कोर्टाचा निकाल : २०१३ मध्ये सर्वांना सोडून देण्यात आले.

महाराष्ट्रातील कुप्रसिद्ध नितीन आगे प्रकरण पहा. यामध्ये २८ एप्रिल २०१४ रोजी एका दलित तरुणाला गावासमोरून मारत घेऊन जाऊन गुप्तांगाला लोखंडी गरम सळ्यांचे चटके देत, गुप्तांगा मध्ये गरम सगळ्या घालून अतिशय क्रूर पद्धतीने मारण्यात आले. २३ नोव्हेंबर २०१७ रोजी सर्व आरोपींना कोर्टाकडून निर्दोष सोडून देण्यात आले. त्यानंतर गावात सवर्ण आरोपी सुटून आल्यावर गावात फटाके फोडून स्वागत करत जल्लोष करण्यात आला. पुढे यातीलच काही आरोपी पुन्हा अलीकडेच पारधी दलित असलेल्या बाळू पवार यांच्या हत्ये मध्ये सामील आढळून आले आहेत.

वरील तथ्यांच्या आधारावर हे स्पष्ट होते की, दलित अन्याय अत्याचाराच्या क्रूर हत्याकांडांमधील आरोपींना सुद्धा शिक्षा झाल्या नाहीत. हे आकडे स्पष्ट करतात की ७२ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर सुद्धा गरीब दलित प्रत्येक बाबीत किती असुरक्षित आहेत. ज्या प्रकरणांमध्ये काही आरोपींना शिक्षा झाली आहे, त्या प्रकरणात पीडित दलितांना न्यायालयाच्या आत आणि बाहेर दीर्घ संघर्ष करावा लागला आहे. वरून सामाजिक, आर्थिक बहिष्कार व खोट्या आरोपाखाली फसवण्याचे प्रकार देखील आपल्यापुढे आहेत.

**दलित मुक्तीचा, जातीअंताचा मार्ग अस्मितावादी राजकारण आणि प्रतिकांच्या राजकारणामधून नाही, वर्ग आधारित जाती विरोधी आंदोलनामधून जातो**

आज अस्मितावाद (म्हणजे दलितांना त्यांची जातीय ओळख व अस्मितेच्या आधारावर संघटित करणे) आणि प्रतीकवादाचे राजकारण (म्हणजे मूर्ती वा स्मारक बनवणे अथवा तोडण्यात येणे यासारख्या मुद्द्याला उचलून आणि दलित गरिबांच्या खऱ्या मुद्द्यावर मौन धारण करणे) यामधून दलितांचे काहीच भले होणार नाही. आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की क्रांती शिवाय दलित मुक्ती शक्य नाही आणि जातिव्यवस्थेच्या विरोधात व्यापक आंदोलना शिवाय क्रांतीचा विचार करणेसुद्धा स्वप्न पहिल्यासारखे ठरेल. जातीवाद आणि ब्राह्मणवाद आज बदललेल्या रुपात भांडवली व्यवस्थेची सेवा करत आहेत. जातीवाद, धर्मवाद व सर्व पद्धतीचे अस्मितावादी राजकारण आज भांडवलशाही साठी 'संजीवनी बुटी' च्या समान आहेत. व्यवस्थेचे ठेकेदार, भांडवलशाही द्वारे सुधार करून स्वीकारण्यात आलेल्या जातीव्यवस्थेला अतिशय चतुरपणे स्वतःच्या हितासाठी आणि फायद्यासाठी वापरत आहेत. हेच कारण आहे की, स्वातंत्र्याच्या ७२ वर्षानंतर सुद्धा जातीवादी अत्याचारांच्या घटना वाढत आहेत. देश स्तरावरील आकड्यांवर नजर फिरवली असता दिसून येते की, दलितांमधील ९५ टक्के संख्या ही शेतमजूर, बांधकाम मजूर, औद्योगिक मजूर म्हणून राबत आहे किंवा साफसफाई सारखे काम करत आहे.

अस्मितावाद आणि प्रतीकांचे राजकारण करणारे लोक कष्ट करणाऱ्या दलितांचे मुद्दे उचलतच नाहीत. या कष्ट करणाऱ्या जनतेचे मुद्दे सरळ-सरळ देशातील इतर कष्ट करणाऱ्या जनतेबरोबर सुद्धा जोडले जातात. दलित विरोधी अत्याचारांच्या विरोधात लढल्या जाणारे संघर्ष मजबुतीने तेव्हाच लढले जाऊ शकतात जेव्हा प्रत्येक जातीतील व्यापक कष्टकरी जनता जातिव्यवस्थेच्या विरोधामध्ये संघर्ष करण्यासाठी संघटित असेल. शिक्षण, रोजगार, आरोग्य, घरकुल, महागाई यासारख्या मुद्द्यावर होणाऱ्या संघर्षामध्ये प्रत्येक जातीच्या कष्टकरी जनतेची भागीदारी निश्चित करावी लागेल. सोबतच कामगार, कष्टकरी जनतेमध्ये वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगतीचे आंदोलन चालवणे सुद्धा अतिशय गरजेचे आहे. या माध्यमातून लोकांमध्ये जातिव्यवस्थेचा इतिहास आणि वर्तमाना सोबत जोडलेल्या विविध बाजू तसेच जातीअंताचे आवश्यक कार्यभार व आह्वाने स्पष्टतेने मांडता येतील. तथाकथित उच्च जातीय लोकांना भावनात्मक आवाहू करून काहीएक साध्य करता येणार नाही. जातीव्यवस्था विरोधी आंदोलनाला कामगार कष्टकरी वर्ग एकतेच्या बळावरच संपवणे शक्य आहे. त्यासाठी आम्ही देशातील सर्वसामान्य कामगार-कष्टकरी जनता, विद्यार्थी, युवक, व जाती विरोधी कार्यकर्त्यांना आवाहन करत आहोत कि, आमच्या मुद्यांवर गांभीर्याने विचार करावा. जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्यासाठी सुरू असलेल्या व्यापक संघर्षासाठी संवाद आणि वैचारिक वाद-विवादासाठी स्वस्थ वातावरण नक्की बनेल हा आम्हाला विश्वास आहे.

अखिल भारतीय जाती विरोधी मंच, संगुर (पंजाब) मधील दलित अन्याय अत्याचाराच्या घटनेची कठोर निंदा करत, पंजाब सरकार व केंद्र सरकारकडे मागणी करत आहे:

१) जगमेल सिंह यांची हत्या करणाऱ्या आरोपींना लवकरात-लवकर कठोर शिक्षा व्हावी.

२) जगमेल सिंह यांच्या कुटुंबियांना योग्य तो मोबदला मिळावा वेळेत मिळावा.

३) दलित अन्याय-अत्याचाराच्या प्रलंबित प्रकरणांचा फास्ट ट्रॅक न्यायालयामध्ये लवकर निवाडा व्हावा.

४) जातीय अत्याचारांच्या विरोधात ॲट्रोसिटी ॲक्ट सारखे कायदे कठोर बनवत त्यांना सक्तीने लागू केले जावे.

५) सर्व जातीयवादी संस्था, सभा व पंचायतीवर तात्काळ बंदी घालण्यात यावी.

६) राजकीय संस्थांकडून जातीयवादी कार्यक्रमांमध्ये भागीदारी करणे आणि अशा कार्यक्रमांना सरकारी अनुदान तात्काळ थांबवण्यात यावे.

**अनुवादः बबन**



कष्टकरी व शेतकऱ्यांना नीट समजावले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, म्हणूनच तुम्ही त्यांच्या डावपेचांपासून जपून राहिले पाहिजे आणि त्यांच्या आहारी जाऊन काहीही करू नये. जगातील सर्व गरीबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे किंवा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखेच आहेत. तुम्ही धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रीयता व देशाचे भेदभाव नष्ट करून एकजूट होण्यात व सरकारची शक्ती आपल्या हातांमध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमध्ये तुमचे काहीच नुकसान होणार नाही, यामुळे एके दिवशी तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हांला आर्थिक स्वातंत्र्य लाभेल.

भगतसिंह (सांप्रदायिक दंगली आणि त्यांवरील उपाय)

# 2019 : जगभरात व्यवस्था विरोधी आंदोलनांचे वर्ष

✍ आनंद सिंह

गेल्या काही वर्षांपासून जगभरातील लुटखोर आणि उत्पीडक शासकांविरोधात लोक रस्त्यांवर उतरत आहेत. जागतिक भांडवली व्यवस्थेचे संकट मजबूत होत जाण्यासोबतच जिथे एकीकडे जगातील अनेक देशांमध्ये फॅसिस्ट किंवा अर्धफॅसिस्ट प्रकारच्या शक्ती मजबूत होत आहेत, तिथेच लोकांच्या अधिकारांवर हल्ला करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तीव्र जनसंघर्षांचा सुद्धा सामना करावा लागत आहे.

गेल्या 2019 या सालात कदाचितच एखादा दिवस असेल ज्यादिवशी जगातील पाच खंडांमधील अनेक देशांमध्ये लोक मोठ्या संख्येने रस्त्यांवर उतरले नसतील. ही आंदोलने इतकी व्यापक होती की सर्व मोठमोठ्या भांडवली मीडिया घराण्यांना आणि थींकटँकना (विचारवंतांचे गट) सुद्धा 2019 ला "वैश्विक विद्रोहाचे वर्ष" घोषित करावे लागले. असे करण्यामागे त्यांचे खरे उद्दिष्ट शासक वर्गाला इशारा देणे आहे की जनता जागी होत आहे, सांभाळून चला आणि आंदोलनाला मार्गी लावण्याची तयारी करा. परंतु कामगार वर्गाच्या दृष्टीकोणातून पाहिले तर जागतिक भांडवलशाहीला कमजोर करण्यामध्ये या जनांदोलनांचे महत्व कमी नाही.

या वर्षी हाँगकाँग, इराक, इराण, लेबनन, इजिप्त, चिले, सुदान, इक्वाडोर, अल्जिरिया, ऑस्ट्रेलिया आणि फ्रांसच्या रस्त्यांवर प्रचंड जनसागर उतरले होते. या आंदोलनांचे तात्कालिक कारण काहीही असो, त्यांना जागतिक भांडवलशाहीच्या संकटापासून वेगळे करून पाहणे शक्य नाही.

हाँगकाँगच्या रस्त्यांवर लाखोंच्या संख्येने उतरलेल्या जनसागराचे तात्कालिक निमित्त होते विवादित 'सुपुर्तीकरण कायदा' ज्याद्वारे हाँगकाँग मध्ये होणाऱ्या कोणत्याही गुन्ह्यातील आरोपीला चीनकडे सोपवले जाणे आणि 90 टक्क्यांपेक्षा जास्त शिक्षेचे प्रमाण असलेल्या चीनच्या कुख्यात कोर्टांमध्ये त्याच्यावर खटला चालवणे शक्य झाले. हाँगकाँगच्या लोकांना हा त्यांच्या अंतर्गत मामल्यामध्ये हस्तक्षेप वाटला आणि त्याविरोधात जनता रस्त्यांवर उतरली. या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने युवक आणि किशोर सुद्धा होते. शहरातील ट्रेड युनियन्सच्या आह्वानावर सुद्धा लाखो लोक सडकांवर उतरले. या जनांदोलनाला पाशवीपणे पोलिसी दमनातून चिरडण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले आणि आंदोलनकर्त्यांनी पोलिसाच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे विविध नवनवीन मार्ग अवलंबले. या आक्रोशावर पाणी टाकण्यासाठी हाँगकाँग प्रशासनाने हा विवादित 'सुपुर्तीकरण कायदा' मागे घेतल्याचे जाहीर केले, पण त्यानंतरही जनांदोलन थांबले नाही आणि त्याने अजून व्यापक रूप धारण केले. यानंतर आंदोलक पोलिसांचे पाशवी दमन आणि हाँगकाँग मध्ये चीनच्या वाढत्या प्रभावा विरोधात आंदोलन करू लागले! लक्षात घेतले पाहिजे की या आंदोलनांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात जनसहभागाला हाँगकाँग मध्ये चालू असलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवरच समजू शकतो. जगभरात आर्थिक असमानतेच्या बाबतीत शहरांमध्ये हाँगकाँग सर्वात वरच्या पायऱ्यांवर आहे. जगातील सर्वात महागड्या शहरांमध्ये सुद्धा हाँगकाँग मोजले जाते. तिथे फक्त गरिबच नाही तर सरासरी मध्यमवर्गीय लोक सुद्धा मोठ्या मुश्किलीने परिस्थितीचा सामना करत आहेत. अशामध्ये चीनचा हस्तक्षेप त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करतो. पुन्हा सांगायला नको की चीनच्या नकली कम्युनिस्ट शासकांनी जगातील सर्वाधिक दमनकारी राज्य यंत्रणेचे निर्माण केले आहे. खुद्द चीन मध्येच कामगारांच्या संपांचे सत्र सतत चालू आहे पण अत्यंत नियंत्रित प्रसारमाध्यमांमुळे त्यांच्या बातम्या कमीच पोहोचतात.

लेबननच्या रस्त्यांवर सुद्धा यावेळी प्रचंड जनसागर दिसून आला. तिथे सरकारद्वारे व्हॉट्सॲपच्या वापरावर लावलेल्या करामुळे चालू झालेल्या या आंदोलनाने लगेच आर्थिक संकटा विरोधातील जनांदोलनाचे रूप धारण केले. आंदोलनाच्या काही दिवसांमध्येच जवळपास 13 लाख लोक, म्हणजे तेथील लोकसंख्येच्या जवळपास 20 टक्के लोक रस्त्यांवर उतरले. 2005 च्या 'देवदार क्रांती' नंतर पहिल्यांदाच इतक्या मोठ्या संख्येने लोक बैरूत आणि त्रिपोलीच्या रस्त्यांवर उतरले. लेबननची अर्थव्यवस्था कोसळण्याच्या स्थितीत आहे. तेथील राष्ट्रीय कर्ज जी.डी.पी.च्या (सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या) 150 टक्क्यांवर पोहोचले आहे आणि तेथील चलनाचे सतत अवमूल्यन होत आहे. महागाई आणि बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे.

याच प्रकारे चिले मध्ये सुद्धा राजधानी सँटियागो मध्ये मेट्रो रेल्वेच्या तिकिटात वाढी विरोधात सुरू झालेल्या विद्यार्थी-युवकांच्या आंदोलनाने लवकरच एक व्यवस्था विरोधी रूप धारण केले. या आंदोलनाच्या निशाण्यावर सुद्धा अर्थव्यवस्थेचे संकट, कामगार कपात, खिळखिळ्या सार्वजनिक सुविधांसारखे मुद्दे होते. याच्या व्यापकतेचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की चिलेच्या दक्षिणपंथी (उजव्या विचारांच्या) सरकारला, त्यांना चिरडण्यासाठी हजारो सैनिकांना सँटियागोच्या रस्त्यांवर उतरवावे लागले. पण शेवटी आंदोलन अधिक व्यापक होतच गेले आणि सरकारला गुडघे टेकावे लागले.

फ्रांसमध्ये तेलाच्या भावांमध्ये झालेल्या वाढीविरोधात 'पिवळ्या शर्टवाल्यांचे' जे आंदोलन 2019 च्या मध्यात भडकले, ते सरकारी दमन आणि लहान-मोठ्या सवलतींच्या प्रयत्नांनंतरही थांबत नाहीये. हे वर्ष संपत असताना फ्रांसमध्ये सुरू असलेल्या सार्वत्रिक संपाने 29 व्या दिवसात प्रवेश केला होता, जे गेल्या 51 वर्षांमधील एक रेकॉर्ड आहे.

गेल्या वर्षी इराक, सुदान, स्पेन, अल्जिरिया आणि इराण मध्ये सुद्धा जबरदस्त मोठी आंदोलन पहायला मिळाली आणि या आंदोलनांच्या झालेल्या दमनामध्ये शेकडो लोकांचे प्राणही गेले. हे खरे आहे की या आंदोलनांच्या भडकण्याचे तात्कालिक कारण वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे आहे. पण या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे की ते सर्व भांडवली संकट आणि दमनकारी भांडवली राज्यसत्तेच्या विरोधातील जनविद्रोहांची अभिव्यक्ती आहेत. इतिहासामध्ये असे अनेकदा बघायला मिळते की सामाजिक-आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर एक सामान्यशी वाटणारी घटना सुद्धा एका मोठ्या जनांदोलनाला सुरू होण्याचे कारण बनू शकते.

जागतिकीकरणाच्या युगामध्ये आज भांडवलशाहीने खऱ्या अर्थाने एका जागतिक उत्पादन पद्धतीचे रूप धारण केले आहे. अशामध्ये भांडवलशाहीचे संकट सुद्धा जागतिक होऊन सर्व जगाला आपल्या मगरमिठीत घेत आहे. जागतिक भांडवलशाही 2007-08 पासून ज्या प्रकारच्या संकटांच्या भवऱ्यात अडकली आहे, त्यातून अजून बाहेर पडू शकलेली नाही. नफ्याच्या घसरत्या दराच्या या संकटाचा परिणाम सर्व जगामध्ये मंदी, कामगार-कपात, बेरोजगारी, महागाईच्या रुपात बघायला मिळत आहे. उत्पादक शक्तींच्या विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमुळे, वेगवेगळ्या इतिहासामुळे संकटाचा परिणाम सुद्धा वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळा आहे. पण भांडवलशाहीच्या युगात फक्त संकटच सार्वत्रिक झालेले नाही; तर जागतिक स्तरावर माहिती आणि विरोधाच्या पद्धतीची देवाणघेवाण सुद्धा अभूतपूर्व पद्धतीने होत आहे. जगातील कामगारांनो एक व्हा, हा कार्ल मार्क्सचा उद्घोष आज वास्तवात साकार होण्याची परिस्थिती तयार झाली आहे.

ही सर्व आंदोलने सामान्यत: भांडवलशाही विरोधातील असूनही त्यांच्यामध्ये स्वयंस्फूर्ततेचे अंग खूप जास्त आहे. संघटीतपणा, सुसंगत विचारधारा आणि नेतृत्वाचा अभाव या आंदोलनांमध्ये स्पष्ट दिसून येतो. यामुळेच जनतेच्या मोठ्या भागीदारीनंतरही शासक वर्ग या आंदोलनांना काबू करण्यात अनेकदा सहज यशस्वी होतो. जेव्हा दमन करून भागत नाही, तेव्हा शासक वर्ग कुटीलपणे आंदोलनकर्त्यांच्या काही मागण्या मान्य करतो आणि कोणत्याही दीर्घकालीक रणनीतीच्या अभावामध्ये आंदोलन काही काळाकरिता क्षीण होते. किंवा आंदोलनांच्या दबावामध्ये सरकारे बदलतात आणि लुटखोर-उत्पीडक शासकांचा दुसरा गट सत्तेमध्ये येतो. जसे की 2011 च्या 'अरब विद्रोहा' च्या वेळी इजिप्त सहीत अनेक देशांमध्ये झाले. सरकारे बदलली पण व्यवस्था नाही बदलली. संघटना, विचारधारा आणि नेतृत्वाच्या अभावामध्ये हे विद्रोह क्रांतीच्या दिशेने पुढे जाऊ शकत नाहीत. ते पर्यायी व्यवस्थेचे निर्माण करू शकत नाहीत कारण त्यांच्याकडे पर्यायाचा कोणताही आराखडा नाही. कष्टकरी वर्गाचे क्रांतिकारी प्रतिनिधी आजही जगाच्या स्तरावर विखुरलेपण आणि वैचारिक विभ्रमांशी झुंझत आहेत. त्यांना आपल्या मध्येही वैचारिक स्पष्टता आणावी लागेल, भांडवलशाही-साम्राज्यवादाच्या काम करण्याच्या पद्धतींना समजून क्रांतीकडे जाण्याची योग्य रणनिती आणि डावपेच विकसित करावे लागतील. तेव्हाचे ते अशा आंदोलनांसोबत एकजुटता जाहिर करताना भांडवलशाही-सामाज्यवादाला उखडून फेकणाऱ्या तसेच समाजवादी व्यवस्थेचे निर्माण करणाऱ्या जनक्रांतीसाठी लोकांना तयार करू शकतील.

अनुवाद: अभिजित

# पीएमसी बँकेतील घोटाळा आणि बँक व्यवस्थापन व भांडवलदारांचे गलिच्छ राजकारण

पान 6 वरून

प्रकरणांवरून आपल्याला हे स्पष्ट लक्षात येते की असे सर्व मोठे भांडवलदार, उद्योगपती आणि मालकवर्ग मिळून बँकांना आणि त्यांच्या व्यवस्थापनाला खिशात घेऊन फिरतात. ते म्हणतील तशा मनमानी पद्धतीने बँका त्यांचा कारभार चालवतात. एचडीआयएल चे मालक राकेश आणि सारंग वाधवान आणि बँकेचे व्यवस्थापकीय संचालक जॉय थॉमस यांनी संगनमत करून गुप्त पद्धतीने व्यवहार करून बँकेकडून 6,500 कोटींची रक्कम सर्व नियम कायदे धाब्यावर बसवत एचडीआयएल ला वळती केली. ह्या रकमेची परतफेड होत नाहीये आणि हे कर्ज अनुत्पादक कर्ज बनलेले आहे ही माहिती रिझर्व्ह बँकेपासून दडवून ठेवली. रिझर्व बँकेने पाठवलेल्या तपासणीसाची भूमिका सुद्धा यात संशयास्पद ठरते. सामान्य जनता मेहनतीने पै-पै करून आपली बचत बँकेत ठेवते. त्याच्या भरवशावरच सर्व भांडवलदार वर्ग त्यांचं भांडवल उभे करतो. अशा वेळी कंपनीचे दिवाळे निघाल्यानंतर त्याचा भुर्दंड मात्र सामान्य जनतेला सहन करावा लागतो. मोठमोठ्या भांडवलदारांच्या राहणीमानात मात्र तसूभरही फरक पडत नाही. यात मरण आहे ते सामान्य जनतेचे, कामगार-कष्टकरी माणसाचेच. विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी सारख्यांनी बँकेला लाखो कोटींचा चुना लावला त्याची भरपाई सामान्य कष्टकरी जनता अजूनही करतेच आहे, बेरोजगारी आणि मंदीचा मार सुद्धा सहन करत आहे परंतु या देशातील धनाढ्य मालक वर्ग ऐशोआरामात मश्गुल आहे. अतिशय निर्लज्जपणे जनतेच्या पैशावर डल्ला मारून पसार होत आहेत आणि आपणा सर्वांना हे चांगलेच ठाऊक आहे की तात्पुरती वेळ टाळून नेण्यासाठी होणाऱ्या चौकश्या आणि अटकेतून पुढे काहीही होत नाही.

पीएमसी ही सहकारी बँक आहे. मात्र अनेक सहकारी आणि सरकारी बँकांतील घोटाळे उघडकीसच येत नाहीत किंवा त्यांना घोटाळाच ठरविण्यात येत नाही. मोठमोठे उद्योगपती, भांडवलदार असे हजारो कोटी रुपये बुडवतात आणि त्यांचे काहीच होत नाही. ह्या घोटाळ्यांवर सरकारच पडदा टाकते. बडे उद्योगपती ह्या बँकांचा त्यांच्या फायद्यासाठी उपयोग करून घेतात आणि त्यांच्याच बाजूचे असलेले सरकार सुद्धा असा उपयोग होऊ देते आणि त्याकडे सोयीस्कर डोळेझाक करते. बँक बुडायला लागली की तिला वाचवण्यासाठी जनतेच्या पैशावर डल्ला मारून बँकेत जनतेच्याच कराच्या किंवा बचतीच्या पैशाने पुन्हा भांडवलभरणी केली जाते. नजीकच्या काळातीलच अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. आयडीबीआय वाचवण्यासाठी आयुर्विम्यातील पैसा वापरल्या गेला तसेच अन्न महामंडळ, लघुबचत संचालनालय इत्यादी आस्थापनांमधील पैसा सरकारने फेरभांडवलभरणी करण्यासाठी वापरला. यावरून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की हे भांडवली सरकार भांडवलदारांचे आणि त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी कष्टकरी कामगारांच्याच खिशाला कात्री लावत आहेत. जीएसटी सारखे कर वाढवून, पेट्रोल-डिझेल महाग करून, आपल्या शिक्षण-आरोग्याच्या खर्चात कपात करून, तर कधी बँकेमध्येच 'बॅलन्स' कमी म्हणून किंवा 'एटीएम' जास्त वापरले म्हणून दंड लावून हे पैसे आपल्याच खिशातून वसूल केले जात आहेत आणि हे गुन्हेगार मात्र मोकाट आहेत! जो कष्टकरी कामगार आज 12-12 तास कंबरतोड मेहनत करून हा देश चालवतो आणि सर्व संपत्ती निर्माण करतो तो आज अतिशय दारिद्र्यात पिचत पडला आहे आणि दुसरीकडे बँका चालवणारे, उद्योगपती, कारखानदार, भांडवलदार, मालक लोकं कष्टकऱ्यांच्या जीवावर ऐशोआरामात जगत आहेत. प्रसिद्ध साहित्यिक बर्टोल्ट ब्रेख्त यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे "हौशी चोर दरोडे टाकतात, परंतु व्यवसायिक चोर बँका स्थापन करतात". हे वाक्य ह्या दरोडेखोरांसाठी अगदी तंतोतंत लागू पडतं, नव्हे हाच भांडवली व्यवस्थेचा नियम आहे.

'कामगार बिगुल' ची वेबसाइट
www.marathi.mazdoorbigul.net
फेसबुक पेज
www.facebook.com/kamgarbigul

# तारापूर औद्योगिक दुर्घटनेतील मृत्यूंना जबाबदार कोण?

✍ **बबन ठोके**

मुंबई पासून १०० किलोमीटर अंतरावर पालघर जिल्ह्यातील भोईसर मधील तारापूर येथे एन.के. फार्मा (नाईट्रेट केमिकल) कंपनीत शनिवारी ११ जानेवारी रोजी झालेल्या अपघातातील मृत कामगारांची संख्या ८ वर पोहचली आहे. तर ७ जणांना गंभीर जखमांमुळे ओद्योगिक वसाहतीतील तुंगा रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. कंपनीमध्ये बांधकाम सुरु असतानांच मालक नटवरलाल पटेल यांच्याकडून कंपनीचे काम चालवले जात होते. या दरम्यान काही स्फोटक रसायनांची परीक्षण चाचणी घेत असताना सायं ७ च्या सुमारास हा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज एवढा मोठा होता कि, आजूबाजूच्या परिसरात जवळपास १५ ते २० किलोमीटर पर्यंत याचा आवाज ऐकू गेला. यावरून या स्फोटांच्या तीव्रतेचा अंदाज घेतला जाऊ शकतो.

या कंपनीत अनेक रसायनांच्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेतून अमोनियम नायट्रेट हे स्फोटक रसायन बनवले जात होते. या कंपनीमध्ये बल्क ड्रग (औषध निर्मिती) रसायनाच्या उत्पादनाचा नव्याने परवाना घेण्यात आला होता. या उत्पादनाची दुसरीच 'बॅच' सुरू असताना दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. ज्या ठिकाणी अपघात घडला त्या ठिकाणी पहिल्या मजल्यापर्यंतच्या बांधकामालाच 'एमआयडीसी'ने परवानगी दिली होती. असे असताना तीन मजली इमारत कशी उभी राहिली? बांधकाम परवानगी नसताना प्रदूषण नियंत्रण मंडळाची उत्पादन करण्याची परवानगी कशी मिळाली? अशा अनेक धक्कादायक बाबी घटनेनंतर आता समोर येत आहेत. दरम्यान, 'एनडीआरएफ' पथकाच्या मदतीने 'एमआयडीसी' अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीखाली अडकलेल्यांचा शोध घेण्याचे कार्य रात्रभर सुरू ठेवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी १ वाजेपर्यंत शेवटचे दोन मृतदेह इमारतीच्या ढिगाऱ्याखाली सापडले.

एन. के. फार्मा कंपनी ही तशी लहानच आहे. तिच्यात साधारणत: ३० कामगार काम करत असावेत असे मृत्यू पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांनी सांगितले. त्यांच्याशी बोलत असतांना पुढे असे कळले की कंपनीच्या इमारतीमध्येच एका बाजूला दोन परिवारांना राहायला जागा दिली होती. हे दोन्ही परिवार स्थलांतरित होऊन बिहारच्या छपरा आणि आरा या ठिकाणावरून येऊन या ठिकाणी काम करत असत. यापैकी सुरेंद्र यादव यांच्या परिवारातील पत्नी, मुलगा आणि मुलगी मृत झाले व एकटेच सुरेंद्र यादव हे वाचले आहेत आणि दुसऱ्या कुटुंबातील राहुल सिंग यांची पत्नी व आई या मध्ये घटनास्थळीच मारल्या गेल्या आहेत. या व्यतिरिक्त वॉचमन, सुपरवायजर, व लिफ्टमन अशा एकूण ८ कामगारांचा मृत्यू झाला आहे व ७ जण अत्यंत गंभीर परिस्थितीत जखमी अवस्थेत तुंगा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. एक बाब यात लक्षणीय आहे कि, सात पैकी एक स्वत: मालक नटवरलाल पटेल हे देखील आहेत. कारण स्फोट झाला तेव्हा ते सुद्धा त्याठिकाणी उपस्थित होते. पण थोड्याच वेळात त्यांना ओद्योगिक वसाहतीमधील तुंगा रुग्णालयातून भोईसर मधील ओखार्ड रुगालयात शिफ्ट करण्यात आले. पण इतर कामगारांना त्याच ठिकाणी छोट्या रुग्णालयात ठेवण्यात आले. या वरून हे कळून येते की अपघात किंवा दुर्घटना झाल्यास मालकांना वेगळा उपचार व कामगारांना वेगळा उपचार हेच कृर वास्तव आहे. मृत्यू झालेल्या व गंभीर जखमी असलेल्या कामगारांच्या नातेवाईकांशी बोलतांना असे कळाले की मालकाकडून कामगारांना सरळ कामावर घेतले जात होते कारण त्यात मालकांचा फायदा होता. या पद्धतीने एक तर कामगारांना कोणत्याही सुविधा देण्याची गरज नाही जसे कि, पीएफ, बोनस, ईएसआयसी, अपघात विमा संरक्षण, ग्रेच्युईटी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे परमनंट करण्याची गरज नाही. म्हणजे कायमस्वरूपी नोकरीची हमी नाही, किमान वेतन नाही, आणि कोणत्याही सरकारी दरबारी त्यांची नोंदच केली जात नाही.

नफ्याच्या हव्यासापोटी आठ निर्दोष कामगारांचा बळी घेणाऱ्या या कंपनी सारख्या इतर धोकादायक कंपन्याची नोंदच प्रशासनाकडे नाही. तारापूर औद्योगिक वसाहतीत किती कारखाने कार्यरत आहेत व त्यात किती कामगार करतात याची कोणत्याच प्रकारे नोंद नसल्याचे उघडकीस आले आहे. कामगार आयुक्त कार्यालयास या बाबतीत निश्चित आकडेवारी देण्यास सांगितल्यास त्यांच्याकडे अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. भाजप सरकार सत्तेत आल्यावर कामगार कायद्यात `सुधार' करून नवीन नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमावली नुसार ज्या ठिकाणी ५० किंवा त्यापेक्षा कमी कामगार एकत्रित एका कारखान्यात काम करत असतील अशा कारखाना मालकास कोणत्याही परवान्याची गरज नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामागे सरकारी तर्क असा आहे की छोट्या उद्योगांना चालना मिळेल. पण प्रत्यक्षात पाहल्यास असे दिसून येते छोटे मालक कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी आतुर असतात व त्यासाठी ते कामगारांना जास्तीत जास्त राबवून घेतात कारण बाजारात आपल्या मालासह टिकण्यासाठी त्यांना कामगाराकडून कमी वेळेत जास्तीत जास्त उत्पादन करून घ्यायचे असते. या मध्ये कामगारांचे भयंकर पद्धतीने शोषण केले जाते. बऱ्याच कामगारांना पीएफ, बोनस, ईएसआयसी, अपघात विमा संरक्षण, ग्रेच्युईटी अशा कोणत्याही प्रकारच्या सुविधा कामगार म्हणून मिळत नाहीत. कायमस्वरूपी नोकरीची हमी नाही. कोणत्याही सरकारी दरबारी त्यांची नोंदच केली जात नाही आणि ज्यावेळेस कोणत्याही प्रकारच्या ओद्योगिक दुर्घटना होतात, तेव्हा मालक कामगारांना किरकोळ मोबदला देऊन हात काढून घेतात. किती तरी वेळेस हा मोबदला देखील दिला जात नाही. बऱ्याच ओद्योगिक दुर्घटनांमध्ये तर कामगारांना कायमचे अपंगत्व देखील येते पण त्याला देखील तो स्वतःच जबाबदार आहे असे भासवले जाते. यावरून सहज कळून येते कि अशा प्रकारे कंत्राटीकरणाच्या सवलती देणारे सरकारचे हे धोरण मालकांना फायद्याचे आहे पण कामगारांच्या जीवावर उठणारे आहे. तारापूर औद्योगिक वसाहतींच्या २०१८ च्या नोंदणी नुसार तारापूर या उपविभागात १६९ उद्योग, २४५ ठेकेदार आणि २८,६२५ कामगारांची नोंदणी कामगार उपविभागाकडे झाली आहे. पण हा आकडा वास्तवापेक्षा फार कमी आहे. काही अहवालानुसार या ठिकाणी लहान मोठे कारखाने मिळून संख्या १५०० पर्यंत आणि कामगार संख्या साधारणत: दीड ते दोन लाख असल्याची शक्यता आहे. या कारखान्यांमध्ये २०१५ ते आज पर्यंत ६०० पेक्षा जास्त अपघात झाले आहेत. त्यात स्फोट आणि वायूगळतीच्या घटना झाल्यामुळे २५ कामगारांचा मृत्यू झाला आहे. अपघात आणि स्फोट अशा घटना वारंवार होत असल्याच्या नोंदी आहेत. मोदी सरकारच्या सुधारित कामगार कायद्यामुळे कंपनी मालकाला स्वत:च कंत्राटी कामगारांना नियुक्त करण्याचा अधिकार आहे. त्याची पाहणी करण्यासाठी कोणताही सरकारी अधिकारी येणार नाही. मालकाने स्वत: या संबंधी माहिती ओद्योगिक सुरक्षा विभाग व आरोग्य विभागाकडे द्यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. यावरून हे लक्षात येते कि भाजप सरकारने केलेले कामगार कायद्यातील बदल हे कामगारांच्या जीवावर उठत आहेत. सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी धाब्यावर का आणि कोणासाठी? देशभरातील प्रदूषणकारी औद्योगिक वसाहतींच्या यादीत आघाडीवर असलेली तारापूर औद्योगिक वसाहत ही कामगारांसाठी असुरक्षित असलेली औद्योगिक वसाहत असल्याचे समोर आले आहे. कारखान्यात झालेल्या स्फोटामुळे दिसून आले आहे. १९९० पासून या परिसरात अनेक कारखान्यांमध्ये स्फोट झाले असून त्यात कित्यक कामगारांचे बळी गेले आहेत. याचा आकडा देखील सरकार दरबारी नाही. अपघात घडल्यानंतर काही दिवस या विषयावर चर्चा होते. आणि पुन्हा परिस्थिती पूर्वीसारखी होते. तारापूर येथील उद्योगांमधील संरक्षण नियमावलीला पूर्णपणे धाब्यावर बसवून हा सर्व मानवद्वेषी खेळ फक्त नफ्यासाठी खेळला जात आहे. तारापूरमध्ये रासायनिक उद्योग मोठ्या प्रमाणात असून किमान ३५ हून अधिक उद्योग हे अतिघातक विभाग म्हणून मोजले जातात. तारापूरमध्ये एमआयडीसी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच औद्योगिक सुरक्षा विभाग यांच्या मान्यतेने कंपनी खरेदी विक्रीचे सर्व प्रकार चालत असतात. त्यामुळे एखाद्या कंपनीची विक्री झाल्यास प्लॉट नव्याने खरेदी केलेल्या उद्योजकांकडून कोणती नवीन उत्पादने केली जात आहेत याची माहिती अनेकदा कोणत्याच विभागाकडे नसते. ओद्योगिक सुरक्षा प्रणालीचा वापर करण्यात येत नाही, कामगारांना कंपन्यामध्ये सुरक्षा यंत्रे दिली जात नाहीत व सुरक्षा नियमांची अंमलबजावणी मालक व व्यवस्थापनाकडून केली जात नाही. जागतिक मंदी तसेच स्पर्धात्मक वातावरणामुळे रासायनिक उद्योग हे गेल्या काही वर्षांपासून संकटात सापडले आहेत. त्यामुळे अनेक उद्योजक आपल्याकडे परवानगी असलेल्या उत्पादनाऐवजी अधिक नफा देणाऱ्या उत्पादकांकडे वळतात. मात्र त्यामुळे रासायनिक प्रक्रियेची पूर्ण माहिती नसल्याने किंवा या प्रक्रियेदरम्यान काही विपरीत घडल्यास किंवा कच्च्या मालामध्ये वेगळ्या घातक रसायनांची भेसळ असल्यास अपघात होत असल्याचे पाहण्यात आले आहे.

या अपघातानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस प्रणित सरकारने कडून मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्याचे जाहीर केले आहे, जी निश्चितपणे अत्यंत्त तोकडी आहे, आणि अशी मदत देऊन सरकार या प्रकारच्या अपघातांच्या जबाबदारीतून आणि दोषींना शिक्षा ठोठावण्याच्या कर्तव्यातून अंग काढून घेऊ शकत नाही हे निश्चित. आजवरचा अशा अपघातांमध्ये शिक्षा होण्याचा अनुभव नगण्य आहे, त्यामुळे यावेळी सुद्धा मालकांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाणार हे नक्की.

नफा वाढवण्यासाठी सर्रासपणे श्रम कायद्यांना धाब्यावर बसविण्यात येत आहे. भाजप सरकारने केंद्रामध्ये गेल्या सहा वर्षात कामगार कायद्यांमध्ये जे प्रचंड मोठे बदल केले आहेत ते खरोखर कामगारांचे जीवन अतिशय मोठ्या प्रमाणात प्रभावित करत आहेत. खरंतर हे कायदे फार काही सुविधा मिळवून देत नव्हते पण कागदोपत्री त्याचं थोडेतरी महत्त्व होतं; पण आता हे सुद्धा राहिलेलं नाही. देशभरामध्ये ९३% असंघटीत क्षेत्रातील कामगारांना देखील कामगार कायदे लागू केले जात नाहीत. आंदोलन करून कामगार काही अधिकार पदरात पाडून घेत होते, परंतू मोदी-शाह सरकारच्या काळात आंदोलनाचा अधिकारही काढून घेतला जात आहे. म्हणजेच 'ना रहेगा बांस, ना बजेगी बांसुरी' अशा पद्धतीचं हे सर्व धोरण आहे. पूर्ण देशभरातील उद्योगांमध्ये होणाऱ्या मृत्यूकांडांना सुद्धा मोदी सरकार जबाबदार आहे कारण कामगारांना थोडेफार मिळणारे अधिकार सुद्धा या फॅसिस्ट मोदी सरकारने हिरावून घेतले आहेत. आज कित्येक कारखान्यांमध्ये कामगारांना कोणत्याही प्रकारचे कारण न दाखवता कामावरून काढून टाकण्यात येत आहे. यात कामगार काहीच बोलू शकत नाहीत कारण श्रम विभागाने सुद्धा कान आणि नाक डोळे बंद केले आहेत. या व्यतिरिक्त राज्य सरकार आणि केंद्र सरकारने कामगारांना युनियन बनवणे देखील अशक्य करून टाकले आहे. अलीकडेच औद्योगिक विवाद कायद्याला पूर्णपणे संपवून टाकण्यासाठी एका विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. आपण पाहतो की अनेक कंपन्यांचे मालक हे कोणत्या ना कोणत्या राजकीय निवडणूकबाज पक्षाशी जोडलेले असतात किंवा हितसंबंध जोपासून असतात. असे राजकीय समर्थन असल्यामुळे अनेक बेकायदेशीर कामे करणे यांना सोयीचे जात असते. खरेतर मालक वर्ग मिळून सर्व भांडवली राजकीय पक्षांना खिशात घेऊनच फिरत असतो आणि सर्व भांडवली राजकीय पक्ष मालक वर्गानेच पोसलेले असतात. हेच मालक नफ्याच्या हव्यासापोटी कामगारांच्या जीवाशी खेळण्यास मागेपुढे पहात नाहीत. त्यामुळेच कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची मागणी घेऊन कामगार वर्गाला मालकवर्गासोबत प्रस्थापित राज्यसत्तेशी सुद्धा संघर्ष करावा लागेल.



सर्वात भिकार निरक्षर कुणाला म्हणावं तर राजकीय निरक्षराला. तो ऐकत नाही, बोलत नाही, राजकीय प्रक्रियेत सहभागी होत नाही. त्याला कळत नाही की जगण्याची किंमत, डाळीचे भाव, मासळीचे दर, पिठामिठाची किंमत, घरभाडं, जोड्यांची किंमत, औषधांच्या किमती सारं काही राजकीय निर्णयांवरून ठरतं. आपल्या राजकीय अजाणतेपणाचा त्याला अभिमान सुद्धा वाटतो आणि छाती फुगवून तो सांगत रहातो की मी राजकारणाचा द्वेष करतो. त्या राजकीय बेअक्कल माणसाला हे कळत नाही की त्याच्या राजकीय अज्ञानातूनच जन्माला येते वेश्या, बेवारस मूल, दरोडेखोर आणि सर्वात वाईट म्हणजे भ्रष्ट अधिकारी, शोषणकारी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे तळवेचाटू नोकर.

✍ **बर्टोल्ट ब्रेष्ट**

# देशातील हत्यारांच्या कंपन्यांचे खासगीकरण: देश विकण्याचे भाजपचे पुढचे पाऊल

✍ रवी

मागील काही दिवसांमध्ये आपण सर्वांनी सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग, पी.एस.यु., PSU) सरकारने विकण्यास काढल्याच्या अनेक बातम्या ऐकल्या. त्यामध्ये संरक्षण क्षेत्रातील पीएसयु (DPSU) सुद्धा सामील आहेत. ऑक्टोबर 2016 मध्ये सरकारने भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड (बी.ई.एम. एल., BEML) या डी.पी.एस.यु. चे 26 टक्के शेअर्स खाजगी क्षेत्राला विकण्याची घोषणा केली. त्यामुळे भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच संरक्षण मंत्रालयाकडून एका सर्वात जास्त नफा उत्पन्न करणाऱ्या कंपनीची मालकी निघून जाणार आहे.

नवरत्न म्हणवणाऱ्या नऊ डी.पी.एस.यु. पैकी एक, बी.ई.एम.एल. ही संरक्षणाच्या उपकरणाचे उत्पादन करणारी भारतातील अग्रगण्य कंपनी आहे. बी.ई.एम.एल. ची स्थापना मे 1964 मध्ये झाली. खाणकाम व बांधकाम, संरक्षण आणि रेल्वे व मेट्रो या संबंधित उपकरणांच्या निर्मितीचे काम ही कंपनी करते. सरकारने तिच्या सरकारी शेअर धारणेचे प्रमाण ५४.०३ टक्क्यांवरून 28.03 टक्क्यांवर आणण्यास मान्यता दिली आहे, म्हणजेच 26 टक्के कपात. 5 कोटी भांडवलाच्या गुंतवणुकीने सुरु झालेल्या बी.ई.एम.एल. कंपनीची उलाढाल आज 3,500 कोटींची आहे. म्हणून असेही म्हणता येणार नाही की तोटा होत असल्यामुळे मोदी सरकारने हे रत्न विकण्यास काढले आहे. अशीच हालचाल सरकारने इतर दहा पी.एस.यु. साठी सुरु केली आहे. वित्तीय तूट भरून काढणे, नफा आणि कार्यक्षमता वाढवणे ही कारणं यामागे दिली जातात. पण खरे तर मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना (कॉर्पोरेट्सना) संरक्षण क्षेत्रात पदार्पण करता यावे म्हणून हा सगळा खटाटोप चाललेला आहे. फेब्रुवारी 2018 पर्यंत उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागाने 210 भारतीय कंपन्यांना विविध संरक्षणात्मक उपकरणांच्या निर्मितीसाठी 348 परवाने दिले. त्यातील 70 कंपन्यांनी फेब्रुवारी 2018 पर्यंत उत्पादन प्रक्रिया सुरु केली होती. सध्याच्या थेट विदेशी गुंतवणुकीच्या (एफ.डी.आय., FDI) धोरणानुसार, ऑटोमॅटिक रूट अंतर्गत संरक्षण क्षेत्रात 49 टक्क्यांपर्यंत विदेशी गुंतवणुकीची परवानगी आहे. ऑटोमॅटिक रूट अंतर्गत विदेशी गुंतवणूकदार किंवा भारतीय कंपनीला गुंतवणूक करण्यासाठी भारतीय रिजर्व बँक किंवा भारत सरकारच्या मान्यतेची गरज नाही. 49 टक्क्यांच्या पुढची (100 टक्क्यांपर्यंत) विदेशी गुंतवणूक सरकारच्या मान्यतेने करता येते. फेब्रुवारी 2018 पर्यंत संरक्षण क्षेत्रामध्ये अशा 40 एफ.डी.आय. गुंतवणुकींना मान्यता देण्यात आल्या आहेत.

३१ मे २०१७ रोजी मोदी सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने भारतीय खाजगी क्षेत्रासाठी स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप मॉडेल(रणनितीक भागीदारी प्रारुप) ची घोषणा केली. याअंतर्गत काही खाजगी कंपन्या रणनितीक भागीदार (स्ट्रॅटेजिक पार्टनर, एस.पी.) म्हणून निवडण्यात येतील ज्या उत्पादन आणि संशोधन, कुशल कार्यबळ आणि अद्ययावत तंत्रज्ञानामध्ये लांब पल्ल्याची गुंतवणूक करतील. संरक्षण उद्योगाचा मजबूत पाया रचणे हे या मागचे उद्दिष्ट सांगण्यात आलेआहे. यामध्ये लार्सन अँड टुर्बो, टाटा, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स डिफेन्स, भारत फोर्ज आणि अडानी ग्रुप चा समावेश आहे. सुरुवातीच्या काळात हे एस.पी. लढाऊ विमाने, हेलीकॉप्टर, पाणबुडी आणि मिलिटरीची लढाऊ वाहने बनवण्याचे काम करणार आहेत. राफेल घोटाळा सुद्धा संरक्षण क्षेत्राच्या खाजगीकरणाचाच एक भाग होता. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एच.ए.एल., HAL) सारखी मोठी पी.एस.यु. असताना अंबानीला संरक्षण क्षेत्रात उतरवणे अशक्य होते. म्हणून राफेल घोटाळा करून राफेल विमान बनवण्याचे कॉन्ट्रॅक्ट रिलायन्स डिफेन्स लिमिटेड ला देण्यात आले आणि सक्षम सरकारी कंपनी एच.ए.एल. ला वाऱ्यावर सोडले गेले.

जगातील संरक्षण क्षेत्रावर सर्वात जास्त खर्च करणारा देश म्हणजे अमेरिका. अमेरिकेच्या संरक्षण क्षेत्राचे खाजगीकरण शीत युद्धाच्या काळापर्यंत पूर्ण झाले होते. अमेरिकेत तयार होणारी जवळपास सर्व युद्धसामग्री खाजगी कंत्राटी कंपन्या बनवतात. शीत युद्धाचा शेवट हा अनेक देशांच्या संरक्षण क्षेत्रातील उद्योगांसाठी एक निर्णायक टप्पा होता. शीत युद्धाच्या काळात प्रत्येक देशाला कोणत्याही युद्धाच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज राहावे लागे, त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील उद्योगधंदे सुद्धा वाढवावे लागले. यामुळे संरक्षण क्षेत्रातील खाजगी कंपन्या अफाट फुगल्या. परंतु शीत युद्धाच्या काळानंतर जगाचे चित्र वेगळे होते. 1989 ते 1996 मध्ये संरक्षण क्षेत्रावर होणारा जागतिक खर्च 33% नी कमी झाला. अनेक कंपन्या बंद पडल्या आणि उरलेल्या एकमेकांमध्ये विलीन होऊन अजून मोठ्या झाल्या. पण संरक्षण क्षेत्रातील उद्योग नष्ट झाले नाहीत, तर त्यांनी एक नवे रूप धारण करून सर्वव्यापी युद्धाच्या स्थितीला प्रादेशिक युद्धांमध्ये रूपांतरित केले.

नक्कीच युध्दांचा आणि संरक्षण क्षेत्रातील खाजगी उद्योगांचा घनिष्ट संबंध असतो. खाजगी हत्यार उद्योगांचे हित यामध्येच आहे की हत्यारं विकली जावीत आणि त्याकरिता युद्ध किंवा युध्दाची परिस्थिती असणे आवश्यक आहे. त्यामुळेच संरक्षण क्षेत्रातील उद्योग आपापल्या आणि इतर देशातील राजकारणाला सुद्धा प्रभावित करतात. अमेरिकेमध्ये हा प्रभाव कित्येक पटींनी अधिक आहे. जगातील सर्वात मोठा संरक्षण क्षेत्रातील उत्पादक, निर्यातक आणि खर्च करणारा देश असल्यानेतिथली सैनिकी औद्योगिकयंत्रणा (मिलीटरी इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, एम.आय.सी. MIC) प्रचंड मोठी आणि विनाशकारी आहे. एम.आय.सी. कडून अमेरिकन राजकारण्यांना मोठ्या प्रमाणात योगदान किंवा लाच दिली जाते आणि त्यांच्याद्वारे कित्येक कंत्राट कंपन्यांच्या घशात घातले जातात. अनेकवेळा युद्धाचे निर्णय सुद्धा या कंपन्यांचेच असतात. असे खाजगी शस्त्र उद्योग कोणत्याही शांतता कराराच्या विरोधातच असतात आणि सतत सैन्यवाढीवर भर देतात जेणेकरून त्यांचा उद्योग आणि नफा वाढेल. यांच्यासाठी युद्ध हाच नफा आहे. या कंपन्या कायदेविषयक बाबींमध्ये हस्तक्षेप करतातच आणि देशाच्या परराष्ट्र धोरणांवरसुद्धा निर्णायक नियंत्रण ठेवतात. उदाहरणार्थ, जॉर्ज बुश दुसरा याच्या काळातील अमेरिकेचे उपराष्ट्रपती डिक चेनी हे स्वत: हॅलीबर्टन या मोठ्या शस्त्र कंपनीचे अध्यक्ष होते! हे सर्व आधुनिक मृत्यूचे व्यापारी मानवी हक्कांकडे दुर्लक्ष करून आपला नफा वाढवण्यात गुंतलेले असतात. भारतात संरक्षण क्षेत्र नेहमीच विदेशी खाजगी शस्त्र कंपन्यांच्या दलालीवर पोसलेले होते. बोफोर्स सारखे अनेक घोटाळे तर जनता जानतेच. आता भारतीय कंपन्याच या क्षेत्रात उतरल्यामुळे भारत सुद्धा अमेरिकेच्याच मार्गावर जास्त वेगाने वाटचाल करू लागला आहे. याचा धोका समजण्यासाठी भारत पाकिस्तानचे उदाहरण घेऊ. जर भारत-पाकिस्तान युद्ध झाले तरच युद्ध सामग्रीची मागणी वाढेल आणि या उद्योगांचा नफा वाढेल. म्हणून भारत-पाकिस्तानामध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्यावर या उद्योजकांचा नेहमीच जोर असतो. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय अस्थिर वातावरण निर्मितीमध्येच त्यांचे हितसंबंध निहित आहेत.

भारतात केंद्र सरकारच्या संरक्षण क्षेत्रातील खाजगीकरणाविरुद्ध 2017 पासून डी.पी.एस.यु. मध्ये काम करणाऱ्या कामगारांनी अनेक ठिकाणी वेळोवेळी आंदोलने केली. यातील सर्वात मोठे आंदोलन 20 ऑगस्ट 2019 रोजी सुरु झाले ज्यात ऐंशी हजार कामगारांनी सहभाग नोंदवला. आयुध निर्माणी बोर्ड (ऑर्डनन्स फॅक्टरी बोर्ड, ओ.एफ.बी., OFB) ला कॉर्पोरेट कंपन्यांना सोपविण्याच्या सरकारच्या हालचालींविरोधात संप करण्यात आला. ओ.एफ.बी. अंतर्गत 41 तोफखाना कारखाने आहेत. गणवेशापासून गोळ्यांपर्यंत सर्वांचे उत्पादन या कारखान्यांमध्ये होते. बोर्डाचे प्रतिवर्षी 2,000 कोटींचे बजेट असून 82,000 कर्मचारी येथे काम करतात आणि बोर्डाकडे देशभरात 60,000 एकर पेक्षा जास्त जमीन आहे. मागील 15 वर्षांमध्ये तीन सरकारी समित्यांनी कार्यक्षमता वाढवण्यासाठी ओ.एफ.बी. चे खाजगीकरण करण्याचा सल्ला दिला. मागील वर्षाच्या शेवटी याला सुरुवात झाली जेव्हा सरकारने 275 नॉन-कोर (कमी महत्वाच्या) वस्तू खुल्या बाजारातून विकत घेण्याचे ठरवले. ओ.एफ.बी. ला पी.एस.यू. बनवून तिचे खाजगीकरण करण्याच्या सरकारच्या हेतूला साध्य होऊ न देण्या करता 80,000 कर्मचारी संपावर गेले. परंतु असा कोणताही हेतू नसल्याचा सरकारने दावा केल्यावर हा संप मागे घेतल्या गेला आहे. अर्थातच सरकारच्या या दाव्यावर विश्वास ठेवणे आत्मघातकीच ठरेल

'मै देश को बिकने नही दूंगा' म्हणणारे प्रधानमंत्री मोदी, आणि देशाच्या संरक्षणाचे आणि सैनिकांचे राजकारण करणारा त्यांचा पक्ष भाजप यांचे खरे रुप हेच आहे की हे भांडवलदार वर्गाचे हस्तक आहेत आणि भांडवलदारांच्या हितांसाठी ते संरक्षण कंपन्यांचा सुद्धा जीव द्यायला तयार आहेत हेच संरक्षण क्षेत्राच्या खाजगीकरणातून दिसून येते.

# अयोध्या निकाल : कायदा नव्हे, श्रद्धेच्या नावावर बहुसंख्यांकवादाचा विजय

पान 7 वरून

घटनांचा हिशेब वर्तमानात केला जाऊ शकत नाही व केल्यासुद्धा जाऊ नये. इतिहासाला उलट्या दिशेने नेता येत नाही व नेऊ पण नये. आजच्या काळाचा हा जिवंत प्रश्नच नाहीये. ज्या देशातील तीन-चतुर्थांश जनता भयंकर गरिबी मध्ये जगते, जिथे अर्ध्याहून जास्त लहान मुले कुपोषित आहेत; जिथे ३० कोटी बेरोजगार आहेत; जिथे एक-चतुर्थांश जनता बेघर आहे किंवा झोपड्यांमध्ये आपले जीवन जगत आहे, जिथले ६० कोटी कामगार अमानवीय परिस्थितीमध्ये जगण्यास व हाडे मोडून घेण्यास भाग पाडलेले आहेत आणि जिथे समाज घृणास्पद धार्मिक व जातीय भेदभाव व स्त्रियांवर अमानवी शोषणाचा दंश झेलत आहे, तिथे मंदिर आणि मशिदीचा प्रश्न हा प्राथमिक कसा असू शकतो? तिथे इतिहासात शेकडो वर्षांपूर्वी झालेल्या अन्यायाचा बदला घेणे मुद्दा कसा काय असू शकतो, जेव्हा वर्तमानातच अन्याय व शोषण भयंकर रुपात समाजात हजर आहेत?

आणि जर हा खरच मुद्दा आहे, तर ते प्रत्येक स्थान, जिथे आज मंदिर किंवा मशिद आहे, त्याच्या इतिहासात जाऊन बघावं लागेल. त्याच ठिकाणावर पूर्वी कदाचित अनेक-अनेक प्रकारची धर्मस्थळे असतील. आपण कोण-कोणते तोडायचे आणि कोण-कोणते बनवायचे? जरा तार्किक विचार या मुद्द्यावर केला तरी लक्षात येईल की हा किती निरर्थक, मागे घेऊन जाणारा व प्रतिक्रियावादी मुद्दा आहे. इतिहासाला मागे नेणाऱ्या शक्तीच आज याचा वापर करत आहेत व जनतेच्या मागासपणाचा व वर्ग चेतनेच्या अभावाचा फायदा घेऊन त्यांची दिशाभूल करत आहेत. आज गरीब कष्टकरी जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यात त्यांना अजिबात रस नाही आहे, जे कि वास्तविक रित्या इतिहासाला व समाजाला पुढे घेऊन जाईल. त्यांचा रस त्या शेकडो वर्षांपूर्वीच्या एका अन्यायाविरुद्ध लढण्यात आहे, जो ठाम पणे सांगता सुद्धा येत नाही की खरच घडला होता. धर्मवादी फॅसिझम ही अशीच एक ताकद आहे जी सामान्य भारतीय जनतेतील तार्किक दृष्टीची कमतरता, वर्ग चेतनेची कमतरता, वैज्ञानिकतेची कमतरता, यांचा फायदा उचलून त्यांच्यात धर्माच्या आधारावर फूट पाडते. भांडवलदार वर्गासाठी सुद्धा ही एक सेवा आहे, कारण ती सर्वहारा वर्गाच्या एका भल्यामोठ्या हिश्श्यामध्ये एका अशा प्रश्नावर फूट पाडते, जो त्या वर्गासाठी वास्तविक प्रश्नच नाहीये.

खरंतर, धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीकोनाने अर्धी लढाई त्याच दिवशी हरली होती ज्या दिवशी या प्रकरणाला एक 'टायटल सूट' म्हणजेच एका मालकीच्या हक्काच्या लढाईत रुपांतरीत करण्यात आले. सुरुवातीपासूनच भाजप, विश्व हिंदू परिषद व आर. एस. एस. च्या राम मंदिर आंदोलनाचा विरोध या तर्काच्या आधारावर व्हायला पाहिजे होता, की शेकडो वर्ष जुन्या घटनेचा आज बदला घेण्यात काहीच अर्थ नाहीये. काँग्रेस व इतर भांडवली पक्षांपासून अशी अपेक्षा करण्यात काही फायदा नव्हताहे कारण या पक्षांची तथाकथित धर्मनिरपेक्षता सुरुवातीपासूनच "सर्वधर्म समभाव" च्या नावावर बहुसंख्याक हिंदू व बऱ्याचदा अल्पसंख्याक मुसलमान जनतेचे लांगुलचालन करण्याच्या रूपातच समोर येत राहिली आहे. धर्माच्या कार्डाचा सगळ्यांनी आपापल्या हिशोबाने निवडणुकांमध्ये उपयोग केला आहे. पण स्वतःला डाव्या म्हणणाऱ्या पक्षांनी सुद्धा कामगारवर्गीय दृष्टीकोनाला कधी मजबूतीने समोर केले नाही. ते पण धर्मनिरपेक्षतेच्या नावावर कधी मुलायम सिंह यादवचे तर कधी काँग्रेसचे शेपूट बनून राहिले आणि भाजप व संघाच्याच तर्कांना जनतेत स्थापन करण्यात मदतीचा हात देत राहिले. देशातील क्रांतिकारी डाव्या शक्ती एक तर तुकड्या-तुकड्यांमध्ये विखुरलेल्या होत्या, आणि त्यातील बहुतेक गटांमध्ये या मुद्द्यावरील योग्य सर्वहारा दृष्टीकोन लोकांमध्ये घेऊन जाण्याच्या धाडसाचा अभाव होता.

आज आपल्याला एक योग्य वैज्ञानिक दृष्टी घेऊन या अनैतिहासिक व अतार्किक प्रश्नांना बाजूला करून शासक वर्गाच्या कटाला समजण्याची गरज आहे. वास्तवात आजची लढाई आजच्या अन्यायाविरुद्ध आहे. आजचे भांडवली शोषण व अन्याय सर्वहारा वर्गाचा सगळ्यात मोठा शत्रू आहे व आपला पूर्ण संघर्ष त्या विरुद्ध असायला हवा. आपण धर्मवादाच्या जाळ्यात फसून मंदिर मशिदीच्या भांडणात पडायला नको. ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे की सर्व भांडवली पक्ष, मग तो काँग्रेस-राष्ट्रवादी असो, भाजप-शिवसेना असो, सपा किंवा बसपा किंवा इतर पक्ष असोत, मंदिराच्या मुद्द्याभोवती आपआपल्या रीतीने जनतेत फूट पाडायला सरसावले आहेत. खरंतर, भारतातील सामान्य जनतेमधील एक मोठा भाग या गोष्टीला समजू लागला आहे. त्यामुळेच या मुद्द्यावर संघींना व भाजपायींना जास्त तीव्र ध्रुवीकरण करता आले नाही. पण आपण नेहमी समाजातील या प्रतिक्रियावादी विचारांविरुद्ध लढायला पाहिजे जे इतिहासातील काल्पनिक अन्यायासाठी कामगारवर्गाचा बळी देण्यामागे लागले आहेत. अशी विचारधारा कामगारवर्गाची व संपूर्ण इतिहासाची शत्रू आहे.

अनुवाद- अभिलाष

# आसाम मध्ये एन.आर.सी ने उडवला हाहाकार! 19 लाख गरिब कष्टकरी तुरुंगांच्या मार्गावर!

**पान 1 वरून**

ठरलेली तारीख आधार मानून त्या नंतर भारतात आलेल्यांना बेकायदेशीर मानले गेले.

**आसामच्या एन.आर.सी. च्या प्रक्रियेची भीषणता**

आसाम मध्ये एन.आर.सी. ची प्रक्रिया ही अर्जाच्या पद्धतीने झाली. (भारतामध्ये होणारी ए.पी.आर. ची प्रक्रिया जी एन.आर.सी. ची तयारी आहे, ती अर्जाद्वारे नाही तर घरोघरी नोंदणीने होईल). जवळपास 3.29 कोटी लोकांना रांगेत उभे करून अर्ज भरायला लावण्यात आले. यामध्ये 1971 च्या अगोदरचे स्वत:चे कागद उपलब्ध करवणाऱ्या नागरिकांना 16 कागदपत्रांपैकी एक कागदपत्र सादर करण्यास सांगितले गेले. या 16 कागदांमध्ये 1951 साली झालेली एन.आर.सी., 1971 च्या अगोदरच्या मतदार यादी, जमिनीचे कागद, नागरिकता प्रमाणपत्र, कायमस्वरूपी वास्तव्य प्रमाणपत्र, शरणार्थी नोंदणी प्रमाणपत्र, पासपोर्ट, एल.आय.सी, एखादे सरकारी लायसन्स किंवा प्रमाणपत्र, सरकारी नोकरीचे प्रमाणपत्र, बँक अकाऊंट, जन्मदाखला, बोर्ड किंवा विद्यापीठाचे प्रमाणपत्र, कोर्टाचे कागद ही कागदपत्रे होती. लक्षात घ्या की हा कागद 24/3/71 च्या अगोदरचा असणे आवश्यक होते! असे 1971 च्या अगोदरचे स्वत:च्या नावाचे कागद ज्यांच्याकडे नाहीत पण आई-वडीलांपैकी कोणाचे कागद उपलब्ध असल्यास स्वत:साठी यादी 'ब' मधील 8 पैकी एक असे कागदपत्र उपलब्ध करून देण्यास सांगण्यात आले. यादी 'ब' मध्ये खालील कागदपत्र होती: जन्मदाखला, जमिनीचे कागद, बोर्ड/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, बँक/एलआयसी/पोस्ट ऑफीस रेकॉर्ड, विवाहित महिलेसाठी सर्कल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मतदार यादी, रेशन कार्ड किंवा इतर कायदेशीर कागदपत्र.

या प्रक्रियेमध्ये एकूण 52,000 च्या वर कर्मचारी कामाला लावले गेले. एकूण 4 वर्षे ही प्रक्रिया चालली. यामध्ये रु. 1220 कोटींच्यावर खर्च झाला. या संपूर्ण काळात लाखो नागरिकांना अनेकदा आपल्या गावांपासून दूर शेकडो किलोमीटर प्रवास करून अनेकदा रांगा लावाव्या लागल्या. अनेकांना कागदपत्रांसाठी घरदार, शेती गहाण टाकावी लागली किंवा विकावी लागली. 35 च्या वर नागरिकांनी फक्त या प्रक्रियेच्या मनस्तापामुळे आत्महत्या केल्या! भारताच्या सरकारी ऑडिटर संस्थेचा म्हणजे कॅगचा अंदाज आहे की या प्रक्रियेत कागदपत्रे मिळवण्यासाठी जवळपास रु. 1600 कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे.

**आसाम एन.आर.सी. चा निकाल आणि हाहाकार**

या अतिप्रचंड मनस्तापी प्रक्रियेमध्ये तीन वेळा नागरिकांच्या याद्या प्रकाशित करण्यात आल्या. पहिली यादी 31 डिसेंबर 2017 रोजी प्रकाशित झाली. यामध्ये 3.29 कोटी पैकी 1.9 कोटी सामील होते म्हणजेच 1.39 कोटी लोक वगळले गेले! या सर्व 1.39 कोटी लोकांनी पुढील अनेक महिने कागदपत्रे गोळा करत, दुरवर चकरा मारत, अर्ज करत सरकारकडे दावे केले. यानंतर दुसरी यादी 30 जुलै 2018 रोजी प्रकाशित झाली ज्यामध्ये 40 लाख लोक वगळले गेले. या लोकांना पुन्हा एकदा अनेक महिने चकरा, मनस्ताप, अर्ज विनंत्या, वेळ आणि पैसा खर्च भोगावा लागला. शेवटी अंतिम यादी 31 ऑगस्ट 2019 रोजी प्रकाशित झाली ज्यामध्ये 19 लाख लोक वगळले गेले आहेत. हे नागरिक आता परकीय 'घुसखोर' जाहीर झाले आहेत, ज्यापैकी अंदाजे 13 लाख हिंदू आहेत!

जर आपण आज भ्रमात असू की आपल्याकडे कागदपत्रे आहेत आणि भारताच्या एन.आर.सी. मध्ये आपण तर सुटूनच जाऊ तर आसामाच्या अनुभवाच्या खोलात जाणणे कदाचित आपल्या भ्रमाला तोडायला मदत करेल. नागरिकांच्या यादीमध्ये सामील न झालेल्या काही व्यक्तींची मोजकी उदाहरणं तुम्हाला धक्का देतील. नागरिकांच्या यादीतून बाहेर असणाऱ्यांमध्ये आहेत :

- आसाम मधील तत्कालीन आमदार अनंत कुमार मालो;
- आसामच्या माजी मुख्यमंत्री सईदा अमुरा तन्वूर;
- माजी राष्ट्रपती फक्रुदिन अली अहमद यांच्या भावाच्या मुलाचे (साजीद अली अहमद) कुटुंब;
- सबिमल बिश्वास हे 73 वर्षे वयाचे गृहस्थ जे स्टेट बँकेतून निवृत्त झाले;
- रिता भट्टाचार्य या तेजपूर मध्ये राहणाऱ्या निवृत्त शिक्षिका;
- सुप्रिया सहा ज्या यादीबाहेर आहेत आणि त्यांचे पती कार्तिक सहा मात्र यादीमध्ये आहेत,
- महंमद सनाउल्लाह हे सैन्यातून निवृत्त नागरिकत्वातून बाहेर झाले; यांचे कुटूंबीय यादीत आहेत, पण स्वत: बाहेर आहेत
- ताजब अली ज्यांचे नाव 1966 पासून प्रत्येक मतदार यादीत होते ते इतर कागदपत्रांमध्ये स्पेलिंगची चुक असल्यामुळे यादीबाहेर;
- साजिदा बिबी स्वत: यादीबाहेर आहेत पण मुलगा यादीत आहे;
- मीना हजारीका स्वत: यादीत आहेत पण दोन मुली यादी बाहेर आहेत;
- एवढेच नाही तर 102 वर्षे वयाचे महंमद मुनव्वर अली, अप्पर आसाम मधील एका खेड्यात राहणारे, जे स्वातंत्र्य आणि राज्यघटने अगोदर हे जन्माला आले होते, ते सुद्धा यादीबाहेर आहेत!

अत्यंत उच्चपदस्थ व्यक्ती सुद्धा ज्या यादीतून सुटू शकल्या नाहीत तेथे गरिब कष्टकऱ्यांची काय




स्थिति असेल? वास्तव हेच आहे की 19 लाख लोक जे नागरिकत्वातून बाहेर झाले आहेत, ते तेच गरिब-कष्टकरी आहेत ज्यांच्याकडे कागद नव्हता.

भारतात जर अशी एन.आर.सी. बनणार असेल तर स्पष्ट आहे की समाजातील सर्वात वंचित घटक ज्यात सर्व जातधर्मीय गरिब, झोपडपट्टीवासी, शेतमजूर, कामगार, छोटे शेतकरी, प्रवासी कामगार (एका जागेहून दुसरीकडे कामासाठी गेलेले), महिला येतात; तसेच भटके विमुक्त, दलित, आदिवासी येतात, हेच सर्वाधिक प्रभावित होणार कारण याच घटकांकडे कागदपत्रे नसतात किंवा अपुरी असतात!

**संघ परिवार तोंडघशी! पश्चाताप?**

अनेक दशके संघ परिवारातील विविध संघटना सतत असा दावा करत होत्या की कोट्यवधी बांग्लादेशी मुस्लिम आसामात आहेत आणि ते देशाला धोका आहेत व भारताला पाकिस्तान बनवणार आहेत! आसाम मधील एन.आर.सी. प्रक्रिया राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये भाजप सरकार असतानाच राबवली गेली. यामध्ये कोट्यवधी नाही तर 19 लाख लोक नागरिकत्व सिद्ध करू शकले नाहीत आणि त्यातही 13 लाखांच्या आसपास लोक हिंदू निघाले. या निकालामुळे एका बाजूला 19 लाख लोकांना प्रचंड मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे, परंतु संघ परिवाराचा प्रचार पुरता उघडा पडला आहे. **हिंदूंचे रक्षक असल्याचे दावा करणाऱ्या या संघटनांच्या सरकारने स्वत:च इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिकांना बेदखल केल्यामुळे त्यांच्या खोट्या प्रचाराचा फुगा फुटला आहे.** यावर 'उपाय' म्हणून आता गृहमंत्री अमित शहांच्या नेतृत्वात भाजप-आर.एस.एस.ने सी.ए.ए. 2019 या नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानुसार सर्व अ-मुस्लिम बेकायदेशीर प्रवाशांना नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाविरोधात मात्र आसाम मध्ये आंदोलन पुन्हा तीव्र झाले आहे कारण तेथील लोकांचा नेहमीच सर्व बाहेरच्या लोकांना (फक्त मुस्लिम नव्हे) विरोध होता. या विरोधाचे समर्थन नक्कीच केले जाऊ शकत नाही, कारण तो प्रादेशिक-भाषिक अस्मितेचा पुरस्कार करतो, परंतु या सर्व प्रकरणातून संघ परिवारातील संघटनांची गोची नक्कीच झाली आहे. ही एन.आर.सी. प्रक्रिया झाल्यावर आता आसामचे भाजपचे मुख्यमंत्री, सर्वोच्च न्यायालयात गेलेले आसाम पब्लिक वर्क्स, आसू अशा सर्वच जणांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे आणि एन.आर.सी. ची प्रक्रिया व्यवस्थितपणे राबवली गेलेली नाही असा दावा ते आता करत आहेत. अर्थातच ही प्रक्रिया त्यांच्याच सरकारांच्या कार्यकाळात आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निगराणीखाली राबवली गेली असल्यामुळे त्यांची सुद्धा प्रचंड गोची झाली आहे.

आसामात तोंडघशी पडलेला संघ परिवार आता मात्र देशभरात एन.आर.सी. लागू करून देशातील जनतेला वेठीस धरू पहात आहे.

**जे नागरिकत्वातून बाहेर झाले, त्यांचे पूढे काय?**

नागरिकत्वातून बाहेर झालेल्या सर्व व्यक्ती आता बेकायदेशीर प्रवासी (भाजपच्या शब्दात 'घुसखोर') जाहीर झालेले आहेत. या सर्व व्यक्तींना आता 'फॉरेनर्स ट्रिब्युनल' म्हणजे विदेशी लोकांसाठी असलेल्या विशेष कोर्टासमोर अर्ज करावा लागेल. लक्षात घेणे आवश्यक आहे की या सर्व व्यक्तींना आता कायद्यासमोर विदेशी म्हणूनच वागवले जाईल. सर्वसाधाररित्या या प्रक्रियेसाठी वकील करावे लागतात आणि मोठा खर्च करावा लागतो. जर येथेही न्याय नाही मिळाला तर उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागतील. देशामध्ये किती लोकांना हा खर्च परवडू शकतो? थोडक्यात देशाच्या स्तरावर कोट्यवधी गरिब लोक जे कोर्ट किंवा ट्रिब्युनलचा खर्च उचलू शकणार नाहीत, त्यांना नागरिकत्व मिळण्याची शक्यता नाही.

अशा बेकायदेशीर नागरिकांची रवानगी केली जाईल डिटेन्शन सेंटर मध्ये. डिटेन्शन सेंटर किंवा स्थानबद्धता केंद्र हे असे तुरुंग आहेत, जेथून बाहेर निघणे शक्य नाही. ही एक प्रकारची मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षाच आहे. एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की 3 वर्षांनंतर 1 लाख रुपयांचा जामीन दोन भारतीय देऊ शकतात. परंतु इतक्या मोठ्या खर्चाचा जामीन खर्च गरिब वर्ग करूच शकत नाही हे वास्तव आहे!

या बाबतीतही भाजप सरकार धादांत खोटे बोलत आहे की असे डिटेन्शन सेंटर कुठेच नाहीत. वास्तव हे आहे की 27/11/19 रोजी संसदेतच यांनी जाहीर केले की अशा बेकायदेशीर घोषित लोकांपैकी 1043 लोक तुरुंगात आहेत आणि राज्यसभेत हे सुद्धा जाहीर केले गेले की यापैकी 28 लोक तर आजारपणाने मेले आहेत! अशा केंद्रांपैकी आसामचे गोलपारा सेंटर हे 15 मजली असून त्याची भिंत20 फूट उंच आहे. 46 कोटी खर्च झालेल्या या बंदीगृहाची क्षमता 3000 लोक क्षमता आहे! आसाम मध्ये असे कमीत कमी 4 केंद्र बांधले जात आहेत. महाराष्ट्रातही नेरूळ जवळ असे एक डिटेन्शन सेंटर बांधण्याचे काम भाजप-शिवसेनेच्या युतीच्या फडणवीस सरकारने चालू केले होते.

**सावध व्हा!**

या बंदीगृहांचे मुख्य उद्दिष्ट फक्त मुस्लिमांना कैद करणे नाहीये तर इथे पाठवल्या जाणाऱ्या सर्वधर्मीय गरिब लोकांकडून गुलामी काम करवून त्यांचे प्रचंड शोषण करणे हेच आहे. हिटलरने ज्याप्रकारे अंधराष्ट्रवादी तत्वज्ञानावर आधारित प्रचार करून, आपल्या कॅडर द्वारे झुंडीसारखे हल्ले करवून विरोधकांना ठेचले, आणि 'ज्यू' लोकांना नकली शत्रू ठरवून त्यांना बंदीगृहांमध्ये टाकले, ते फक्त वांशिक द्वेषातून नव्हते. या बंदीगृहांमध्ये त्यांच्याकडून विविध जर्मन कंपन्यांकरिता (यात बेंझ, बॉश, क्रुप्प सारख्या आज अस्तित्वात असलेल्या कंपन्याही येतात) गुलामी कामासारखे काम करणारे मजूर पुरवले! यामुळे देशांतर्गत सुद्धा मजुरीचे भाव कोसळले आणि भांडवलदारांचा नफा वाढवायला हातभार लावला. भारतातही अशाप्रकारे बेकायदेशीर घोषित झालेल्या लोकांकाडून विविध मोठ्या कंपन्यांकरिता मोफत किंवा अल्पमजुरीवर काम करवून घेतले जाईल! आसाम मधील बंदीगृहांच्या दुरावस्थेच्या कहाण्या समोर येत आहेत. आजारांमुळे, इलाजा अभावी मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कहाण्या सुद्धा समोर येत आहेत. उदाहरणार्थ आसामच्या नलबारी जिल्ह्यातील फलू दास या 70 वर्षीय व्यक्तीचा आजाराने मृत्यू झाला. यानंतर त्याच्या नातेवाईकांनी त्याचे शव स्विकारण्यास असे म्हणत नकार दिला की सरकारने त्यांच्या आजाराबद्दल परिवाराला अंधारात ठेवले! अशा अनेक थरकाप उडवणाऱ्या गोष्टी येत्या काळात समोर येतीलच.

***विषाची परिक्षा घ्यायची नसते. आसामच्या अनुभवावरून धडा घ्या, वेळीच जागे व्हा आणि एन.पी.आर., एन.आर.सी. च्या विरोधातील आंदोलनात सहभागी व्हा!***

# कॉम्रेड लेनिन यांच्या स्मृतीदिना (21 जानेवारी) निमित्त - लेनिन च्या मृत्यूवर कँटाटा

✍ बर्टोल्ट ब्रेष्ट

1.
ज्या दिवशी लेनिन गेले
म्हणतात की, शवाच्या निगराणीत तैनात एका सैनिकाने
आपल्या साथींना म्हटले: मी
विश्वास नाही ठेवू इच्छित यावर.
मी आत गेलो आणि त्यांच्या कानात
ओरडलो: 'इल्यिच
शोषक येत आहेत.' ते हलले सुद्धा नाहीत.
तेव्हा मी जाणले की ते गेले आहेत.

2.
जेव्हा एखादा भला माणुस जाऊ इच्छितो
कसे थांबवू शकता तुम्ही त्याला?
त्याला सांगा की आत्ता का आहे त्याची गरज
हाच मार्ग आहे त्याला थांबवण्याचा.

3.
अजून कोणती गोष्ट थांबवू शकली असती
लेनिनला जाण्यापासून?

4.
विचार केल्या त्या सैनिकाने
जेव्हा ते ऐकतील, शोषक येत आहेत
उठतील ते, असोत कितीही आजारी
कदाचित कुबड्यांवर चालत येतील

कदाचित परवानगी देतील की
त्यांना उचलून आणले जावे, पण
उठतील तर नक्कीच ते आणि येऊन
सामना करतील शोषकांचा

5.
जाणत होता तो सैनिक, की लेनिन
लढत राहिले सारं आयुष्य
शोषकां विरोधात

6.
आणि सामील होता तो सैनिक
शीतप्रासादावरच्या हल्ल्यात,
आणि घरी जाऊ इच्छित होता
कारण तिथे वाटली जात होती जमीन
तेव्हा लेनिनने त्याला म्हटले होते:
आत्ता इथेच थांब !

शोषक आहेत अजूनही हजर
आणि जोपर्यंत हजर आहे शोषण
लढावे लागेल त्याच्या विरोधात
जोपर्यंत आहे तुझे अस्तित्व
तुला लढावे लागेल त्याच्या विरोधात

7.
जे कमजोर आहेत ते लढत नाहीत . थोडे मजबूत



कदाचित तासभर लढतात.
जे अजून मजबूत आहेत ते लढतात अनेक वर्षे
सर्वात मजबूत ते असतात
जे लढतात आयुष्यभर.
तेच आहेत ज्यांच्याशिवाय दुनिया चालत नाही.

8.
**क्रांतिकारकासाठी सन्मानगीत†**

अनेकदा ते असतात खूप
गायब झाले, तर बरं होईल.
पण तो झाला गायब, तर भेडसावते त्याची उणीव.
तो करतो संघटीत आपला संघर्ष
मजुरी, चहा-पाणी
आणि राज्यसत्तेकरिता.
तो विचारतो संपत्तीला:
कुठून आलीस तू?
जिथेही आहे शांतता
तो बोलेल
आणि जिथे आहे शोषणाचे राज्य
आणि बोलले जाते नशिबाबद्दल
तो उंचावेल त्याचे बोट.

जेव्हा तो बसतो टेबलावर
पसरतो असंतोष
बिघडते चव
आणि खोली भासू लागते अरुंद.
त्याला जिथेही पळवून लावले जाते,
विद्रोह जातो सोबत आणि जिथून त्याला पळवले जाते
असंतोष राहतो मागे.

9.
जेव्हा लेनिन गेले आणि
लोकांना आली त्यांची आठवण
विजय तर झाला होता, पण
देश होता छिन्न-विच्छिन्न
लोक उठून लागले होते चालू, पण
रस्ता होता अंधारा

जेव्हा लेनिन गेले
फूटपाथवर बसलेले सैनिक रडले आणि
मजूरांनी आपल्या मशिनींवर काम बंद केले
आणि मुठी आवळल्या.

10.
जेव्हा लेनिन गेले,
तेव्हा ते असे होते
जणू झाडाने म्हटले पानांना
मी जातो.

11.
पालटलीत पंधरा वर्षे तेव्हापासून
जगाचा सहावा हिस्सा
स्वतंत्र आहे आता शोषणापासून.
'शोषक येत आहेत!' या हाकेवर
जनता पुन्हा उठून उभी राहते
नेहमीप्रमाणे.
झुंझण्यासाठी तैयार.

12.
लेनिन वसलेले आहेत
मजूर वर्गाच्या विशाल हृदयात,
ते होते आमचे शिक्षक.
ते लढत राहिले आमच्या सोबत.
ते वसलेले आहेत
मजूर वर्गाच्या विशाल हृदयात.
(1935)

* **कँटाटा** - संगीत वाद्यांसह गायली जाणारी संगीत रचना, जी मुख्यत्वे वर्णनात्मक आणि अनेक भागांमध्ये असते. या कँटाटाच्या संगिताला अंतिम रुप दिले होते ब्रेष्ट चे साथी आणि महान जर्मन संगीतकार हान्स आईस्लर यांनी. या रचनेचा आठवा भाग 'क्रांतिकारकाच्या सन्मानात सन्मानगीत (ode)' ब्रेष्ट ने पहिल्यांदा 1933 मध्ये गॉर्की च्या 'आई' कादंबरीवर आधारित आपल्या नाटकात लिहीला होता.

† **ओड, ode,** एखाद्या व्यक्तीच्या सन्मानार्थ रचलेली अनियमित वृत्ताची कविता

**अनुवाद: अभिजित**

# तुम्ही नैराश्य ग्रस्त आहात का? खरंतर तुम्ही भांडवलशाहीने ग्रासले आहात!

✍ अनिता

रोजच्या धकाधकीच्या जीवनात मधेच कुठेतरी थांबून जेव्हा आपण रस्त्यांवर, कचेऱ्यांमध्ये, शाळा, महाविद्यालयांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यांचे निरीक्षण करतो तेव्हा जाणवते कि आजच्या घडीला प्रत्येक जण एकटा, थकलेला व त्रासांच्या ओझ्याने दबलेला असतो. आजची खरी परिस्थिती ही आहे कि हजारो ऑनलाईन मित्र असूनही मनातली खरी गोष्ट एकालाही सांगू शकत नाहीत. मनमोकळे हसणे, सामूहिकतेचा आनंद घेणे, कुठल्याही स्वार्था शिवाय कोणाची मदत करणे ह्या सर्व तर आजकाल फक्त कल्पनेच्या गोष्टी उरल्या आहेत. लोकांमध्ये घृणा, अविश्वास, उद्विग्नता, उबग वाढत चाललाय. २०१८ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेचा एक रिपोर्ट आला, ज्यातून निदर्शनास आले कि जगात सर्वात जास्त मानसिक तणावाचे शिकार असलेले लोक भारतात राहतात.

याच रिपोर्टनुसार भारतात ६.५ टक्के म्हणजे जवळ-जवळ ८.५ कोटी लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मानसिक रोगाने पीडित आहेत. हे एका महारोगाचे रूप घेत चालले आहे. असेही भरपूर लोक आहेत जे परिस्थिती न झेपल्याने अथवा आयुष्यात कुठल्याही प्रकारची नवी उमेद न दिसल्याने आत्महत्या करून बसतात. वर्ष २०१६ मध्येच भारतात जवळ जवळ अडीच लाख लोकांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला होता. संपूर्ण जगभरात आत्महत्या करणाऱ्या लोकांमध्ये ३६.६ टक्के लोक हे भारताचे असतात. सर्वसाधारणपणे लोकांच्या व्यक्तिगत आयुष्यात येणाऱ्या अडचणीच नैराश्याचे कारण मानल्या जातात. पण ही तर तात्पुरती कारणं असतात. आज जर ह्या समस्येने महारोगाचे रूप घेतले आहे तर नक्कीच त्याची मुळे समाजव्यवस्थेतच्या रचनेत असतील आणि या गोष्टीची अजून खोलात जाऊन पडताळणी करावी लागेल.

मानसिक नैराश्याच्या समस्येने मध्यम वर्गाला मोठ्या प्रमाणात घेरलेले आहे. उत्पादनाची प्रक्रिया आणि शारीरिक श्रमापासून तुटलेले मध्यमवर्गीय लोक अनेक प्रकारच्या वस्तूंचा वापर तर करतात पण त्या वस्तू बनण्यामागच्या प्रक्रियेशी त्यांचा संबंध नसतो. त्यांच्याकडे ही समज नसते कि खरे तर कष्टच माणसाला माणूस बनवतात. कारण माकडाचे रूपांतर मानवात होण्यामागे श्रमाचीच खरी भूमिका आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात एकटेपणाचे खरे कारण हेच आहे. एकटेपणाचे शिकार झालेल्या लोकांना आयुष्यात कुठल्याही गोष्टीविषयी कुठलाच आनंद वाटत नाही, ते प्रत्येक गोष्टीबद्दल बेपर्वाअसतात.

सध्याच्या काळात समाजातील सामान्य कष्टकरी लोकांमध्येही नैराश्य दिसून येते. कारखान्यांमध्ये प्रचंड कंबरतोड कष्ट केल्यानंतरही दोन वेळेचं जेवण मिळवणं कठीण असतं; परंतु या कामगारांच्या कंबरतोड मेहनतीचं शोषण करून भांडवलदार वर्ग ऐशो-आरामात जगत असतो. कामगारांना ही जाणीव असते की त्यांच्याच जीवतोड मेहनतीतून निर्माण झालेली ती वस्तू त्यांची नाही. अशा वेळी कामगारांचे पण कामात लक्ष लागत नाही आणि दिवसभराची थकवणूक, दुखावला गेलेला स्वाभिमान आणि शोषणापासून मुक्तता मिळवण्यासाठीची असहायता त्यांना नैराश्यात पाठवत असते.

नैराश्याचा शिकार असलेला माणूस जर ते नैराश्य दूर करण्यासाठी जागरूक प्रयत्न करत नसेल तर तो मानवीय मूल्य आणि संवेदनांपासून दूर होत जातो. त्याच्यातली योग्य-अयोग्य, न्याय्य-अन्याय्य, चांगले-वाईट ठरवण्याची क्षमता संपून जाते. त्याला सुख-दुःख, प्रेम आदी संवेदनांची जाणीव ही कमी होत जाते ज्यामुळे तो इतर माणसांपासूनही तुटत जातो. तो सर्वांना संशय व अविश्वासाच्या नजरेने बघायला लागतो व कोणाजवळच आपल्या मनातली गोष्ट सांगू शकत नाही. परिस्थिती अशी व्हायला लागते कि तो

पान 2 वर

# एन.पी.आर., एन.आर.सी आणि सी.ए.ए. : जाणून घ्या कायदेशीर तरतूदी आणि वास्तव!

पान 16 वरून

नव्हते! परंतु या कायद्यातून वगळलेल्या 'मुस्लिम' धर्मीयांना निशाणा करून देशात धार्मिक भेदभावाचे वातावरण तयार करण्याचे काम संघ परिवाराने केले आहे. या कायद्यामुळे अंदाजे 31,000 व्यक्तींना देशाचे नागरिकत्व मिळेल असा अंदाज आहे.

याही पुढे जाऊन कायद्यावरील चर्चेमध्ये उल्लेख केलेला असला, तरी या कायद्याच्या मसुद्यात मात्र धार्मिक अत्याचारांचा उल्लेखही नाही! थोडक्यात या 3 देशांमधील वरील 6 धर्मांच्या सर्व लोकांना नागरिकत्व देण्याचा मार्ग भाजप खुला करू पहात आहे! संघ परिवाराच्या सर्व निरर्थक तर्कांच्या पलीकडे जाऊन हे ठामपणे प्रतिपादीत केले गेले पाहिजे की धर्मनिरपेक्ष देशाची नागरिकता धर्माच्या आधारावर ठरवली जाऊ शकत नाही!

आता वळूयात एन.पी.आर. आणि एन.आर.सी. कडे

एन.पी.आर. (NPR) म्हणजे नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर किंवा राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही (रजिस्टर). यामध्ये देशात सर्वसाधारणरित्या वास्तव्य करणाऱ्या सर्व नागरिकांची यादी अपेक्षित आहे. वास्तव्य करणाऱ्यांमध्ये विदेशी नागरिकही असू शकतात, तसेच देशाबाहेर राहणारे लोक यात नसतात हे लक्षात घ्यावे. एन.आर.सी. (NRC) म्हणजे नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स म्हणजे राष्ट्रीय नागरिकता नोंदवही. यामध्ये देशाच्या सर्व नागरिकांची नोंद असणे अपेक्षित आहे. आता या दोन्ही गोष्टी कुठून आल्यात ते पाहूयात. या दोन्हींसंदर्भातील कायदा हा भाजपच्या वाजपेयी सरकारच्या काळातच नागरिकता सुधार कायदा 2003 मध्येच बनला.

नागरिकता कायद्यात झालेल्या बदलांच्या संदर्भात वर उल्लेखलेल्या सी..ए.ए. 2003 ने एका बाजूला जन्माने नागरिकत्वासाठी बेकायदेशीर प्रवासी पालक अमान्य केले आणि दुसरीकडे अशाच बेकायदेशीर प्रवाशांचे निमित्त करून कोण नागरिक आहे आणि कोण घुसखोर हे ठरवण्यासाठी सरकारला नागरिक नोंदणी करण्याचे अधिकार दिले! या 2003 मधील नागरिकता कायद्यातील बदलानुसार "नवीन कलम 14अ खाली केंद्र सरकार नागरिकांच्या सक्तीने नोंदणीसाठी नियम बनवू शकते..."

याच तरतुदीचा आधार घेऊन तत्कालीन भाजपच्या वाजपेयी सरकारने ' "नागरिकता नियम (नागरिकांची नोंदणी आणि राष्ट्रीय नागरिकता ओळखपत्र वाटप) 2003" बनवले. या नियमांना समजणे एन.पी.आर. आणि एन.आर.सी समजण्यासाठी आवश्यक आहे.

या नियमांच्या कलम 4 मध्ये एन.पी.आर. आणि एन.आर.सी. बद्दल संपूर्ण नियमावली दिली आहे. या कलमांचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

4. राष्ट्रीय रजिस्टर बनवण्याची प्रक्रिया

4(1) भारतीय नागरिकांचे राष्ट्रीय रजिस्टर बनवण्यासाठी, केंद्र सरकार देशभरामध्ये प्रत्येक भागात घरोघरी जाऊन, प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीची, (स्वघोषित) नागरिकता यांची यादी बनवेल.

4(2) ही प्रक्रिया कधी होईल याची घोषणा शासकीय गॅझेट मध्ये केली जाईल

4(3) भारतीय नागरिकांचे स्थानिक रजिस्टर बनवण्यासाठी स्थानिक रजिस्ट्रार (आणि मदत करणारे काही लोक) लोकसंख्या रजिस्टर मधील सर्व व्यक्ती व कुटुंबांची माहिती तपासेल आणि छाननी करेल.

4(4) पडताळणी दरम्यान, ज्यांच्या नागरिकत्वाबद्दल शंका आहे अशा व्यक्तींची माहिती स्थानिक रजिस्ट्रार योग्य त्या शेऱ्यासहित लोकसंख्या रजिस्टर मध्ये लिहील आणि अशा लोकांना प्रक्रिया संपल्यावर त्याबद्दल लगेच कळवले जाईल.

(5) (अ) भारतीय नागरिकांचे राष्ट्रीय रजिस्टर मध्ये नाव सामील करण्या/वगळण्या अगोदर ज्यांच्या बद्दल शंका आहे अशा व्यक्तींना तालुका/उपजिल्हा रजिस्ट्रार समोर म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल.

यातील 4(2) नियमानुसार अपेक्षित असलेले गॅझेट 31 जुलै 2019 रोजी प्रकाशित झाले आहे. त्याचा क्रमांक आहे S. O. 2753(E). यानुसार एप्रिल ते 30 सप्टेंबर 2020 दरम्यान

एन पी आर बनणार आहे आणि सर्व सरकारांनी याची तयारी चालू केली आहे. तसेच 4(3), 4(4) वरून स्पष्ट आहे की एन.आर.सी हे एन.पी.आर. चेच पुढचे पाऊल आहे! यातून हे सुद्धा स्पष्ट होते की जर एन.पी.आर. यादी बनली तर त्यानंतर नागरिकांना माहिती लगेच विचारली जाणार नाही आणि एन.पी.आर. पासून पहिली एन.आर.सी यादी बनवणे हे फक्त कागदावर केले जाईल!

यातील पुढील नियम अशाप्रकारे आहेत:

(5) (ब) उपजिल्हा/तालुका रजिस्ट्रार 90 दिवसांच्या आत (किंवा ठराविक वाढवलेल्या काळात) निर्णय फायनल करेल आणि निर्णयाचे कारण नमूद करेल.

(6) (अ) उपजिल्हा/तालुका रजिस्ट्रार भारतीय नागरिकांचे स्थानिक रजिस्टर प्रकाशित करेल, आणि भारतीय नागरिकांच्या राष्ट्रीय यादीमध्ये सामील करण्याच्या नावांवर आपत्ती किंवा नाव सामील करण्याची विनंती मागवेल.

(6) (ब) अशी यादी प्रकाशित होण्याच्या 30 दिवसांच्या आत एखादे नाव सामील करण्यावर आपत्ती किंवा दुरुस्ती स्विकारली जाईल. यात आपत्तीचे स्वरूप, कारणे द्यावी लागतील.

(6) (क): 5(a) मधील तरतुदींनुसार उप-जिल्हा/तालुका रजिस्ट्रार अशा आपत्ती वर 90 दिवसात निर्णय देईल आणि नंतर जिल्हा रजिस्ट्रारला स्थानिक रजिस्टर सुपूर्त करेल जेणेकरून ते राष्ट्रीय रजिस्टर मध्ये नावे नेतील.

(7) (अ) उपजिल्हा/तालुका रजिस्ट्रार च्या नोंदीबद्दल (उपनियम (5) वा (6) नुसार) ज्यांना आक्षेप आहे त्यांना 30 दिवसांच्या आत जिल्हा रजिस्ट्रार कडे अपील करता येईल

7. कुटुंब प्रमुखाने आणि व्यक्तीने माहितगार म्हणून काम करणे - (1) भारताच्या प्रत्येक नागरिकाला बंधनकारक असेल की त्याने भारतीय नागरिकांच्या राष्ट्रीय रजिस्टर करिता अधिकाऱ्यांना सहकार्य करावे आणि या काळात स्थानिक रजिस्टर मध्ये नोंद करवून घ्यावी.

17. जे नियम तोडतील त्यांना 1000 रुपयांपर्यंत दंड केला जाईल

थोडक्यात, 6(ब) नुसार तुमच्या नागरिकत्वा विरोधात इतर जण तक्रार करण्याची शक्यता यातून संभावते! तसेच वरील सर्व नियमांचा अर्थ आहे की संशयित यादीमध्ये नाव आल्यावर अनेक महिने/वर्षे चकरा मारा, पैसे व वेळ खर्च करा, मनस्ताप घ्या हेच तुमच्या जीवनाचे वास्तव बनणार आहे! कलम 7 नुसार माहिती न देणे गुन्हा ठरवले आहे, त्यामुळे जर या प्रक्रियेतून सुटायचे असेल तर सविनय कायदेभंगाच्या मार्गाने हा गुन्हा करणे हाच मार्ग आपल्यापुढे राहतो.

### माहिती कुठली घेतली जाईल? माहितीचे धोकादायक मुद्दे

एक अपुरा एन.पी.आर. 2010 मध्ये सुद्धा करण्यात आले होते आणि 2015 मध्ये ते थोडे सुधारले गेले होते. परंतु 2020 च्या एन.पी. आर. मध्ये आणि 2010 च्या एन.पी.आर. मध्ये मुलभूत फरक आहे. 2010च्या एन.पी.आर. मध्ये खालील माहितीचे मुद्दे विचारले गेले होते: नाव, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, जन्मतारीख, विवाहित स्थिती, शिक्षण, व्यवसाय, आई/वडील/पती-पत्नीचे नाव, जन्म स्थान, सध्याचा पत्ता, कायमचा पत्ता, राष्ट्रीयता (स्वयंघोषित), सध्याच्या जागी कधीपासून रहाता.

2020 च्या एन.पी.आर. मध्ये खालील नवीन मुद्दे विचारले जाणार आहेत: आधार (ऑप्शनल) मोबाईल, पालकांचे जन्मस्थान आणि तारीख, मागे कुठे रहात होता त्याचा पत्ता, पासपोर्ट नंबर, व्होटर आय डी, ड्रायव्हिंग लायसन्स आणि पॅन नंबर. यापैकी आई वडिलांचे जन्मस्थान आणि जन्मदिवस निश्चितपणे प्रत्येकाची वंशावळ बनवण्यासाठी आणि त्यावर आधारित नागरिकत्व ठरवण्यासाठीच वापरले जाईल. याशिवाय पूर्वीच्या वास्तव्याची माहिती, आधार, पॅन, व्होटर आयडी सारखी इतर सर्व माहिती ही नागरिकत्व तपासण्यासाठी नक्कीच वापरली जाणार. या सर्व माहितीच्या 135 कोटी लोकांच्या प्रचंड संगणकीय डेटाच्या सुरक्षिततेचे प्रश्न तर निश्चितच आहेत परंतु या माहितीच्या आधारेच आपले नागरिकत्व ठरवले जाणार आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

### कागद पत्र कुठली चालतील?

या प्रक्रियेमध्ये कुठली कागदपत्र ग्राह्य असतील याची यादी अद्याप सरकारने जाहीर केलेली नाही. थोडा अंदाज घ्यायचा असेल तर आपण आसामच्या एन.आर.सी.च्या अनुभवावरून अंदाज करू शकतो. आसाम मध्ये एखाद्या व्यक्तीला स्वत:चे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी यादी 'अ' मधील 16 पैकी कोणताही एक कागद दाखवणे आवश्यक होते. यात महत्वाचे हे की हा कागद 24/3/71 च्या अगोदरचा असणे आवश्यक होते! या 16 कागदांमध्ये 1951 साली झालेली एन.आर.सी., 1971 च्या अगोदरच्या मतदार यादी, जमिनीचे कागद, नागरिकता प्रमाणपत्र, कायमस्वरूपी वास्तव्य प्रमाणपत्र, शरणार्थी नोंदणी प्रमाणपत्र, पासपोर्ट, एल.आय.सी, एखादे सरकारी लायसन्स किंवा प्रमाणपत्र, सरकारी नोकरीचे प्रमाणपत्र, बँक अकाउंट, जन्मदाखला, बोर्ड किंवा विद्यापीठाचे प्रमाणपत्र, कोर्टाचे कागद ही कागदपत्रे होती. ज्या लोकांकडे वरील 16 पैकी एकही कागद नव्हता त्यांना त्यांच्या आईवडिलांची यादी 'ब' मधील खालीलपैकी एक कागदपत्र आणणे आणि नाते सिद्ध करने बंधनकारक होते: जन्मदाखला, जमिनीचे कागद, बोर्ड/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, बँक/एलआयसी/पोस्ट ऑफीस रेकॉर्ड, विवाहित महिलेसाठी सर्कल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मतदार यादी, रेशन कार्ड किंवा इतर कायदेशीर कागदपत्र.

यामध्ये या भ्रमात राहणे धोक्याचे राहिल की वरीलपैकी काही कागद तुमच्याकडे आहेत म्हणून निर्धास्त रहावे. कागद किती तारखेला काढलेला आहे ते महत्वाचे आहे आणि आई-वडील-मुलांचे नाते सिद्ध होणेही आवश्यक आहे. फक्त स्पेलींग वेगळे आहे म्हणूनही अनेकदा नाते सिद्ध झालेले नाही. वरील यादीमध्ये आधार, पॅन किंवा व्होटींग कार्ड सामील नाही हे लक्षात घ्यावे.. कागदपत्रे कुठली चालतील आणि आपल्याकडे ती आहेत की नाही यापेक्षाही आपण हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की या प्रक्रियेमध्ये सहभागी झाल्यानंतर बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही आणि आपले नाही तरी इतर कोट्यवधी लोकांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते.

भाजप वाले आता म्हणू लागलेत की आम्ही आधार कार्ड सुद्धा चालवून घेऊ. खरे तर जर आधार कार्ड चालणार असेल तर एन.पी.आर. ची गरजच नाही कारण देशभरात 125 कोटींपेक्षा जास्त लोकांकडे अगोदरच हे कार्ड आहे आणि त्याची संपूर्ण माहिती सरकारकडे आहे.

अजून एक गोष्ट लक्षात घ्यावी की आसाम च्या एन.आर.सी.ला 1971, 1966 अशा तारखा लागू होत्या, पण भारताच्या एन.आर.सी. ला नागरिकता कायद्यानुसार, त्यातील बदलांनुसार आणि राज्यघटनेनुसार, जन्माप्रमाणे 1945, 1948, 1950, 1987, 2004 इत्यादी तारखा लागू होतील.

### भाजपच्या थापांना भुलू नका.

देशभरामध्ये मोठे आंदोलन छेडले गेल्यावर भाजपचे नेते म्हणू लागले आहेत की "आम्ही एन.आर.सी. चा काही विचारच केलेला नाही", वगैरे. परंतु कायदा काय म्हणतो ते आपण पाहिलेच आहे आणि हे स्पष्ट आहे की एन.पी.आर. झाल्यावर एन.आर.सी. हे पुढचे पाऊल आहे. याबद्दल भाजपचे नेते अगोदर काय म्हटले आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

1 मे 2019 रोजी गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की : "आम्ही अगोदर नागरिकता सुधार बिल पास करु, आणि खाली करू की शेजारच्या देशातून आलेल्या सर्व शरणार्थींना नागरिकता मिळेल. नंतर एन आर सी बनेल आणि आम्ही देशात घुसलेल्या प्रत्येक घुसखोराला शोधू आणि बाहेर काढू."

याच दिवशी अमित शाह, बंगाल मध्ये बोनगाव म्हटले की

"तुम्ही क्रम समजून घ्या. अगोदर कॅब येईल. सर्व शरणार्थींना नागरिकता मिळेल. मग एन.आर. सी. येईल. यामुळेच शरणार्थींनी काळजी करू नये पण घुसखोरांनी करावी. क्रम लक्षात घ्या."

याच दरम्यान अमित शाह, राईगंज, बंगाल येथे म्हटले होते की

"आम्ही देशभरात एन आर सी च्या अंमलबजावणीची खात्री देतो. हिंदु, शिख आणि बुद्ध सोडून आम्ही देशातील प्रत्येक घुसखोराला बाहेर काढू. "

यापैकी सर्व वक्तव्यांचे व्हिडिओ उपलब्ध आहेत आणि स्पष्ट आहे की आता जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### गफलतीमध्ये राहू नका

15 जानेवारी रोजी जनतेच्या आंदोलनाच्या दबावामध्ये गृह मंत्रालयाने म्हटले आहे की एन.पी. आर. मध्ये कागदपत्र घेतली जाणार नाहीत. कागदपत्रे घेतली नाही तरी ती पाहिलीच जाणार नाहीत याची खात्री नाही, तसेच तुम्ही दिलेली माहिती जर आई-वडीलांचा जन्मदिवस आणि जन्म ठिकाण, तसेच आधार, पॅन, ड्रायव्हिंग लायसन्स इत्यादी सर्व धरून असेल तर ही माहिती एन्. आर.सी. साठी वापरली जाणार आहे हे निश्चित. त्यामुळे सरकारच्या अशा कोणत्याही भ्रामक प्रचारापासून सुद्धा सावध राहणे आवश्यक आहे! फक्त कागदच नाही तर माहिती द्यायला सुद्धा नकार देणे आवश्यक बनले आहे!

### एन.आर.सी. आणि सी.ए.ए. चा एकत्रित धोका

असा दावा केला जात आहे की जे एन.आर.सी. मध्ये वगळले जातील अशा हिंदु, शीख, ख्रिश्चन, पारशी, जैन, बुद्धिस्ट व्यक्तींना सी.ए.ए. 2019 नुसार नागरिकता मिळेल. थोडक्यात एन. आर.सी. मधून फक्त मुस्लिम, निधर्मी, ज्यू, आणि इतर धर्मीय लोक वगळले जातीय असा एकत्र तर्क दिला जात आहे. हा दावा नाकारता येत नाही. भाजपने अगोदरच तसा इरादा अनेकदा जाहीर केला आहे. अर्थात एन.आर.सी. तून वगळलेल्या व्यक्तींना ते पाकिस्तान, बांग्लादेश, अफगाणिस्तानातून आले हे सिद्ध करावे लागू शकते. परंतु याबद्दल अजूनही काही स्पष्टता नाही. काहीही असो, धार्मिक आधारावर नागरिकतेची व्याख्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला सुरुंग आहे! हे स्पष्ट आहे की एन.पी. आर. आणि एन.आर.सी. हे देशाच्या सर्वधार्मिक चरित्रावर हल्ला आहेत.

### एन.पी.आर. विरोधात लढा

वरील कायद्यांवरून हे सुद्धा सिद्ध आहे की 135 कोटी लोकांना गरिकता सिद्ध करायला लावणारा एन.पी.आर. आणि एन.आर.सी.च्या प्रक्रिया चालू आहेत. कोट्यवधी गरिब लोक ज्यांच्याकडे कागदपत्र नाहीत ते नागरिकते मधून बाहेर फेकले जाणार हे स्पष्ट दिसतआहे.. या प्रक्रियेला थांबवण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे एन.पी.आर.ची प्रक्रिया थांबवणे जी 1 एप्रिल पासून सुरू होत आहे. देशातील कोट्यवधी जनतेने एकत्र येऊन या काळ्या कायद्यां विरोधात प्रचंड लढा उभारणे हाच आता यापुढे मार्ग आहे!

# एन.पी.आर., एन.आर.सी आणि सी.ए.ए. : भाजपच्या भुलथापांना बळी पडू नका!

## जाणून घ्या कायदेशीर तरतूदी आणि वास्तव!

**अभिजित**

देशामध्ये सर्वत्र एन.पी.आर., एन.आर.सी. आणि सी.ए.ए. या कायद्यांच्या विरोधातील आंदोलन चालू आहे. याचवेळी संघ परिवार, भाजप मिळून याबद्दल वेगळी मते मांडत आहेत. "देशातील 'नागरिकांनी' घाबरण्याचे कारण नाही", "आम्ही एन.आर.सी. बद्दल बोललोच नाही", "या कायद्यांमध्ये मुस्लिम विरोधी काहीच नाही", "सी.ए.ए. मुळे देशातील एकाही नागरिकाला धोका नाही" अशा प्रकारची अनेक वक्तव्ये भाजप कडून केली जात आहेत आणि जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

प्रस्तुत लेखामध्ये या सर्व कायद्यांची तांत्रिक माहिती देऊन अपप्रचाराला उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. एन.पी.आर., एन.आर.सी. आणि सी.ए.ए. समजण्यासाठी अगोदर देशाचा नागरिकत्व कायदा समजणे आवश्यक आहे. एन.पी.आर. किंवा एन.आर.सी. (ज्याबद्दल सविस्तर विवरण पुढे आले आहे) या देशातील लोकांनी आपले नागरिकत्व सिद्ध करावे यासाठीच्या प्रक्रिया आहेत, परंतु यामध्ये काय सिद्ध करायचे आहे ते मात्र राज्यघटना आणि देशाचा नागरिकत्व कायदाच ठरवतो. त्यामुळे या तरतुदी समजूण घेणे पहिले आवश्यक आहे.

### नागरिकत्वाबद्दल राज्यघटनेतील तरतूदी

भारताची राज्यघटना 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आली. यातील भाग-2, म्हणजे कलम 5 ते 11 नुसार नागरिकत्वाची मुलभूत व्याख्या केली गेली. कलम 5 नुसार तेव्हा जे भारतात रहात होते त्यांना नागरिकत्व देण्यात आले. यामध्ये 1945 अगोदर भारतात जन्मलेले, किंवा ज्यांचे एक पालक भारतात रहात होते किंवा भारतात जन्मलेले होते त्यांना नागरिकत्व देण्यात आले. कलम 6 नुसार जे पाकिस्तानातून 19 जुलै 1948 अगोदर भारतात आले त्यांना नागरिकत्व देण्यात आले. कलम 7 नुसार जे पाकिस्तानात गेले त्यांचे नागरिकत्व रद्द केले गेले. कलम 8 नुसार त्या व्यक्तींना अर्ज करून नागरिक होण्याची संधी दिली गेली जे भारताबाहेर रहात होते, पण ज्यांचे पालक किंवा आजी-आजोब भारतात जन्मले होते. कलम 9 नुसार दुहेरी नागरिकत्वाला मनाई केली गेली, म्हणजे जर एखादा नागरिक दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्विकारेल तर त्याचे भारताचे नागरिकत्व आपोआप रद्द होईल. कलम 10, 11 नुसार संसदेला पुढे यासंदर्भात कायदा करण्याचा अधिकार देण्यात आला.

### 1955 चा नागरिकत्व कायदा

घटनेच्या कलम 10,11 मधील अधिकारानुसार देशाचा नागरिकत्व कायद1955 साली बनला. या कायद्यात नंतर 1986, 1992, 2003, 2005, 2015 आणि 2019 मध्ये बदल करण्यात आले. यापैकी 1986 आणि 2003 मध्ये झालेले बदल आपल्यासाठी महत्वाचे आहेत आणि त्याबद्दल आपण पुढे चर्चा करुयात. सध्या चर्चेत असलेला 'सी.ए.ए.' म्हणजे नागरिकत्व सुधार कायदा (सिटीझनशीप अमेंडमेंट ॲक्ट) अजून काही नसून 1955 च्याच कायद्यात झालेला बदल आहे. 1955 च्या कायद्याने नागरिकत्व मिळवण्याच्या 5 पद्धती ठरवून दिल्या, ज्या आजही लागू आहेत. वेळोवेळी करण्यात आलेल्या नागरिकता सुधार कायद्यांनी या तरतुदींना काही प्रमाणात बदलवण्याचे काम केले. या तरतुदी पुढीलप्रमाणे.

1) **जन्माने नागरिकत्व :** यानुसार देशात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला देशाचा नागरिक म्हणवण्याचा अधिकार होता. सदर तरतूद 1987 पर्यंत लागू होती. 1987 च्या सुधार कायद्याने ही तरतूद बदलवली. थोडक्यात जे लोक 1 जुलै 1987 च्या अगोदर जन्माला आले आहेत, त्यांना नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी हे सिद्ध करणे पुरेसे आहे की ते भारतात 1 जुलै 1987 अगोदर जन्मले होते. यामध्ये त्या व्यक्तीचे आई-वडील कोण आहेत हा प्रश्न उद्भवत नव्हता. थोडक्यात आई-वडील दोन्ही भारतीय आहेत, किंवा एक भारतीय आणि एक परकीय आहे, किंवा दोन्ही परकीय आहेत, किंवा दोन्हींपैकी एक किंवा दोघेही बेकायदेशीर प्रवासी (illegal migrant, ज्याला भाजपवाले आकसाने 'घुसखोर' म्हणतात) आहेत, याने काहीही फरक पडत नव्हता. व्याख्येच्या अर्थाने बघायचे झाले तर ज्या व्यक्ती इतर देशांच्या नागरिक आहेत आणि भारत सरकारच्या परवानगीने ('व्हिसा' घेऊन) भारतात आल्या आहेत त्यांना 'विदेशी नागरिक' म्हटले जाईल, आणि ज्या व्यक्ती 'व्हिसा' शिवाय आल्या आहेत त्यांना बेकायदेशीर म्हटले जाईल. ही तरतूद नक्कीचा न्याय्य होती कारण जी व्यक्ती भारताच्या भूमीवर जन्मली तिला नक्कीच भारताचा नागरिक म्हणवण्याचा अधिकार असला पाहिजे. न्यायिक भाषेमध्ये या तत्वाला 'जस सोली' (Jus Soli) म्हणतात आणि 'जस सँग्विनीस' (Jus Sanguinis) म्हणजे वंश परंपरेने नागरिकत्वापेक्षा 'जस सोली' निश्चितच जास्त न्याय्य तत्व आहे असे म्हणू शकतो.

2) **वंशपंरेने नागरिकत्व :** ही पद्धत त्यांना लागू होते जे भारताबाहेर जन्मले परंतु ज्यांचे पालक भारतीय़ आहेत. विविध कारणांनी परदेशात जाणाऱ्या किंवा तेथे राहणाऱ्या भारतीय़ व्यक्तींना मुल झाल्यास त्या मुलास/मुलीस नागरिकत्व मिळणे आवश्यकच आहे. या पद्धतीत सुद्धा वेळोवेळी बदल करण्यात आले. सध्याच्या कायद्याच्या स्थितीनुसार जे व्यक्ती परदेशात 26 जानेवारी 1950 ते 10 डिसेंबर 1992 पर्यंत जन्माला आले आहेत त्यांचे वडील भारताचे नागरिक असणे आवश्यक आहे, परंतु जे 10 डिसेंबर 1992 नंतर भारताबाहेर जन्मले आहेत त्यांची आई किंवा वडील भारताचे नागरिक असणे पुरेसे आहे.


3) **नोंदणीने नागरिकत्व :** या तरतुदीनुसार मुळ भारतीय़ परंतु भारताबाहेर राहणारे, भारतात 7 वर्षे वास्तव्य करणारे, बेकायदेशीर प्रवासी नसलेले, भारतीय़ व्यक्तीशी लग्न करून 7 वर्षे इथे राहणारे, भारतीय लोकांची मुलं इत्यादींना सरकारकडे नोंदणी करून नागरिकत्व मिळवता येते.

4) **नैसर्गिकीकरणाने नागरिकत्व :** या प्रकाराने विशेषत: त्या व्यक्तींना नागरिकत्व मिळवता येते ज्या परकीय नागरिक आहेत, परंतु अनेक वर्षे भारतात राहून त्या भारताला आपले मानू लागल्यामुले नागरिकत्व घेऊ इच्छितात. बेकायदेशीर नसलेल्या आणि 11 वर्षे भारतात राहणाऱ्या व्यक्तींना या मार्गाने नागरिकत्व मिळवता येते. सी.ए.ए. 2019 मध्ये याच पद्धतीचा उल्लेख आहे, ज्याबद्दल आपण पुढे चर्चा करणारच आहोत.

5) **एखादा भूभाग भारतात आल्यास तेथील नागरिकांना नागरिकत्व :** सिक्किम, गोवा, पाँडेचरी असे अनेक भाग भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर अनेक वर्षांनी भारतात सामील झाले. अशा लोकांना नागरिकत्व देण्यासाठी 1955 च्या कायद्यात तरतूद करण्यात आली.

वरील पैकी भारतातील बहुसंख्य व्यक्तींसाठी महत्वाची पद्धत आहे जन्माने नागरिकत्व. या पद्धतीत महत्वाचा बदल झाला तो 1987 पासून. राजीव गांधी सरकारने पास केलेल्या नागरिकता सुधार कायदा 1986 नुसार, जे व्यक्ती 1 जुलै 1987 पासून जन्माला आले, त्यांच्याकरिता फक्त भारतात जन्मणे पुरेसे नाही तर पालकांपैकी एक जण तरी भारतीय नागरिक असणे आवश्यक बनले. थोडक्यात 'जस सोली' तत्वाचा त्याग केला गेला. त्यामुळे 1987 पासून ते आज सुद्धा जर कोणी विदेशी जोडपे भारतात रहात असेल आणि त्यांना मुल झाले, तर ते मुल जन्माने नागरिकत्वाचा दावा करू शकत नाही. यामुळेच आज जेव्हा 1987 पासून जन्माला आलेल्या व्यक्तींना नागरिकत्व सिद्ध करावे लागेल, तेव्हा त्यांना तीन गोष्टी सिद्ध कराव्या लागतील, त्या म्हणजे: स्वत:चा जन्म भारतात झाला, जन्मावेळी आई किंवा वडिलांपैकी एक जण भारतीय़ होता, आणि त्या व्यक्तीसोबतचे तुमचे नाते, म्हणजे तुम्हीच तुमच्या आई-वडिलांचे अपत्य आहात हे.

वरील तरतुदीनुसार आई-वडिलांपैकी एक जण भारतीय़ असल्यास दुसरा व्यक्ती भारतीय, किंवा विदेशी नागरिक किंवा बेकायदेशीर प्रवासी असेल तरी हरकत नव्हती. थोडक्यात बेकायदेशीर प्रवासी नागरिकांनी भारतीय़ व्यक्तीसोबत नाते बनवून अपत्य जन्माला घातल्यास त्या अपत्याला नागरिकत्व मिळू शकत होते.. परंतु वाजपेयी सरकारने 2003 साली केलेल्या नागरिकत्व सुधार कायदा 2003 ने ही तरतूद सुद्धा संपुष्टात आणली. या बदलामध्ये म्हटले गेले की जन्माने नागरिकत्व मिळवण्यासाठी आई-वडिलांपैकी किमान एक भारतीय असावा आणि दुसरा बेकायदेशीर प्रवासी नसावा. यामुळे 3 डिसेंबर 2004 पासून जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला हे सुद्धा सिद्ध करावे लागेल की जर त्यांचा एकच पालक भारतीय आहे, तर दुसरा सुद्धा भारतीय़ किंवा विदेशी नागरिक आहे, आणि बेकायदेशीर प्रवासी नाही.




आता पाहूयात की **नागरिकत्व सुधार कायदा 2019, म्हणजे सी.ए.ए. 2019 काय आहे?**

या कायद्यानुसार

"हिंदू, शीख, बुद्धिस्ट, जैन्, पारशी आणि ख्रिश्चन समुदायांचा कोणताही व्यक्ती जो पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा बांग्लादेशातून 31 डिसेंबर 2014 पूर्वी भारतात आला आहे, आणि ज्याला केंद्र सरकारने किंवा पासपोर्ट कायदा (भारतात प्रवेश)1920 च्या कलम 3 च्या उपकलम 2 च्या नियम (क) नुसार सूट दिली गेली आहे, किंवा ज्याला विदेशी नागरिक कायदा (फॉरेनर्स ॲक्ट) 1946 च्या तरतुदींनुसार किंवा त्याअंतर्गत बनवलेल्या नियम वा आदेशानुसार सूट देण्यात आली आहे, असा व्यक्ती नागरिकता कायद्यानुसार बेकायदेशीर प्रवासी ठरवला जाणार नाही."

पुढे या कायद्यातील तरतुदींनुसार

"6(ब) (1) केंद्र सरकर किंवा त्याद्वारे नियुक्त अधिकारी, लागू असलेल्या नियमांची पूर्तता करत, ठरवलेल्या अर्जाद्वारे, अशा व्यक्तींना कलम 2 च्या उपलकलम 1 च्या नियम (ब) प्र माणे नैसर्गिकीकरणाचे प्रमाणपत्र देऊ शकतात."

तसेच पुढे या कायद्याप्रमाणे

"हिंदू, शीख, बुद्धिस्ट, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन समुदयातून आलेल्या अशा व्यक्तींसाठी भारतात वास्तव्याचा एकूण आवश्यक कालावधी 11 वर्षांपेक्षा कमी ऐवजी 5 वर्षांपेक्षा कमी असा मानला जाईल "

2019 ते 2014 हा काळ पाच वर्षांचा होतो हे लक्षात घेता, वरील नियमांना थोडक्यात एकत्र करायचे तर असे म्हणता येईल की 31 डिसेंबर 2014 पूर्वी बांग्लादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातून आलेल्या हिंदू, शीख, बुद्धिस्ट, जैन्, पारशी, आणि ख्रिश्चन व्यक्तींना नैसर्गिकीकरणाच्या मार्गाने नागरिकत्व मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कायद्यामागचे उद्दिष्ट लक्षात घ्यायचे तर अमित शहांचा एबीपी टीव्ही चॅनल वर 2 ऑक्टोबर 2019 रोजी आलेल्या मुलाखतीत त्यांनी असे म्हटले आहे "सर्व हिंदू, शीख, बुद्धिस्ट, ख्रिश्चन यांना नागरिकत्व मिळेल. एन आर सीचा प्रश्न कुठे आहे? आम्ही त्यांच्याकडे जाऊन त्यांना नागरिकत्व देऊ. त्यांना कागदपत्र मागणार नाही."

थोडक्यात अशा सर्व व्यक्तींना कोणतेही कागदपत्र न मागता नागरिकत्व देण्याचा इरादा मोदी सरकारने जाहीर केला आहे.

या कायद्याच्या समर्थनामध्ये वरील तीन देशांमध्ये धार्मिक अल्पसंख्यांकांवर अत्याचार होतात असा दावा संघ परिवार आणि भाजप करत आहेत. याच तर्काने ते हे मात्र सांगत नाहीत की भारताच्या 7 शेजारी देशांपैकी फक्त हेच तीन देश ना निवडले गेले आणि वरील सहा धर्मच का निवडले गेले.

हे लक्षात घेतले पाहिजे की सी.ए.ए. 2019 हा मुस्लिमच नाही तर नास्तिक, अज्ञेयवादी, ज्यू, निधर्मी, आणि तर लहान धर्मांच्या लोकांनाही वगळतो. आपल्याला माहित हवे की भारतात आजच इतर शेजारी देशांमधील धार्मिक रित्या पिडीत लोक रहात आहेत. श्रीलंकेतील सिंहली-बुद्धिस्टांच्या धार्मिक-वांशिक अत्याचारांमुळे भारतात जवळपास 30,000 तामिळ हिंदू शरण घेऊन रहात आहेत. हिंदूचा नकली पुळका असलेल्या भाजपने यांना का विचारात घेतले नाही. याशिवाय चीन मधले उघ्यिर मुस्लिम, म्यानमार येथील रोहिंग्या भागातील हिंदू आणि मुस्लिम (रोहिंग्या मुस्लिम हा शब्द जरी संघ परिवार लोकांच्या मनात भरवत असला, तरी हे एक भौगोलिक नाव आहे, आणि कमी संख्येने का होईना रोहिंग्या हिंदूसुद्धा आहेत), तसेच पाकिस्तानातील अहमदिया, बलुच, शिया इत्यादी मुस्लिम आणि बांग्लादेशातील बिहारी मुस्लिम सुद्धा त्या देशांमध्ये उत्पीडीत आहेत. एवढेच नाही, तर हे सुद्धा जाणले पाहिजे की विविध जागतिक अभ्यासांमध्ये अल्पसंख्यांकांवर अत्याचारांमध्ये बांग्लादेशाच्या वर भारताचे नाव घेतले जाते! जर धार्मिक अत्याचारांच्या विरोधातच कायदा करायचा होता, तर फक्त 6 धर्मांची आणि 3 देशांची नावे घेण्याचे काही कारण

पान 15 वर

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित